
साप्ताहिक
माणूस
कॅन्सर
'गोंडा जिल्ह्याची
मुक्त भ्रमंती'
क विशेष वार्तालेख
वासंतिक
विशेषांक
मालिका
पाच रुपये

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : एकूणपन्नासावा

[ वासंतिक विशेषांक मालिका
अंक पहिला ]

७ मे १९८३

किमत : पाच रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

आतील चित्रे : संजय पवार


# माणूस

वासंतिक विशेषांक मालिका

यापुढील आठवड्यात प्रसिद्ध होणाऱ्या

विशेषांक क्रमांक दोनमध्ये–

## पाया हादरलेली घरं !

मध्यमवर्गीय कुटुंबात नव्यानेच शिरकाव करू पहाणाऱ्या

विभक्त संस्कृतीचं भेदक चित्रण–

### अनुभवकथनं

- ☐ माझा घटस्फोट
- ☐ लग्न नावाचं खग्रास ग्रहण
- ☐ तू लग्न का करत नाहीस ?
- ☐ पूर्णांक–अपूर्णांक

### तीन विशेष लेख

- ☐ घरघर
- ☐ अमेरिकेत डोकावल्यावर
- ☐ पश्चिमरंग

### दीर्घकथा

कुटुंबातील नाती आणि त्यातील ताण–तणाव

उलगडून दाखवणारी : –विनया खडपेकर


### शिवाय

गोंडा जिल्ह्यातील मुक्त भ्रमंती . . . (दोन)

'ब्लड कॅन्सर' या कादंबरीचा पुढील थरारक भाग.

**दुरुस्ती**

चालू वर्षातील ( वर्ष बाविसावे ) अंकगणनेत अंक तिसरा ( २६ जून १९८२ ) व दिवाळीनंतरचा अंक पंचविसावा (४ डिसेंबर १९८२) हे अंकानुक्रम चुकीने दोनदा छापले गेले आहेत. त्यामुळे अंकगणना दोन अंकांनी मागे राहिली. उदाहरणार्थ, मागील ३० एप्रिल ८३ चा अंक वास्तविक या बाविसाव्या वर्षातला अठ्ठेचाळिसावा अंक आहे; पण या अंकावर अनुक्रम आहे 'सेहेचाळिसावा.' ही चूक या अंकात सुधारून घेतली आहे. म्हणून या अंकावर 'अंक सत्तेचाळिसावा' असे न छापता, अंक सत्तेचाळिसावा–अठ्ठेचाळिसावा हे पुढचे दोन्ही अनुक्रम वगळून एकदम अंक 'एकूणपन्नासावा' असे छापले आहे. —संपादक



# अेक समजलीशी वाटणारी गोष्ट

खरंच वाटत नाही
की एके काळी
आमची मैत्री होती.
तशी मैत्री होतीही;
पण रिळातलं
दोऱ्याचं टोक
आम्हाला शेवटपर्यंत
सापडलं नाही !

पद्मजा फाटक

अजित टाकसाळेची गोष्ट अगदी माझ्या डोळ्यांसमोर घडली. कुणी ती कादंबरी रूपाने मांडली नाही किंवा फीतबद्ध करून पडद्यावर दाखवली नाही; पण म्हणून मी हे म्हणण्यात अर्थ नाही की, माझ्या पुढ्यात एक आयुष्य काही वर्षं सलगतेनं घडत-मोडत होतं; पण त्याच्यात गोष्टच नव्हती.

— थीम म्हणून त्याची मी दखलच घेतली नाही याचं एक कारण म्हणजे अजितचं आयुष्य सिनेमातल्यापेक्षा वेगळ्या अर्थानं घटनाप्रधान होतं.

दुसरं म्हणजे तो मला घाटातल्या नदी-सारखा मधून मधून तेवढा दिसायचा आणि आगगाडीच्या खिडकीतून दिसणाऱ्या एखाद्या सर्वसामान्य नदीसारखा, दुर्लक्षणीय वाटायचा.

तिसरी गोष्ट, अजित प्रत्यक्ष आणि हाडा-मांसाचा असल्यामुळे अन् त्यालाही रोज दाढी-आंघोळ करावी लागते हे मी जवळून पाहिलेलं असल्यामुळे तो त्रिमीत होता. पडद्यावरच्या कॅरेक्टरसारखा चपटा थोडाच होता ?

परिणामी, अजित जिवंत असेपर्यंत, आपण बऱ्याच हाडामांसांच्या माणसांवर मारून टाकत असतो तशी मी त्याच्यावर लाल फुलीच मारून टाकली होती.

पण आज संध्याकाळी टीव्हीवर सिनेमा पाहता पाहता प्रादेशिक बातम्यांमधून दोन वाक्यात सांगितलं गेलं की, मुंबईतल्या फलाण्या भागातल्या एका अर्धवट बांधून झालेल्या इमारतीच्या सतराव्या मजल्यावरून पडून फलाण्या उद्योगपतीच्या मुलाला गूढ मृत्यू आला, ज्याचं नाव ए. व्ही. टाकसाळे असं होतं. मयताच्या शवाची ओळख त्या इमारतीखालीच बसस्टॉपवर उभ्या असलेल्या त्याच्या प्रेयसीमुळे पटली. त्या संशयास्पद मृत्यूचं कारण मात्र अजून कळू शकलेलं नाही.

दहा वर्षांपूर्वी अशा बातमीने मी रडलेच असते; पण आज मी मुलांना टी. व्ही. बंद करायलाही सांगितलं नाही. नुसतंच आपलं अस्वस्थ मन घेऊन उरलेल्या तीन खोल्यां-तल्या अंधारातून थोडा वेळ निरर्थक घिरट्या घातल्या, स्वयंपाकघरात जाऊन भाजी फोडणीला टाकली आणि मग पुन्हा प्रयत्न-पूर्वक पडद्यावरचा 'अरविंद देसाई की अजब कहानी ' बघायला घेतला.

नंतर तरी त्या एके काळच्या-नंतर आपल्या वाटेनं गेलेल्या—तथाकथित मित्राच्या आठ-वणीने सगळ्या जेवणावर पाणी फिरवण्यात काय अर्थ होता ?

पण जेवताना सारखं 'अरविंद देसाईच्या ऐवजी माझ्या तोंडात 'अजित टाकसाळे' यायला लागलं तशी सगळेच जरा गप्प झाले. हात धुवून मी गच्चीवर फेऱ्या मारायला सुरुवात केली तरी कुणी मला थांबवलं नाही. आज माझ्याकडून मागलं आवरलं जाण्याची घरात कुणाची अपेक्षा दिसत नव्हती.

अजित तसा माझा मित्र, बालमित्र, शेजारी, सहकारी कुणीच नव्हता. ते एक नुसतंच माझ्या भरगच्च आयुष्याला काही दिवस चिकटलेलं झेंगट होतं. आणि तशी माझी पर्सनॅलिटी माणसांनी लहडलेली अस-तेच. आता वाटतं की, या सगळ्याहून वेगळं नातं माझ्याशी जोडायचा प्रयत्न, अजित आयु-ष्यातल्या वेग वेगळ्या वेळी वेगळ्या वेगळ्या मार्गांनी करत होता. शेवटी शेवटी मात्र शेल्फवर बंद, मिटून ठेवलेल्या पुस्तकासारखे आम्ही एकमेकांच्या आयुष्यात 'थियरॉ-टिकली ' तेवढे उरलो होतो. आपण त्याच्यात एक बुकमार्क घालून ठेवलाय हेही अलीकडे मी विसरून गेले होते. आज आता अजि-तच्या अकाली मृत्यूमुळे (अठ्ठावीस वर्षांचा तर होता) त्याचं सगळंच आयुष्य भूतकाळांत जमा झालंय; पण म्हणूनच त्याच्या आयु-ष्याची टेप मला रिवाइन्ड करून पुन्हा लावता येते आहे आणि त्यामुळे आमच्या पाच वर्षां-पूर्वीच्या प्रथमभेटीपाशी तसा काही खुणेचा दगड मी ठेवलेला नसतानाही—आपण जाऊ शकतो.

माझ्या एका स्त्री-मुक्तिवादी—खरं तर मानवमुक्तीवादी गोष्टीवर एके दिवशी मला एक 'अजित टाकसाळे ' सहीचं खूप कडाडून पत्र आलं. मीही त्यातले आरोप आवडले तरी भाषा आणि वृत्ती न आवडून तितकंच सणसणीत उत्तर त्याला पाठवलं.

परिणाम असा झाला की, उलट टपाली तो पत्ता शोधत मला भेटायलाच आला.

त्याच्या एका मित्रानं काढलेल्या इंग्रजी 'Say ' नावाच्या मराठी अनियतकालीका-साठी एक अकथा त्याला हवी होती.

त्याचं वय पाहिल्यावर त्याच्या पत्रातली तावातावाची भाषा आठवून मी हसले. लहान मुलांचे दात सदैव शिवशिवत असतात तशी सुरेख, शिवशिवणारी बावीशी अजून त्याच्या जवळ होती.

'मोबदल्याखेरीज, चित्रकाराप्रमाणेच—मी कुठे लिहित नाही, तुझ्या बाबतीत मी अपवाद का करावा, हे तू मला पटवून देऊ शकतोस का बघ.'

हे माझं उत्तर त्याला धंदेवाईकपणाचं वाटलं तरी कुठे तरी आमच्या इयत्ता जुळ-तायत अशी त्याची त्या भेटीत समजूत झाली असावी. कारण पुढे त्याचं ते अनियतकालिक त्या जातीच्या इतर अनेक बुडबुड्यांसारखं विरून गेलं तरी त्यानं येणं जाणं ठेवलं.

त्यामुळं आता तोकड्या ठरलेल्या त्याच्या आयुष्यातले काही मैलाचे दगड त्यानं माझ्या-समोर घेतले.

अजित बादलपूरसारख्या आडगावातल्या एका साखरकारखानदाराचा मलगा.

तसं नगण्य माणसाला बादलपूर हेसुद्धा समजून घेण्याच्या, धडपडण्याच्या, पुढे येण्याच्या दृष्टीनं पुरेसं मोठं गाव वाटू शकतं.

—लक्ष्मणराव नाही का, सायकलीचं दुकान काढून पुढे किर्लोस्कर झाले ?

पण अजितच्या बाबतीत एक अडसर म्हणजे तो कोषात असतानाच त्याच्या वडि-लांनी ते गाव पूर्णपणे पादाक्रांत करून टाकलं होतं. आर्थिक, औद्योगिक, राजकीय आणि मग अर्थातच सामाजिक, सांस्कृतिक सर्वच क्षेत्रात ते दुढ्ढाचार्य होऊन बसले होते—सिनेमातल्या अमरीशपुरी किंवा निळू-फुलेसारखे. ऐकलं होतं की, पुढं इंजिनिअरिं-गला गेल्यावरसुद्धा दर सुटीत गावचा रामोशी त्याला आणा—पोचवायला येत असे.

साहजिकच, अजित गावचा अनभिषिक्त राजपुत्र !

परंतु 'बडे बापका बेटा ' ठरून, हमखास बिघडण्याची शक्यता धाब्यावर बसवून हा आपला खरोखरच सगळीकडे चमकू लागला. एस. एस. सी. ला बोर्डात येऊन त्यानं आईला आकाश ठेंगणं करून दिलं आणि मग दुसरा मार्गच नसल्यासारखा मुंबईच्या आय. आय. टी. त सन्मानपूर्वक प्रवेश !

त्याचं नाव—गाव मला त्या पत्रव्यवहारा-तून कळलं हे तितकंसं खरं नव्हे. माझी एक लांबची—पण मुंबईच्या भाषेत 'कझिन '

ठरेल अशी बहीण बादलपूरच्या कारखानदार टाकसाळचांकडेच 'पडलेली' असल्यामुळं बापूसाहेबांच्या त्या कुलदीपकाचं कौतुक आमच्या घरी येणाऱ्या जरीच्या बातम्यांपैकी होतं.

बापूसाहेबांचा अजित जिल्हापातळीवर वक्तृत्वस्पर्धा जिंकून येतो! घरच्यांना विषयसुद्धा नंतर कळतो.

'बापूसाहेबांच्या अजितनं या सुटीत ऑरवेलच्या ॲनिमल फार्मचं रूपांतर केलं.'

मुंबईच्या पेपरातही कधीकधी संपादकांवर सरकारधार्जिणेपणाचे आरोप करणारी पत्रं त्याच्या सहीनं यायची!

त्यामुळं तो माझ्याकडे येतो हा काही दिवस चर्चेचा विषय ठरला.

परंतु पुढं त्यानं आपणच आपली लेखणी मोडून टाकली आणि तो आंघोळ करून बाहेर पडल्यासारखा साहित्यक्षेत्रातून बाहेर पडला.

'लिहून-वाचून काही होईल यावर आता माझा विश्वासच राहिलेला नाही.'

—खरं तर मध्यमवर्ग हे आमचं टार्जेट नाहीच.'

—पण ही गोष्ट पुष्कळ पुढची.

'तुम्ही लेखकमंडळी समाजाची दिशाभूल तरी करत जाऊ नका. बाकी मग तुमचं लेखन वगैरे केवळ निरुपद्रवी हास्यकला ठरते.'

असं त्यानं माझ्या तोंडावर मला ऐकवलं होतं.

पण या साऱ्या आमची भेट झाल्यावर, दीड-दोन वर्षांतल्या घटना.


त्यानंतर एकदा भयंकर हवालदिल होऊन तो कसली तरी वर्गणी मागायला आला होता.

आजकालच्या दिवसांत वर्गणी म्हटलं की, नाही म्हटलं तरी कशासाठी वगैरे पहायच्या आत कपाळावर आठी चढतेच. पावती करणाऱ्या माणसानं घासाघीस करून 'तुम्हाला काय हो जड आहे,' म्हणत रक्कम वाढवू नये म्हणून त्या भेटीत तरी तो निषेध कपाळावर टिकवायचाही असतो.

मी निमूटपणे पैसे काढून देत होते तर सतीश 'फावल्या वेळचे उद्योगपती' म्हणून त्याच्यामागे लागले. त्यांचा उद्देश फिरकीहून जास्त नव्हता; पण अजित डिवचून उठल्यासारखा आपल्या वडिलांसकट सगळ्या भांडवलशहांचा उद्धार करत सुटला!

तेवढ्यात सतीशचे उरलेले दोन पार्टनर्स त्या दिवशीचं डील सेलिब्रेट करायला येऊन थडकले आणि मग प्रकरण माझ्या हातचंच गेलं.

शेवटी कुणी तरी दरमहा येणाऱ्या घरच्या चेकवरून त्याच्या पायाखाली वार केला तशी संयपणे त्याच्यावरून नजर फिरवीत अजित म्हणाला, 'गेले सहा महिने माझा पक्ष मला पोसतोय. पुढच्या महिन्यात आम्ही


प्रत्येक मोठ्या क्रीडापटूच्या मागे महिनोनु महिने, वर्षानुवर्षे केलेला सराव व परिश्रम उभे असतात त्याचप्रमाणे प्रत्येक लक्षाधीशाच्या मागेही कित्येक महिन्यांची आणि वर्षांचीही बचत व गुंतवणूक असते.

सेन्ट्रल बँक
ऑफ इंडिया
(भारत सरकारचा उपक्रम)
एकमेका समवेत सुखी जीवन साकार

तिथे-चौथे आदिवासींच्या जमिनी सोडवण्यासाठी बिहारला जातोय !'

'आणि अभ्यास ?' थोड्या वेळानं त्याला पोचवायला जाताना दाराशी मी म्हटलं, 'मी परीक्षेला बसणारच नाही आहे.आमच्यातला एक जण तर फायनल परीक्षेला एक महिना असताना बाहेर पडला. उद्या आपल्याच डिग्रीचा आपल्याला मोह पडून आपण चळवळीपासून परावृत्त होऊ नये म्हणून !'

मला त्याच वेळी त्याच्याशी खूप बोलायचं होतं; पण धीर होईना. त्यात आत ह्यांची पार्टी सुरू झाली आणि मला हाक आली.

'हे बघ, तू सतीशचं काही मनावर घेऊ नकोस. त्यांना पटत नाही असं नाही रे; पण बिझिनेस करायचा म्हटल्यावर सोवळं राहून चालायचं नाही, नाही का ?... तू ये पुन्हा. मग बोलू.'

त्यानंतर अजित गेला तो गेलाच- पाच सहा महिन्यांनी एक गृहस्थ घाबऱ्याघुबऱ्या येऊन सांगून गेले. 'आला तर एन्करेज करू नका बापूसा'हेबांच्या मुलाला. बंगालात जाऊन नक्षलवादी झालाय असं ऐकतो खरंखोटं देवाला ठाऊक.'

-शहारेच आले. मी तेव्हा दिवाळी अंकाच्या मागण्या पुऱ्या करायच्या गडबडीत होते. Interpersonal Relationships ऊर्फ 'माणसामाणसातले संबंध 'या विषयावर काही विचारवंतांचा परिसंवाद घडवून आणण्यात गुंतलेले होते.

तरीही त्याचा एक उद्गार आठवून गेला.

'काही झालं तरी माझ्या वडिलांसारखं 'मनी अर्निंग मशीन' होण्यापेक्षा मला आत्महत्या करणं परवडेल.'

त्या दिवशी तो झोपडपट्टी जळल्यामुळे त्यांच्या मदतीसाठी निधी गोळा करत होता म्हटल्यावर आमच्या घरी त्याच्यावर माराच झाला होता.

'झोपडपट्टीतले ना ?'- मग कुणी मरत नाहीत, सोडा ! मारतील साले ते आपल्याला. ते मरतायत !'

पिऊन पडले असतील ! एकाने ढोसलेली, दुसऱ्यानं त्याहून झोकलेली !'

'चोरटे धंदे करतात, ते मग असे अंगाशी येतात.'

पण चळवळीत पडलाय म्हटल्यावर बापूसाहेब टाकसाळे काही गप्प बसले नाहीत. अजितचा थोरला भाऊ केव्हाचा बी. ए.जी. होऊन मार्गाला लागला होता. डासांवरच्या काही औषधीवनस्पतींवर संशोधन करून नव्या तऱ्हेचं 'मॉस्किटो रिपेलंट' त्यानं बाजारात आणलं होतं.

ऐकलं होतं की, त्याचा धूर घशाला विषारी ठरतो; पण उघडउघड ओरडा होऊनही त्याचा परवाना रद्द होत नव्हता.

त्या दोघांनी स्वत: जाऊन बकोट धरून अजितला घरी वठणीवर-मार्गावर आणलं, म्हणतात.

काही दिवसांनी कळलं, करियर राखण्यासाठी त्याला पुण्याच्या College of Agriculture मध्ये दाखल केलं गेलं आहे.

तेथे मग त्याचा पास-नापास होत डिग्रीपर्यंत अभ्यास होत राहिला. नाही म्हटलं तरी मला त्या दिवशीचा प्रसंग जरा लागलाच होता. म्हणून मी त्याला मुद्दाम मुंबईला आलास की ये' असे दोन-चार निरोप धाडले. तेव्हा एका वीक-एन्डला आला.

त्या दिवशी आम्ही सगळेच त्याच्याशी जपून वागलो. सतीशला मी काय, मिस्टर गरीबी हटाव' असलं काही म्हणायचं नाही म्हणून आधीच बजावलं होतं.

त्यानंतरही एकदा अचानक संध्याकाळचा आला होता.

घुम्यासारखा पेपर तोंडापुढे धरून बसला आणि मग चहा पिऊन एकदम निघून गला.

मग मात्र मीही त्याला दुबळा ठरवून एकूणच त्या अनुभवातून स्वत:ला मुक्त करून घेतलं.

नाही म्हटलं तरी मी माझ्यापुरती निष्ठेनं माझ्या लेखणीतून किडुक-मिडुक काही तरी साधत होते.

अजितने मला, या सगळ्यांनाच नाव ठेवून, वेड्यात काढून शेवटी स्वत: काय साधलं होतं ?

ना धड शिक्षण, ना करियर, ना क्रांती.

गावभरचे उकिरडे फुंकून अखेर साखरेच्या लादीवर, अभिषिक्त...?

कारण काय, तर म्हणे बापूसाहेबांना पाठोपाठ दुसरा हार्टॲटॅक !

मध्यंतरी बऱ्याच दिवसांपूर्वी मला अचानक त्याचं एक पत्रही आलं होतं. खुषीपत्र. अजूनही त्याला मी लिहीत असे तशा मूल्यं बिल्यं जपायला सांगणाऱ्या 'स्युडो' गोष्टी वाचून किक् येत होती तर.

पण त्याचं ते दोन-चार प्रकारच्या शाया वापरून विनोदी भासायचा प्रयत्न केलेलं पत्र इतकं लाऊड, क्विक्झोटिक आणि दिव्याच्या उजेडाला घाबरणाऱ्या माणसासारखं वाटलं की मला ते मिळालंच नाही असं दाखवायचे ठरवून मी उत्तर लिहायचं टाळलं.

त्यानंतरही तो मुंबईला कामासाठी वरचेवर येत होता वाटतं. बापूसाहेब बरोबर असले की ते जवळच्या 'सी-रॉक' मध्येच उतरायचे.

परवाच आमच्या समान ओळखीतला एक एके काळी त्याच्या मते पोटभरू असलेला लेखक सांगत होता की, अजूनही तो पुस्तकं तशी दर्जेदारच वाचत असतो. त्याचं कृष्णमूर्ती वगैरेंचा आता उपयोग बदलला असावा-पलायनवाद ! अजूनही तो म्हणे नवे विचार वाचून त्याच्या विरुद्धची मतं हिरीरीने मांडतो. माहितीच्या बाबतीत (फक्त) तो


*With Best Compliments—*

७० वर्षांची वाटचाल !

**बुवा आईस्क्रिमवाले**

१७१२, उद्यान कार्यालय बिल्डिंग,
पुणे ४११ ०३०

* फोन : ४४०९०८

नविन आकर्षक पॅकिंगमध्ये

लिटील
ग्राईप वॉटर

बाळाच्या
आरोग्यासाठी...




LITAKA
लिटाका फार्मास्युटिकल्स प्रा. लि.
( बोरा आणि कंपनी अँसोसिएटस् )
शिवाजीनगर, पुणे-४११००५

adah/82

विजेचा अपव्यय केल्यास
तुमचे उत्पन्न
कमी होईल



राष्ट्रीय
उत्पादकतेसाठी
वीज जपून वापरा

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

महाराष्ट्र राज्य
विद्युत् मंडळ द्वारा प्रसृत

ज्ञानकोश आहे.

–आणि आज, ही आत्महत्येची बातमी.

अशा अवेळी तो आपलं बिझी आयुष्य टाकून त्या आडबाजूच्या बांधकामावर कशासाठी गेला असेल ?

कंत्राटदारानं अडवलं तर त्याला वर आपला फ्लॅट आहे असं सांगून जिन्याचं कुलूप कसं उघडून घेतलं असेल ?

आणि मुख्य म्हणजे खाली आपल्या त्या प्रेयसीला भेटायला बोलावून तासभर बसस्टॉपवर ताटकळत का उभं केलं असेल ?

–की उद्योगपतींच्या श्रीमान वारसदारांना असतात तसा कुणी याला शत्रू–बित्रू, घात करणारा ?

कारण अजित तसा कुठे तरी कमालीचा भाबडा तर होताच–

आणि गच्चीवर उभ्या–उभ्याच, एकदम मला कमालीचं कळवळून आलं.

अजितसाठी नव्हे, स्वतःसाठी. स्वतःची हार, हरलेपणा जाणवून.

अजित टाकसाळेची गोष्ट अगदी माझ्या डोळ्यांसमोर घडली; पण वेळेवर कुणी ती कादंबरीरूपानं मांडली नाही किंवा फीतबद्ध करून मला पडद्यावरून समजावून सांगितली नाही आणि आपल्या पुढ्यात एक आयुष्य सलगतेनं घडत–मोडत होतं याची दखल घ्यायला मी लेखिका असले तरी......सईद मिर्झा–बिर्झा होते थोडीच ?

–आज आता एकीकडे अरविंद देसाईची अजब कहाणी पहाता पहाताच त्याच्या मृत्यूची बातमी आली म्हणूनही असेल !

किंवा नुसतेच त्याच्या मृत्यूमुळे संदर्भ बदलले असतील आणि सोपा अर्थ लावलेला एक कठीण माणूस मी त्यामुळे पुन्हा एकदा उसवायला घेतला असेल !

त्याच्या आयुष्याचे मैलांचे दगड मला उंचावरून किंवा लांबून पाहिल्यासारखे स्पष्ट दिसतायत आणि काही अन्वयार्थही लावता यतात.

–अजित टाकसाळे, एका लहानशा गावात सुरक्षित आयुष्य घालवलेला हुषार पण कोवळा मुलगा.

–रामोशी त्याला न्यायला–आणायला येत असे.

आपल्या गावच्या परिसरात गाजून, न उतता न मातता तो अठराव्या वर्षी मुंबई जितायला आला होता.

–आणि मुंबई अशा माणसांना पहिल्यापासून धडवायला घेते. कधीकधी तर उलटंपालटं करते. विशेष संवेदनाशील माणसं अशी एकटी अशा महाशहरावर फेकली गेली की, बाहेरून एकसंध दिसत असूनही, आत त्यांचा चुरगळा होत असू शकतो.

अजित मुंबईला आला आणि येथल्या कोडग्या, शहरी संस्कृतीचा सपकारा त्याच्या तोंडावर बसला असावा.

त्यानंतरचं तुटणं, एलियनेशन, त्याची त्याच्या संपन्न पार्श्वभूमीशी विसंगत वाटणारी सगळी अधोगती मग सुसंगतच ठरते.

इतर गावात–विशेषतः राजपुत्र सिद्धार्थसारखं सुरक्षित आयुष्य गेलेलं असताना–जे प्रश्न माणूस स्वतःला कधीच विचारत नाही ते इथल्या उघड्या–नागड्या जीवनकलहात त्याला स्वतःला विचारावे लागतात-ज्यांची उत्तरं कुणालाच सापडलेली नसतात.

ज्यांना गरिबी, अज्ञान, उपासमार, अन्याय अशी ठोस दुखणी असतात ती माणसं त्यांच्यावरच पाय देऊन आयुष्यभर ठामपणे उभी राहू शकतात. कारण पावलोण्याच्या मूलभूत प्रश्नातच ती इतकी गुंतून राहातात की, त्यामुळं भरल्या पोटीचे, अमूर्त प्रश्न सोडवण्याची वेळच त्यांच्यावर येत नसते...

असेच काही प्रश्न अजितला पडले आणि प्रश्नच नाकारण्याचा सोपा मार्ग त्याला त्याच्या 'दुबळे'पणामुळे अनुसरता आला नाही. जे प्रश्न आपण इथं राहूनही अन् आयुष्य पाहूनही शिताफीनं नाकारू शकतो ते त्यानं तळहातावर घेतले, फक्त त्यांना तो पुरा पडला नाही. त्या सानेगुरुजींसारखीच त्याची ताकद कमी पडली.

एक सुंदर आयुष्य या महाशहराची लाथ लागून काचकन् फुटून गेलं, ही तर शोकांतिका आहेच !

पण मला गच्चीचा गारशीळ कठडा धरून खालच्या निर्मनुष्य होऊन पडलेल्या 'हा रस्ता आम रहदारीचा नाही'कडे बघताना जाणवतेय ती शोकांतिका कदाचित याहूनही दारुण आहे !

...आपल्याला आपल्यासारखी, पूरक माणसं कमीच भेटतात याचं कारण ती



कमीच असतात. मेटलीच तरी आपले विषय, भाषा, प्रवासाच्या दिशा आणि गती जुळत नाही आणि ती मागेपुढे पडतात. ह्या सगळ्यां शहरी तक्रारी खोट्या नव्हेतच; पण पुष्कळ वेळा पुढ्यात येऊन उभी राहिलेली, येता–जाता हात लावता येईल इतक्या जवळ वावरत असलेली माणसंही आपल्याला ' दिसत ' नाहीत. एकत्र सहली, सिनेमा सारं करूनही वाचता येत नाहीत आणि प्रचंड प्रमाणावर एक चुकामूकच चालू राहाते, ज्याला आपण मानवी समाज म्हणतो. आपली माणसं घेण्याची, एकमेकांपर्यंत पोचण्याची क्षमताच अपुरी ठरते. आपल्या स्वत:पेक्षा, आपल्या सवयीतल्यापेक्षा जरा वेगळी माणसं समोर आली की, आपण तोकडे पडतो.

–कधी ती वेळ चुकते, क्षण निसटतो. एखादं पत्र वेळेवर टाकायचं राहातं तर कधी केवळ शहरी संध्याकाळची गडबडघाई आड येते किंवा कधी एकमेकांच्या प्रायव्हसीबद्दलच्या, प्रतिष्ठेच्या, संकोचाच्या, सभ्यतेच्या, स्वत्त्वाच्या अतिरेकी कल्पना !

आणि मग आपण भाबडे अन्वयार्थ लावत राहातो की अजित असा होता, असा निघाला, असा बिघडला, असा गेला ! ...

पण मागे वळून पाहिलं तर तो क्षणही मला नेमका सापडू शकेल की, ज्या क्षणी अजितची आणि माझी खरी ऊरभेट कदाचित झालीही असती.

उदाहरणार्थ ह्या शेवटच्या संध्याकाळी तो आला असताना, उघडपणे बेचैन दिसत असताना मी फक्त त्याच्यापुढे ठेवलेला तो चहाचा कप किंवा त्याला बरं वाटावं म्हणून लावलेलं रुना लैलाचं गाणं; पण त्याला आवडतं की नाही कुणास ठाऊक, असं वाटून ' राजा, काय होतंय तुला ?' एवढं न विचारणं आणि त्यानं चार घुटक्यात चहा संपवून तिरिमिरीनं निघून जाणं...पुढे मग शेवटपर्यंत आमचं, मुखवटे फक्त पाळणं.

–की वाटलो होतो तेवढे आम्ही एका जातीचे नव्हतोच ? मीही तर माझ्या मते माझ्या आयुष्याचं उघडं पुस्तक त्याच्यासमोर धरलं नव्हतं का ? पण त्यानेही माझ्या, त्याच्या मते पानासारख्या रंगलेल्या, जमलेल्या (!) आयुष्यातले काही मैलांचे दगड तेवढे पाहिले असतील आणि मग तो म्हणाला असेल की, हिच्या आयुष्यात माझ्या डोळ्चांदेखत हे हे झालं, हे हे घडलं, ह्या ह्या तडजोडी तिला कराव्या लागल्या आणि तरी ती बदललीच नाही ! जिथल्या तिथे, जशी न् तशी राहिली, राहू शकली...

–विशेषत: ' लग्न ' या प्रकारातून जे काही मी स्वत:ला करून घेतलं होतं तो तर त्याच्या मते एक आत्महत्येचाच निराळा प्रकार होता.

खरंच वाटत नाही की एके काळी आमची मैत्री होती. तशी मैत्री होतीही; पण रिळातलं दोऱ्याचं टोक आम्हाला शेवटपर्यंत सापडलं नाही !

आणि म्हणूनच तुम्ही वाचक सापडलात म्हणून अजितच्या अपघाती मृत्यूचं भांडवल करून त्याच्या–माझ्या मैत्रीची नाजुक वीण-कथा मला तुमच्या गळ्यात मारायची नाही.

मीच जे काढलं नाही, ते हुकमी पाणी तुमच्या डोळ्यांतून मला त्याच्या नावानं वसूल करायचं नाही !

कारण वस्तुस्थिती आहे की, खऱ्या अर्थानं तेवढी हातमिळवणी आम्हाला साधलीच नाही.

आणि शेवटी मला समजलेली गोष्ट म्हणजे तसा काही दिवाळी अंकाचा विषय नव्हेच. □




# सांगली बँक

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामीळनाडू, आंध्र प्रदेश राज्य व गोव्यातील शाखांद्वारे

सर्व प्रकारची बँकिंग सेवा देते


६६ वर्षांहून अधिक काळ बँकिंग सेवेत !

आपल्या उत्कर्षातील साथीदार

# दि सांगली बँक लि.

रजिस्टर्ड ऑफिस : राजवाडा चौक, सांगली

चेअरमन : एम. एस. आपटे



शारदाबाई आपटे



# तीर्थरूप आक्का

जमखंडी : तेव्हाच्या मुंबई प्रांतातील दक्षिणेकडील एका मध्यम आकाराच्या संस्थानाचे ठिकाण; आज कर्नाटक राज्याच्या विजापूर जिल्ह्यातील तालुक्याचे गाव. जमखंडीच्या एका आपटे कुटुंबातील भावंडांची, आक्का ही मोठी बहीण. तिचे नाव यमुना; वडीलधाऱ्यांना यमू, शेजाऱ्यापाजाऱ्यांना यमूआक्का किंवा यमनाक्का, घरच्यांना आक्का. जमखंडी संस्थानच्या नोकरीत आक्काचे वडील (काका) अनंत जिवाजी आपटे अधिकारी होते. विवेकी, विद्या व धार्मिक आचारांसंबंधी आस्था बाळगणारे, कर्तव्यदक्ष, उच्च चारित्र्याचे.

आक्काचे सासरचे नाव पार्वती, आडनाव शिंत्रे, विवाहानंतरची पाच-सात वर्षे सोडली तर आक्का माहेरी, आपट्यांच्या घरीच राहिली. तिच्या सासरचे नाव कुणाला फारसे माहिती नसायचे. तेव्हाच्या रिवाजाप्रमाणे आक्काचे एक दीर तिला वर्षाकाठी अठरा रुपये पोटगी पाठवावयाचे. सासरच्या मंडळींशी तिचा संबंध तेवढाच राहिला.

तिच्या आईचे, आक्का ही एकच अपत्य. तिच्या अल्पवयात तिची आई गेली. आक्काची सर्व भावंडे ही दुसऱ्या आईची. पाच भाऊ व तीन बहिणी. या सर्व भावंडांची, त्यांच्या मुलां-नातवंडांची ही आक्का कशी होती ? हे आक्काच्या वहिनी कै. सौ. शारदाबाई आपटे यांनी, मुख्यत: या सर्वांकरिता, आपल्या नणंदेचे केलेले पुण्यस्मरण आहे. लेखिका शारदाबाई दोन वर्षांपूर्वी दिवंगत झाल्या.

---


ती. आक्कांची जन्मशताब्दी मला साजरी करू दे. त्यांनी आमच्यासारखंच रांधा, वाढा, उष्टी काढा असंच आयुष्य संपवलं. पण ते करताना सुद्धा, त्यालाच तपश्चर्या समजून; मनुष्य किती मनोविजयी होतो हे आम्ही पाहिलं, प्रत्यक्ष अनुभवलं. मोठ्या कुटुंबात अनेक स्वभावाची माणसं; वास्तविक त्या स्वत:च उपेक्षित. पण कुटुंबात आणखी कुणाची उपेक्षा व्हायला लागली तर या त्यालाच संरक्षण द्यायला उभ्या राहाणार, आपल्या मायेच्या पदराखाली घेणार. स्वत:बद्दल कसलीच क्षिती नाही; पण दुसऱ्याला जपणार. त्यांच्या आठवणी माझ्याजवळ कितीतरी, त्या साऱ्या माझ्यापुढे साकार झाल्या. दोन महिने पुन्हा एकदा त्यांच्या सहवासात पंचवीस वर्षं जगले. मनोमन सहवासाचं सुख घेतलं आणि वाटलं, आपल्या मुलामुलींसाठी तरी या आठवणी लिहून ठेवाव्या. त्यांच्याबद्दल घरात आम्ही नेहमीच आदरानं बोलतो. काही आठवणी सांगतो. पण एवढ्या एकत्र कधीच सांगत नाही. घरी कोणतीही चांगली गोष्ट घडली की, ती. काकांची पुण्याई आणि आक्कांचा आशीर्वाद असं सारीजण म्हणतो; त्याचा अर्थ मुलांना नीट कळेल. ( २१ ऑगस्ट १९७९ )

---

आक्का, तुम्ही आमच्यामध्ये वावरत होता त्यावेळी तुमच्याशी बोलताना तुम्हाला मी कधी 'तुम्ही' असं म्हटलं नाही, तुमचा आदर राहील असं 'आपण' हेच संबोधन आम्ही वापरत होतो. पण तुमच्याविषयी बोलताना (इतरांशी) आमच्या आक्काच म्हणत होतो. तुम्हाला जाऊन सव्वीस-सत्तावीस वर्षं होऊन गेली. पण तुमची प्रतिमा मनात माझ्या आईबरोबर जुळ्या बहिणीसारखी कोरलेली आहे. एकीनं, आईनं बाळवयात सुख दिलं, माया दिली. आणि तुम्ही मोठ्या वयात तीच माया आणि तशीच वात्सल्याची छाया दिलीत. तुमच्या सहवासात गेलेला पंचवीस वर्षांचा काल जरी अखंड नव्हता, तरी मधून मधून मिळे तोही पुष्कळ होता. आणि त्यात आपल्या दोघींमधील नणंद-भावजयीचं नातं मुळीच राहिलं नव्हतं. होतं ते केवळ मायलेकीचं नातं आणि अगदी तसाच जिव्हाळा.

आज मी तुमच्याशी खूप बोलणार आहे. आयुष्यभर तुमच्याबद्दल जे वाटलं, वाटतं ते सगळंच. स्वत:विषयी तुम्ही कधी फारसं बोलत नव्हता. पण या इतक्या वर्षांच्या सहवासात, बोलण्याच्या ओघात, एखादी स्वत:ची आठवण बोलून जात होता. तेवढा माझ्यावर तुमचा विश्वास होता. त्यातल्या काही आठवणी माझ्या मनात इतक्या खोल रुतून बसल्या आहेत की, त्या मी अजून विसरू शकत नाही. बाळपणापासून साठी उलटेपर्यंतच्या आठवणी त्यात आहेत. त्या एकापुढे एक ठेवल्या की तुमच्या आयुष्याचं संपूर्ण दर्शन होईल. होईल नाही ? ते मला झालंच आहे. आणि मग वाटलं, आक्का, देवानं तुमचं खरोखर सत्व पाहिलं आणि तुम्ही खरोखर कल्पनेबाहेर ते राखलंत.

सांगा बरं, आठवणी सांगायला कुठून आरंभ करू ? मधून मधून ऐकल्या तशा, की नीट जुळवून बाळपणापासून शेवटपर्यंत सांगत येऊ ? कसं जमतं पाहू या. पण कशाही सांगितल्या तरी ते गंगेचं दर्शन ! मग ते गंगोत्रीला घेतलं, प्रयागला घेतलं, किंवा हरिद्वारला घेतलं तरी निर्मळ गंगाच !



एकदा तुम्ही अगदी बाळपणची आठवण सांगितली होती. खरं तर ती तुम्हाला तुमच्या आजीनं किंवा आईच्या मामांनी सांगितली असणार. कारण तुम्ही त्यावेळी अगदी कडेवरच्या बाळ होता. ती. काकांचं शिक्षण नुकतंच संपून त्यांनी जमखंडी संस्थानात नोकरीला सुरूवात केली होती. तुमच्या आईचे मामा जमखंडी संस्थानचे दिवाण होते. एकदा तुमची आई त्यांना भेटायला गेली होती. जरींची कुंची आणि खणाचं झबलं घातलेल्या तुम्हाला घेऊन त्या गेल्या होत्या. मामांना नमस्कार करून बसल्यावर मामांनी थोडी विचारपूस केल्यावर म्हटलं, 'तू लवकरच गुर्लहोसूरला जाणार आहेस ना?' 'होय, महिन्याभरानं जाईन; पण मामा, एक मागणं आहे. तेवढ्यासाठी मुद्दाम भेटायला आले, जायच्या आधी.'

मामा म्हणाले, 'असं ? काय येवढं मागणं आहे ? सांग बघू ?' 'आपली कृपा असू दे' इकडं,' म्हणजे आमचं सगळं चांगलं होईल. थोरांचा आशीर्वाद असला म्हणजे चागलं असतं.'

मामा मोठ्यानं हसले, आणि म्हणाले, 'वेडे पोरी, तुझा नवरा माझ्या कृपेनंच मोठा होणारा नव्हे ! तो शिकलेला आहे, बुद्धिवान आहे. तो आपोआपच मोठा होणार आहे, समजलीस. नशीबवान आहेस तू. माझा आशीर्वाद आहे तुला.'

अतिशय आनंदानं मामांचा निरोप घेतल्यावर थोड्याच दिवसांनी त्या प्रसूतीसाठी माहेरी गेल्या. जाताना त्यांच्या मनानं आपल्या सुखी संसाराबद्दल, पतीबद्दल, किती मनोराज्यं केली असतील ! पण... प्रसूतीनंतर थोड्याच दिवसांत, त्या तुम्हाला पोरक्या करून नव्या अपत्यासह स्वर्गवासी झाल्या ! आक्का, तुमचं केवढं नुकसान झालं आहे, हे त्यावेळी तुम्हाला कसं कळणार होतं? तुम्ही तर अगदी लहान बालक होतात. पण तुमच्याजवळ असलेली आपल्या आईची एकुलती एक आठवण सांगतानाची तुमची मुद्रा मला अजून आठवते. एखादी बहुमोल वस्तु हळुवारपणे उघडून दाखवताना असते तशी ती नजर होती. सांगताना असं काही वर्णन केलंत की, इरकली टोपपदरी पातळ नेसलेली, नीटस चेहऱ्याची, एका सावळ्या पण टपोऱ्या डोळ्यांच्या मुलीला कडेवर घेऊन आलेली, विनयशीलपणे हातातल्या गोटपाटल्यांचा नाद करीत मामांना नमस्कार करीत असलेली, तुमची ती पोरसवदा आई माझ्या डोळ्यापुढे मूर्तिमंत उभी केलीत.

ते तुमचं सांगणं, तुमची हळुवार झालेली नजर मी अजून विसरले नाही.

आई गेल्यानंतर दोन-तीन वर्षे तुम्ही आजोळीच होता. कदाचित चार वर्षे असाल. त्यावेळची एक आठवण सांगितली होती. आई गेली पण आजी होती. तिच्या मायेचं छत्र तुमच्यावर होतं. बाळपणीचे हट्ट, रुसणं-फुगणं, खेळणं-बागडणं, हसणं-खिदळणं या स्वाभाविक गोष्टी, आजीजवळ असल्यानं तुम्हाला मिळाल्या. पोरकेपण जाणवलं नाही.

रोज सकाळी आजी दुधात गूळ घालून लाह्याचं पीठ खायला घालायची. त्यात गुळाचा बारीकसा खडा जरी राहिला तरी तुम्हाला आवडायचं नाही. लगेच बिनसायचं. मग वाजंत्रीला सुरूवात व्हायची. मग आजीनं पुन्हा दूध घालून सगळा गूळ नीट मिसळायचा. आणि म्हणायचं, 'यमू, कसं व्हायचं तुझं बाळा! असे हट्ट नेहमी कोण पुरवणार?' आणि हे सांगून म्हणालात, 'खरंच आजीला माझी फार काळजी वाटायची, पण माझी आवड अजून तशीच आहे बघ. पिठात गुळाचा खडा आला की चालतच नाही.' मी मध्येच म्हटलं, 'पण लाह्याचं पीठ खाऊन किती वर्षं झाली?' 'अग, लाह्याचं राहिलं, रताळ्याचं तरी खातेना?' 'पण मला मात्र असा पिठात गुळाचा खडा लागला ना, की खूप आवडतो. लाडूत बेदाणा लागतो तसा वाटतो.' 'तुझी आवड अजबच बघ. मसाले भातात सगळ्यांना तूपच आवडतं, तू दूध घालून खाणार. परवा सगळ्या कशा हसल्या.' ते आठवल्यावर मग मी सुद्धा खूप हसले. आक्का, यानंतर तुमच्या आजीची प्रकृती थकल्यासारखी झाली, म्हणून तिनं तुम्हाला कुल्हळ्ळीला [1] आजोबांकडे पोचवले. जाताना म्हणाली, 'यमू, समजूतदारपणानं वागावं बरं; आता आजी जवळ नसणार. खरं तुझं हेच घर आहे. जिथलं मूल तिथंच असलेलं बरं. हळूहळू लग्नाचं बघायला हवं. होय की नाही? नीट वाग. केव्हातरी भेटायला येईन.' तुमच्या पाठीवर हात फिरवीत आणि स्वतःचे डोळे टिपत आजी सर्वांचा निरोप घेऊन गेली, ती पुन्हा कधी भेटलीच नाही.

---

१) कुल्हळ्ळी : जमखंडी संस्थानातील आपटे कुटुंबाचे कृष्णातीरीचे खेडे.

या कुल्हळ्ळीच्या घरात आजोबा[1] होते. पण आजी नव्हती. काकांच्या लहानपणी ती गेली होती. आजी नव्हती पण गंगाकाकू होत्या. स्वभावानं अगदी देवमाणूस. खेळायला अनुआक्का होत्या. विष्णूआण्णा होते. कुल्हळ्ळीतले हे दिवस सुद्धा एक दोन वर्षं, तुमचे आनंदात गेले. तुमच्या माहेरच्या उत्साहाच्या, सुखाच्या आठवणी याच घरातल्या आहेत. मला वाटतं, लग्न फार लवकर झालं तरी पहिल्या-पहिल्या माहेर-सासरच्या तुमच्या खेपा, म्हणजे जाणं-येणं याच घरातून झालं असावं. कारण इथल्या गोष्टी सांगताना तुम्ही अगदी रंगून जायच्या.

यानंतर कितीतरी वर्षांनी आपण कुल्हळ्ळीला सगळीच गेलो होतो एकदा हुरडा खायला. त्यावेळी दोन-तीन दिवस त्या घरात राहिलो होतो. आता तिथं कुणी राहात नव्हतं. पण ती. आण्णांनी[2] आजोबांचं घर म्हणून दरवर्षी रंग लावून, झाडून-पुसून स्वच्छ ठेवलं होतं.

हे घर हिंडून दाखवताना तुम्ही एकेक आठवणी सांगत होता. 'हे घर खरं सुखवस्तुच होतं. पण राहाणी आत्ताच्या मानानं किती साधी. सगळं धान्य घरचं. रोज भात एका तामलीत व्हायचा. नैवेद्य आणि वैश्वदेवापुरता. कधी घरात बाळंतीण असेल तर किंवा एकादं वर्षाभराचं मूल असेल तर त्यांच्यापुरता भात. एरव्ही रोज भाकरी आणि जोंधळचाच्या कण्या. शेतातली, मळ्यातली असेल तेवढी भाजी. नाहीतर कडधान्याच्या उसळी. लाल भोपळा अधून मधून फोडायचा. मग दोन-तीन दिवस सगळं भोपळयाचंच. भाजी, भरीत, कढी, घारगे, थालीपीठ. अग, भोपळा तरी केवढा मोठा, असा कळशीएवढा असायचा. या माजघरात खुंट्या आहेत. त्या सगळ्यांवर शिक्यांतून एकेक दोनदोन भोपळेच असायचे.

◻

'सकाळी उठल्या उठल्या चहाचा समारंभ नाहीच. तोंडधुणं-वेणीफणी झाली की, मुलांनी-मुलींनी धुतलेले कपडे घेऊन कृष्णा-बाईवर आंघोळीला जायचं. मोठ्या बायकांची पहाटेपासून पहिली सगळी कामं झालेलीच असायची. त्यांच्या बरोबरच सगळी निघायची. पहिली बुचकळी मारताना एकदा शहारायचं. मग एकदा का डुंबायला सुरवात झाली की वाटायचं, पाण्याबाहेर येऊच नये. मोठ्या बायकांचं धुणं-स्नान झालं तरी एक मूल पाण्यातून बाहेर यायला तयार नाही. मग आजोबांचा धाक दाखवून सगळ्यांना हाकलायची. यातच केव्हातरी स्वत:चे कपडे धुवायला सगळी मुलं शिकायची. नदीवरून येताना सगळ्यांच्या हातात कपड्यांच्या पिळ्यांबरोबर स्वच्छ घासून भरलेली नदीच्या पाण्याची लोटी, तांब्या, तपेली काहीतरी असायचंच. घरी आल्यावर अशी भूक लागायची बघ. शिळी भाकरी, चटणी आणि दही हे आमचं खाणं असायचं. पण अशी अमृताची गोडी त्याला असायची की, अजून लक्षात आहे. मोठ्या बायका आल्या-आल्या सैंपाकाला लागायच्या. पुरुष मंडळी आंघोळीला नदीवरच जायची. घरी वापराला लागणारं पाणी, बैलाच्या पाठीवरून माकणी यायच्या; त्या ओतून घ्यायच्या. चहाखाणी नसल्यामुळं, पुरुषांचे-बायकांचे आहार किती चांगले होते ? भरपूर जेवायचं आणि सपाटून काम करायचं असा खाक्या होता. बायकांना श्रमाची कामं खूप लागायची. असं तुमच्यासारखं पोशाखी काम नसायचं. म्हणजे, ते चांगलं आणि हे वाईट असं नाही म्हणत बरं का मी. अग, तुमच्या नशीबानं काही काही सुखसोयी आल्या. कष्ट कमी झाले इतकंच माझं म्हणणं.

'कपडेसुद्धा किती कमी असायचे ? दोन पातळं आणि चार चोळ्या वर्षाला, बायकांना रोज वापरायला. एक नव्यानं चांगल्यापैकी आणि एक पैठणी आणि एक बिनजरीचं रेशमी महावस्त्र. संपले कपडे.

'पुरुषांनाही तसंच; दोन सदरे, दोन धोतरं, बाहेर जाताना लांब अंगरखा, उपरणं, आणि डोक्याला रुमाल. लग्नकार्यात पगडी. झाले कपडे.

'त्यामुळं कपडे ठेवायला ट्रंका, पेट्या, कपाटं, काही लागतच नव्हतं. एक पेटी असायची. त्यात नवी लुगडी, खण, पुरुषांचे पीतांबर सगळं मावायचं आणि बाकीचे खुंटीवर, वाळत घातलेले, दांड्यांवर असायचे. हल्लीचा पुष्कळ कपड्यांचा पसाराच नव्हता.'

◻

एकदा, अशाच आजोबांच्या काही विशेष आठवणी सांगितल्या होत्यात. तुम्ही कुल्हळ्ळीला आल्यावर लवकरच काकांनी तुमचं लग्न ठरवलं. स्थळ चांगलं होतं. पाचशे रुपये हुंडा ठरला होता. त्या काळात पाचशे म्हणजे खूपच होता. पण घराणं चांगलं होतं. घर होतं. शेती होती. मुलगा हायस्कुलात शिकत होता.

आजोबा म्हणाले, 'अंतोबांनी यमूचं लग्न ठरवलं आहे. खर्च बराच होणार. मागितलेन तर पाचशे रुपये काढून ठेवले आहेत. कारण त्यांच्याजवळ एवढे शिल्लक नसतील.' पण काकानी मागितले नाहीत, आणि आजोबांनी पण आपणहून दिले नाहीत, विचारलं नाही.

आजोबा काशीयात्रेला गेले त्यावेळी मुलगा आणि सून बरोबर घेऊन गेले. पण प्रवासखर्च सगळा त्यांनी केला. ते म्हणाले, 'उतारवयात सोबत म्हणून तुम्हाला घेऊन जातो आहे. खर्चाचा भार तुमच्यावर कशाला ?' रामेश्वर यात्रेला दुसरा मुलगा आणि सून नेली होती. त्यावेळी सुद्धा तसंच.

ती. काकांना आणि ती. गोंदूकाकांना (गोंदूकाका : काकांचे धाकटे बंधू.) थोड्याच अंतरानं पहिले मुलगे झाले. दोन्हीकडे

१) आजोबा : जिवाजी सदाशिव आपटे, काकांचे वडील; गंगाकाकू : काकांची चुलतवहिनी; अनुआक्का व विष्णुआण्णा : गंगाकाकूंची मुले. २) आण्णा : आक्काचे क्रमांक एकचे भाऊ.

आजोबा नातू पाहायला गेले. जाताना प्रत्येकाला गाठलं, हसळी, बिंदल्या, मनगटचा, असं बाळलेणं घेऊन गेले. नातू पाहिले. आशीर्वाद दिले. एखादा दिवस राहिले की लगेच कुल्हळ्ळीला परत आले.

त्यांना आपले मुलगे हुशार निघाले, अधिकारी झाले, याचा खूप आनंद होता. पण मुलांच्याकडे ते कधी राहिले नाहीत. आपली शेती-सावकारी पाहात कुल्हळ्ळीलाच राहात होते. त्यांची वडिलां-सारखी सेवा करणारी सून गंगाकाकू कुल्हळ्ळीला होत्या. भाऊकाका आणि गंगाकाकू हे जोडपं आजोबांच्यापाशीच राहात होतं. आजो-बांच्या मोठ्या भावाची ही सून. भाऊकाकांचे आईवडील लवकरच गेले असावेत. त्यामुळे त्यांची जबाबदारी आजोबांनीच घेतली होती.

तुम्ही एकदा सांगितलं होतं, की भाऊकाका बरेच बाहेरनादी होते, रात्री-अपरात्री घरी येत. गंगाकाकू बिचाऱ्या दार उघडीत. आजोबा बाहेर सोप्यावरच निजलेले असत. त्यांना दिसू नये म्हणून ते डोक्यावर काळी घोंगडी पांघरून येत. आजोबांना माहीत होतं. पण ते ओळखून असले तरी वाच्यता करीत नव्हते.

गंगाकाकू स्वभावानं अतिशय सरळ, थोड्याशा भाबड्याच होत्या. त्यांना विष्णु आणि अनुआक्का ही दोन मुलं. पुतण्याचं लक्ष संसारात नाही हे कळल्यावर आजोबांनी त्यांची जबाबदारी मनानं स्वतःवर घेतली आणि ती शेवटपर्यंत पाळली. गंगा-काकूंनी सुद्धा या आपल्या चुलत सासऱ्याची सेवा अतिशय आद-रानं आणि जिव्हाळ्यानं केली. ही जुनी माणसं बोलत नव्हती पण जे करायच ते निश्चयानं करीत. आजोबा वृद्धपणानं आजारी होते. त्यांचा मोठा मुलगा म्हणजे त्यातल्यात्यात जवळ, जम-खंडीला होते ते काकाच. गोंदूकाका धाकटे. ते तासगावला मामलेदार होते. त्या काळच्या प्रवासाच्या दृष्टीनं दूरच होते. आजोबांनी मग काकांना बोलावून घेतलं. काकाही लगेच घोड्या-वरून जाऊन पोचले. वडिलांच्या अंथरुणाशी बसले. आजोबा म्हणाले, 'अंतोबा, एक गोष्ट ऐकाल ?' 'अवश्य ऐकेन, सांगा.'

'तुम्ही दोघे कर्तृत्ववान आहात. तुम्हाला काही कमी पडणार नाही. पण मला गंगाबाई आणि विष्णूची काळजी वाटते. तो अजून लहान आहे. कायद्यानं त्याला तसं फारसं मिळणार नाही म्हणून तुम्ही आपल्या घरच्या सर्वांची म्हणजे शेती आणि घरातील सगळ्या गोष्टींत त्याला निम्मी वाटणी द्या. आणि निम्म्यात तुम्ही दोघं.' काका म्हणाले, 'वचन देतो.. अगदी तसंच करीन.' आजो-बांचं समाधान झालं.

आजोबांना वाटत होतं, मुलगा नाही म्हणाला तर ? कारण मूळ वडिलार्जित उत्पन्न थोडं होतं. त्यांच्या पुतण्यानं (भाऊकाका) त्याची सुद्धा व्यवस्था कधी पाहिली नाही. मग वाढवणं कुठलं ? आतातर पुतण्याही गेला होता, आणि विष्णूअण्णा तर लहान होते. आजोबांनी साध्या राहाणीनं व व्यवस्थित देखभालीनं काही वर्ष जमखंडीला नोकरी करून, आपली इस्टेट व्यवस्थित ठेवली होती, वाढवली होती. गंगाकाकू आणि त्यांची निराधार मुलं यांच्यावर त्यांची पोटच्या मुलांसारखी माया होती. त्यामुळं काकांनी वचन दिल्यावर आजोबांना फार समाधान वाटलं. नंतर आजोबा म्हणाले, 'आणखी एक गोष्ट आहे.' 'सांगा, काय आहे ?'

'आपल्या शेतकऱ्याला मी कर्ज दिलं आहे. तो एकाएकी गेला. बायको शेतावर काम करते. मुलगा अगदी लहान आहे. ते कर्ज फेडणं तिला आता शक्य नाही. तो कागद माझ्यादेखत फाडून टाका.'

काकानी दप्तरातून तो कागद काढला, आणि लगेच फाडून टाकला आणि म्हणाले, 'आणखी काही सांगायचं आहे ?' 'काही नाही, समाधान झालं.'

पुढे लवकरच आजोबा गेले. त्यावेळी त्यांच्या पेटीत, "अंत्य-कार्यासाठी" अशी चिठ्ठी लावलेली एक पुरचुंडी (पैशाची) अगदी वरच ठेवली होती !

आक्का, या आपल्या पूर्वजांच्या आठवणी तुम्ही सांगितल्यात म्हणून मला कळल्या. नाहीतर, मला कशा समजणार होत्या ?

काकांची आई लहानपणीच गेली होती. पुण्यानंतर त्यावेळी दक्षिणेत एकदम बेळगावलाच हायस्कूल होतं. काका बेळगावच्या हायस्कूलमधून मॅट्रिक झाले. शिकत असताना सुटीत कुल्हळ्ळीला आले म्हणजे त्यांना तूप-साखर घालून केलेले मुगाचे लाडू द्यायचे. आपल्या हुषार, शिकणाऱ्या मुलाचं कौतुक आजोबा आपल्या परीनं करायचे. त्यासाठी साखर ठेवायचा एक तांब्याचा गोल फिरकीचा तांब्या होता. त्यात एक शेर साखर मावायची. हा तांब्या आजोबांच्या कपाटात असायचा. पंचामृती पुजेला आणि या आपल्या लाडक्या मुलाच्या मुगाच्या पिठाला, साखर मिळायची. बाकी सगळा गूळच वापरायचा असे. मुलांना अधूनमधून तांदळाचे, कणकेचे लाडू व्हायचे. पुरणपोळी, गुळाच्या, सांज्याच्या पोळ्या, शेवयाची खीर, गव्हाची खीर, सगळी गुळाची पक्वानं. अशी सगळी साधी-सुधी रहाणी असायची.

□

आक्का, तुमचं सासर सांगलीला होतं. लग्नानंतर पहिल्य सासर–माहेर होणाऱ्या खेपा कुल्हळ्ळीलाच झाल्या ना ? कारण तुमच्या बोलण्यात काकांच्या नव्या संसाराच्या आठवणी तुमच्या-कडून कधी ऐकल्या नाहीत. कारण सासूबाई (आक्काची सावत्र आई) सुद्धा वयानं तशा लहानच होत्या.

तुमच्या सासरपैकी थोरल्या जाऊबाई थोड्या भ्रमिष्टासारख्या होत्या. मोठे दीर अस्थिर स्वभावाचे होते. वरचेवर नोकऱ्या सोडायचे. मधले दीर रेल्वेत होते. त्यांची परिस्थिती चांगली होती. मधल्या जाऊबाई सुद्धा स्वभावानं चांगल्या हुषार होत्या, असं तुम्ही एकदा सांगितलंत. सर्वात धाकटे म्हणजे हे तुमचे पती. ते फारच हुषार, जिद्दीचे होते. मॅट्रिक होण्यापूर्वीच दोन वर्षे त्यांनी इंजिनिअर व्हायचं ठरवलं होतं. त्यासाठी त्या अभ्यासक्रमाची माहिती मिळवली होती. तुम्ही एकदा म्हणाला होतात, सुतारकामाची हत्यारं जमवली होती आणि सुटीच्या वेळात घरी काहीतरी ठोका-

ठोकी चालू असायची. आक्का! केवळ लग्न झालं म्हणून साडीचा वोंगा सांभाळत काम करणाऱ्या तुम्ही आणि धोतरसुद्धा नीटनेटकं न येणारा हा चौदा-पंधरा वर्षाचा मुलगा तुमचा पती! खरं तर किती लहान मुलं तुम्ही !

मग कधी त्यांना विचारलं होतंत का, सारखी सुताराप्रमाणं कशासाठी ठोकठोक करत असता म्हणून ?

मी काहीतरीच विचारते आहे नाही तुम्हाला ?

मान-मर्यादांची किती बंधनं होती त्या काळांत ? ते असतील त्या दालनातसुद्धा तुम्ही कधी जात नसाल. जावांच्याकडून सासूबाईंकडून बोलताना ऐकलेलं तेवढंच तुम्हाला माहीत व्हायचं !

तुमच्या सासूबाईंचा या मुलावर फार जीव होता. सासरे गेले होते. म्हातारपणी आधार हे तर खरंच. पण एकंदरीतच हा मुलगा घराण्याचं मोठेपण सांभाळील, लौकिक वाढवील याची त्याना मनोमन खात्री होती. आणि त्यामुळे या मुलावर त्यांची सर्व आशा एकवटली होती.

तुमच्या बोलण्यावरून कल्पना येते की, तुमच्याबद्दलसुद्धा त्याना आपुलकी वाटत होती. तुम्हाला आई नाही म्हणून आणि तुमच्या अत्यंत सरळ स्वभावामुळं असेल. त्या तुम्हाला मायेनं वागवत होत्या.

तुमच्या पतीच्या शिक्षणासाठी त्यांनी आता पुण्याला बिऱ्हाड केलं होतं. एकदा तुम्हाला घेऊन त्या देवदर्शनाला निघाल्या होत्या. एक शेजारीणही बरोबर होती. तिला म्हणाल्या, 'पार्वतीची पावलं पाहिलीत का ? अशी पावलं फार भाग्यवान असतात.' तुमचं सासरचं नाव पार्वती होतं. विषण्णपणे हसत ही आठवण सांगून म्हणालात. 'ते भाग्य पुढं असं फळफळलं.'

तुमचे सासरे गुजराथेत न्यायाधीश होते म्हणे. ते अकालीच गेले. सासुबाईंचा अर्धा संसार भाग्याचा झाला. मोठे दोन्ही मुलगे त्या मानाने सामान्य निघाले. हा मात्र वडिलांना शोभेसा निघणार या आशेवर त्या जगत होत्या. शिक्षण संपत आलं होतं. कधीकधी जेवताना बोलणी व्हायची. ते म्हणायचे, 'आई आता अगदी थोडे दिवस राहिले. एवढी परीक्षा झाली की मग तुम्हाला काही कमी पडायचं नाही.' एकदा तुम्ही चालताना उंबऱ्याला अडखळलात, भिंतीला धरून सावरलात तरी डोकं आपटलंच थोडं. सासूबाई अग, अग, म्हणत आल्या आणि 'आई, एवढा मोठा उंबरा दिसला नाही, भिंत दिसली नाही. एकंदरीत कठीणच आहे म्हणायचं पुढं !'

आईच्या माध्यमातून केलेला हा विनोद. इथून पुढेच तुमचं वय जाणतं होणार होतं. विनोदातला आनंद घेता येणार होता. परीक्षा संपली. नंतर सुटीही मजेत गेली. परिक्षेचा निकाल जवळ आला होता. आणि एक दिवस त्यांना सपाटून ताप भरला. तो नवज्वरच ठरला. औषध-पाण्याची शिकस्त झाली. आईनं शेकडो नवस केले. पण आईनं परमेश्वराला घातलेली साकडी, तुमची पुण्याई, कोणीही त्यांना वाचवू शकलं नाही. काळानं या नवतरुणाचा एकच घास केला. दुसरे दिवशीच परिक्षेचा निकाल समजला.

ते उत्तम तऱ्हेनं पास झाले होते !

आक्का, यावेळी तुमचं वय तेरा वर्षांचं होतं का? चवदावं असेल? आई गेली, तेव्हा तुम्ही लहान बाळच होता. आणि आता सौभाग्य गेलं, तेव्हा सुद्धा पुरेशा जाणत्या झाल्या नव्हतात. अवघ्या बारा–तेरा वर्षात बालपण, कौमार्य, सौभाग्य सगळं धावत आल्यासारखं आलं, आणि तुम्हासा समजायच्या आत निघूनसुद्धा गेलं. दृष्टीआड गेलं, नाहीसच झालं.

आता उरलं एक उजाड आयुष्य, आणि कायमचा 'माहेरवास'.

□

तुम्ही माहेरी आलात. त्यावेळी काका कुंदगोळात[1] सवजज्ज्यांच्या अधिकारावर होते. बऱ्याच वर्षाची कामं तिथं साचून राहिली होती. त्यासाठी ही नेमणूक हेतुपूर्वकच केली होती. ती काकांना कामाचा उरक चांगला असल्याचा लौकिक संस्थानात होता. आण्णांचा जन्म कुंदगोळलाच झाला. त्या वेळची एक आठवण सांगितलीत.

वारशाचा समारंभ मोठा झाला. मुन्सफांना थोडा उशीराच पहिला मुलगा झाला. सारं कौतुकाचंच होतं. खूप माणसं जेवायला होती. तुमच्यासारख्या अभागी मुलीनं समारंभात भाग घ्यायचा नसतोच. पण दूर बसून बघायला काय हरकत होती ?


पण तुम्हाला शोभणारं महत्वाचं काम होतं ना? एवढ्या मोठ्या जेवणावळीची मोठी-मोठी भांडी मागल्या दारी तुम्ही संध्याकाळपर्यन्त घासत होतात. सकाळी खाल्लं तरी होतं की नाही कुणास ठाऊक. जेवल्यावर काम होत नाही म्हणे, म्हणून सारं झाल्यावर जेवण मिळालं. आक्का, जेवल्यानंतर, नाव ठेवल्यानंतर एकादा पेढा तरी मिळाला ? आठवतोय ?

सकाळपासून तुम्हाला भांडी घासताना पाहून समोरच्या इनामदारांना आश्चर्य वाटलं, आणि मनाला वाईटही वाटलं. ते मागल्या बाजूला येऊन म्हणाले, 'यमूबाई, एकटी भांडी घासती आहेस ; सकाळपासून बघतो आहे. एवढी थोरली भांडी अग, एक परातभर अन्न दिलं असतं तर कोणीही बाई भांडी घासून गेली असती. मुन्सफसाहेबांच्या कसं लक्षात आलं नाही ?'

यावेळी, सासूबाईंची आई मुलीच्या बाळंतपणासाठी आलेली होती. घरातले 'सर्वाधिकार' तिच्याकडेच होते; नव्या नात्यानं ही सुद्धा तुमची आजीच होती. पण तुमचं दैव आता तुमच्यावर कायमचं रुसलं होतं. तुमच्याशी माणुसकीनं वागावं, अशी बुद्धी इथं कुणाला होत नव्हती.

चौदा-पंधरा वर्षाचं वय होतं. चहा-कॉफी त्यावेळी नव्हतीच. पण लहान वयात जास्त भूक लागते ना? निदान भाकरी-चटणी तरी

१ कुंदगोळ : तेव्हाच्या जमखंडी संस्थानचा एक मान, सध्या धारवाड जिल्ह्यात.



द्यायची. बाळंतिणीसाठी भात-पिठलं व्हायचं. पण ते खायची तुमची 'योग्यता' नव्हती. उलट त्या पदार्थावर तुमची वासना जाऊ नये म्हणून त्यांची भांडी पाण्यानं धुवून तुमच्याकडे घासायला यायची !

एक दिवस तुम्हाला फारच भूक लागली. अगदी राहावेना. म्हणून तुम्ही सगळा संकोच भीती सोडून आत जाऊन म्हणालात, 'आजी, फार भूक लागलीय. काहीतरी खायला द्या हो.' 'थांब हं', म्हणून आजी आत गेल्या. आणि एका कागदात पोहे पाखडताना निघालेला कचरा, नाकं, त्यात थोडचा पोह्याच्या कण्या घालून तो कागद तुमच्या हातात ठेवला.

हा पदार्थ म्हशीलाच खाणं शक्य होतं !

तुम्ही मला म्हणालात, 'तो कचरा बघितला आणि डोकं भिरभिरलंच बघ. मी तो कागद अळूच्या खड्ड्यात भिरकटून दिला.' 'मस्तवाल कारटी' म्हणत आजी निघून गेली. तुम्ही एवढंच सांगितलंत. एकदाच सांगितलंत. पण माझ्या डोक्यात तुमच्या त्यावेळच्या परिस्थितीचं चक्र फिरू लागलं, गरगरा.

आक्का, सुग्रास अन्न शिजत असलेल्या त्या घरात सकाळच्या भुकेला अर्ध्या भाकरीला सुद्धा महाग झालात.

ती बाई तुमचा केवढा अपमान करायला धजावली; कसा गिळलात तुम्ही ? कुणाला सांगितलंत ? अंधाऱ्या भिंतीला ? तिथे बसून अश्रू ढाळलेत ? सर्वसाक्षी परमेश्वराला विचारलंत ? चारी बाजूंनी माझ्यावर का असा कोपलास म्हणून ? काय पाप केलं होतं गेल्या जन्मी म्हणून ? आक्का, काकांचा स्वभाव सुद्धा खूप तापट होता. या घरात तुमच्यावर इतका अन्याय होतो आहे हे कळल्यावर त्यानी खपवून घेतलं असतं ?

ही तुमची आठवण ऐकल्यावर, ऐकल्यापासून मी कितीतरी विचार केला. पण हे कोडं मला अजून सुटलं नाही की, अशा गोष्टी पाच-सात वर्षं तरी या घरात सारख्या घडत होत्या. तरी काकांच्या कसं लक्षात आलं नाही ?

मी पाच-सात वर्षं अंदाजानी म्हणते आहे. कारण ही, सात म्हणा आठ म्हणा, वर्षं तुम्ही वर कामाची मोलकरीणच होतात. होय, या वैभवशाली घरात काकांचच पहिलं अपत्य, मोलकरणीच्यांही पलीकडच्या हुद्यावर होतं. मोलकरीण कामाचे दाम मोजून घेते. जास्त काम पडलं तर कुरकुरते, काम सोडून जाईन म्हणते. कारण तिला तिचं स्वतंत्र घर असतं. तुम्हाला अन्न, वस्त्र, निवारा यासाठी जगाच्या पाठीवर दुसरी जागा नव्हती. सासर खालावलेलं होतं.

तुमच्या सासूबाईंनी पुण्यात राहून केलेल्या शिक्षणखर्चात बहुतेक सोनं-नाणं विकलं होतं. तुम्ही माहेरी आलात त्या लंकेची पार्वती होऊनच. अशा तुम्ही, आणि सहानुभूती वाटायला, मायेनं पाठीवरून हात फिरवायला, आपल्या अभागी मुलीला पोटाशी धरायला तुम्हाला आई कुठं होती ? आई असेल तर ते माहेर म्हणायचं. चालायचंच. जगरहाटी आहे ही. काही वेगळं घडलं, अनुभवाला आलं तरच नवल.

त्यामुळं तुमचा हा 'माहेरवास' सासुरवासाच्यापेक्षाही पलीकडे होता. अशी एवढी मोठी मुलगी घरात रिकामी का ठेवायची आहे ? म्हणून धुणी घरात, भांडी घरात; नव्या आईची मुलं नेहमी लहान, त्यांच्याबरोबर कुठं कामं होतात का ? शिवाय अधिकाऱ्यांच्या बायकांनी घरकामं सारी स्वत: थोडीच करायची असतात ? म्हणून बाकीची कामं तुमचीच. आजीचं वय झालेलं. सैपाकच कसातरी रेटते. 'यमू, माझ्याच्यानं दोन्ही वेळा नाही बाई भाकरी बडवणं होत. हे पीठ, हा तवा; तुझ्या भाकरी तूच बाहेरच्या चुलीवर करून खा.'

तुम्ही दोन ओळीत सांगितलेली ही एक आठवण. आणि पुढे म्हणालात, 'हे एक बरं झालं. कुणी माझ्या जेवणासाठी राबायला नको.'

मी विचारलं मध्येच.

'मग तोंडी लावायला भाजी, आमटी देत होत्या ?'

'हं, देत होत्या कधी कधी. नाहीतर मी तिखट मीठ मागून घेऊन पिठलं ढवळायची त्याच तव्यात.

'डाळीचं पीठ द्यायच्या ?'

'कुठलं ग ! भाकरीच्या पिठाचंच ढवळायची, भुकेला सगळं गोड लागतं बघ.'

किती थंडपणे सांगितलंत !

'अग, हे काहीच नाही. एकदा म्हातारी आत मला ऐकू येईल-संच बोलत होती.'

'अशा मुलींनी फार खाऊ नये. माज येतो.'

आणि म्हणालात, 'पहिल्यानं मला अर्थच कळला नाही. बराच पुढे कळला. इतकं वाईट वाटलं बघ ? असं वाटलं, कशासाठी मला देवाने जन्माला घातलंयं ?'

आक्का, कसं सहन केलंत ? कुलवंताच्या घरी, बाईनं असं बोलावं ? त्याच घरच्या मुलीविषयी ? हे लिहिताना सुद्धा मला शहारा येतो आहे.

□

काही वर्षांनी म्हणजे सात-आठ वर्षांनी तुम्ही संन्यासिनीची वस्त्रं धारण केलीत. तुमचं 'मोलकरीणपण' संपलं. स्वैपाकघराचा 'अधिकार' मिळाला. आणि तो जन्माचा सांगाती झाला. आता तुमचा सैंपाक देवाधर्माला, सोवळ्याला चालू लागला. आजी आता थकल्या होत्या. त्या मुलीकडे राहात नसत. आपल्या मुलीकडे राहात होत्या. आजारी-आजारी असत. तोंडाला चव नसायची. सूनबाई ठराविक जेवण द्यायच्या. सुनेशी बाई कधी माया-ममतेनं, आपुलकीनं वागलीच नव्हती. तर तिला तरी वेगळं काही करून खायला घालावं असं कसं वाटणार ? घरची परिस्थिती तशी बेताचीच होती. मग सारी हेळसांडच व्हायची. सामान्य माणूस असंच असतं. ही सुद्धा जगराहाटीच आहे. यात नवल तरी कसलं म्हणायचं.

आजी अगदी पडून होत्या. बारीक ताप असायचा. साधं अन्न तोंडात घोळत राहायचं. आल्या-गेल्याजवळ गाऱ्हाणं गायच्या. सून विचारत नाही. वेळेला खायला सुद्धा देत नाही. बाहेर चकाट्या पिटायला जाते, वगैरे.

तुमच्या कानावर हे येत होतं. मनाशी विचार करत होतात. काय बरं करावं ? घरात रोज तऱ्हे-तऱ्हेचा सैंपाक होत होता. थोडं नेऊन द्यावं का म्हातारीला ? कुणाला आवडलं नाही तर ? तिची सून रागावली तर ? पण एक दिवस विचार केलात. चांगल्या गोष्टीला कशाला भ्यायचं ? माझ्या स्वत:साठी तर मी काही घेत नाही ? बघुया तरी काय होतं ते ? आजीचं घर शेजारी, एक घर टाकूनच होतं.


## दि अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप बँक लि., अहमदनगर

रजि नं ANR/BNK/B 1 स्थापना - ३०-१०-१९७२
परवाना क्र. ACD MH 31P

◈ विद्यमान संचालक मंडळ ◈

१) श्री. हस्तीमल चांदमल मुनोत — चेअरमन
२) श्री. कांतीलाल घेवरचंद शिंगवी — व्हा. चेअरमन
३) श्री. नारायणदास मोहनलाल लोढा — संचालक
४) श्री. शांतीलाल हिरालाल बोरा — ,,
५) श्री. मनसुखलाल फक्कडचंद गुंदेचा — ,,
६) श्री. हेमराज मोहनलाल बोरा एल. एल. बी — ,,
७) श्री. प्रकाश मोतीलाल लोढा — ,,
८) श्री. रमेशचंद्र बन्सीलाल सारडा — ,,
९) श्री. सिमरतमल हिरालाल गांधी — ,,
१०) श्री. सुरजमल फुलचंद लोढा — ,,

श्री. धरमचंद धनराज खाबिया मॅनेजर
एम, कॉम, एल. एल. बी.



**दत्त दिगंबरच्या मे महिन्यातील आकर्षक सहली**

रामेश्वर-कन्याकुमारी यात्रा
(दि. ४ मे ८३ ते दि. २६ मे ८३)

काश्मीर-भूनंदनवन सहल
(दि. १२ मे ८३ ते दि. १ जून ८३)

नेपाळ-पशुपती-केदारनाथ-बदरीनाथ
(दि. १३ मे ८३ ते दि. ७ जून ८३)
(दि. २९ मे ८३ ते दि. १८ जून ८३)

फोन ४४४३९० — तार प्रवासी, पुणे

## दत्त दिगंबर यात्रा कंपनी

गोखले हॉल समोर, लक्ष्मी रोड, पुणे ४११०३०

घरात काकांच्या संध्याकाळच्या फराळासाठी दुधाच्या दोन दशम्या करून ठेवलेल्या असत. त्यातला एक मोठासा चतकोर घेतलात. एका छोटया पानावर ठेवून थोडी खमंग चटणी, उसळ, लोणी असं घेऊन निघालात. घरी सगळी दुपारच्या झोपेत होती. आजीची सून पण शेजारणीकडे नेहमीप्रमाणे गप्पा मारायला गेली होती. तुम्ही ते खाणं पदराआड घेऊन आजीजवळ गेलात आणि ते पान तिच्या पुढे ठेवलंत. तुमची चाहूल लागल्यामुळे आजी अंथरुणावर हळूहळू उठून बसली. तुमच्याकडे आश्चर्यानं पाहात म्हणाली :

'यमू, तू ? तू हे आणलंस ?'

'होय आजी. तोंडाला चव नाही ना तुमच्या ? खाऊन बघा बरं गोड लागतं का ? निर्लेपच आहे सगळं.'

म्हातारी एकदा तुमच्याकडे आणि एकदा त्या पानावरच्या सुग्रासाकडे पाहात होती. तिच्या नजरेसमोर तुमच्या पडत्या काळाच्या आरंभी, तुमची मारलेली भूक, दिलेली वागणूक, चित्रपटासारखी सरकत असेल. भूक म्हणजे काय, सहानुभूती म्हणजे काय याची कल्पना आता तिला स्पष्ट आली असेल. पश्चातापानं मन भरून आलं असेल. भरून आलेल्या आवाजात ती म्हणाली : 'यमू, तुझ्या मनात काही राहिलं नाही ? विसरलीस सगळं ?'

तुम्ही म्हणालात, 'आजी, या सगळ्या योगायोगाच्या गोष्टी. त्याला तुम्ही तरी काय करणार ? झालं ते होऊन गेलं. आता त्याचं काय ? खाऊन बघा बरं. गोड लागलं तर रोज थोडं आणीन.' केवढी क्षमाबुद्धी, साधुसंतासारखी मनाची ही अवस्था आक्का, तुम्हाला कशी प्राप्त झाली ?

आक्का, सुशीलाबाईंनी (आक्काची सर्वात धाकटी भावजय) सांगितलेली ही एक आठवण सांगते हं ! तुम्ही त्यांच्याकडे विजापूरला होतात, तेव्हाची गोष्ट आहे. घराजवळ एक वैष्णव कुटुंब होतं. घरची परिस्थिती तशी गरीबीचीच बाई मात्र फार भांडखोर, गल्लीत सगळ्यांशीच तिचं भांडण होतं. एकदा तर म्हणे तुमच्या बरोबर सुद्धा भांडण काढलं होतं. कारण तिला भांडायला हवंच असे. बाईचे नऊ महिने भरले होते. एक दिवस प्रसूतिवेदना सुरू झाल्या. घरात कुणी नाही. फक्त नवरा. गल्लीत सगळ्यांशी वाकडं, भांडण. कोण मदतीला येणार ? मनात सगळी म्हणत होती, नवरा आहे, करील काही व्यवस्था. पण तुम्हाला कुठलं स्वस्थ बसणं जमणार आहे ? तिच्याकडे गेलात. बाईला धीर दिलात. सारं व्यवस्थित करून बाळाला आंघोळ घालून तिच्याजवळ ठेवलंत, आणि म्हणालात, 'स्वस्थ नीज आता. मी अंग धुवून येताना तुला साबुदाण्याची खीर करून आणीन. आणि बरं का, काळजी करू नको. महिनाभर तुला तेल लावीन. बाळाला न्हायला घालीन.'

(अन्नपूर्णाकाकूंच्या (गल्लीतील ज्येष्ठ, अतिसज्जन बाई) बरोबर जाऊन ही प्रसूतीची विद्या शिकून घेतली होती ना तुम्ही ? )

तुम्ही जायला निघालात. बाई अगदी शरमून गेली होती. म्हणाली, आक्का, थांबा, मला तुमचे पाय धरू दे; मी फार चुकले, आणि ती बाजेवरून उठली. 'अग, अग, थांब. पोचला मला नमस्कार. बाळंतीण नवी तू. उठू नको बाई.' तुम्ही खोलीबाहेर आलात. तर बाईच्या नवऱ्यानं तुम्हाला साष्टांग नमस्कार घातला.

सुशीलाबाईंनी सांगितलं म्हणून कळलं. नाहीतर तुम्ही स्वतः सांगितलं असतं ?

ही एक तुम्ही सांगितलेली सुशीलाबाईंची आठवण : तुम्ही त्यांच्याकडेच होतात. एकदा तुम्हाला खूप ताप आला, लवकर निघेना. निपचित पडून होता. ग्लानी होती. पोटात काही घेतलं नव्हतं. त्यातच मध्ये तुम्ही डोळे एकदा उघडले तर तुमचं डोकं मांडीवर घेऊन त्या तुम्हाला चमच्यानं दूध घालत होत्या. 'थोडं दूध पोटात गेलं. जरा बरं वाटलं. मग मी सुशिलेला म्हटलं, 'एवढी एक हौस राहिली होती बघ. आता बाळाला ठेव खाली मांडीवरून!'

सुशिला म्हणाली, 'कसली थट्टा चाललीय, मी किती घाबरले होते ?' मी म्हटलं, 'मार्कंडेयाचं आयुष्य आहे मला. मुळीच भिऊ नको.'

मला म्हणालात, 'फार मायाळू मुलगी आहे बघ. एवढी थोरामोठ्याची मुलगी, पण कसला गर्व नाही. कधी कसली ऐट नाही. दाखवणार सगळ्यांशी सरळ वागणं. खरंच कौतुक वाटतं बघ मला.' विजापूरच्या भांडखोर बाईची आणि म्हाताऱ्या आजींची आठवण ऐकल्यावर खरोखर ज्ञानेश्वर-तुकारामांचीच आठवण येते अशा वेळी. होय, तुमच्याविषयी बोलताना एवढी मोठी नावं मी घ्यायची नाहीत? तुम्ही म्हणणारच, 'अग, कुठं ती पुण्यवान संतमंडळी, आणि कुठं आम्ही एवढीशी माणसं!' पण आक्का, हे धडे तुम्ही त्यांच्याजवळच शिकलात. अगदी घोकून पाठ केलेत. अंतःकरणात कोरुन ठेवलेत. आयुष्यभर याहून वेगळं वागला नाहीत.

इतक्या वरच्या पातळीवर विचार करणारं मन तयार करणं सोपं आहे? किती चिंतन असेल त्यामागे? अजाणत्या वयातच दुःख आणि निराशा यांनी पदोपदी तुमची सोबत केली. तुमचं आयुष्य कसं जाणार आहे? त्यात चांगलेपणा राखून कसं टिकून राहायचं ? कसं वागायला हवं ? याचा विचार पोरवयातच करायची वेळ तुमच्यावर आली. हल्लीचं, या काळातलं बाजूलाच राहू दे. पण तुमच्यावेळी सुद्धा तुमचं ते वय किती लहान होतं ? चांगलं खावं प्यावं, चांगली लेणी-लुगडी वापरावी, हौसमौज करावी; त्यासाठी वडील माणसांजवळ थोडा फार हट्टसुद्धा करावा आणि मनाजोगी गोष्ट मिळाली तर आनंदानं मोहरून जावं, असं ते वय ! पण तुमच्यासाठी दैवानं सारंच नाकारलं होतं.

तुमच्या जागी कुणी दुसरी असली तर ? तिच्या वाट्याला हीच परिस्थिती आली असती तर ? ती कशी वागली असती ? सारं सहन करुन कसलाही प्रतिकार न करता राहाणं, तुमच्यासारखं तिला जमलं असतं ?

नाही हो, इतकं सोपं नाही ते ! भित्री असती तर भांडली नसती. नुसती चडफडत राहिली असती आणि आपल्याला होणारा त्रास

सतरा ठिकाणी सांगत राहिली असती. सहनशील नसती, तापट असती तर घरात भांडणाचा मी-तू प्रवेश रोज रंगला असता. आणि मग काकांना किती मनस्ताप झाला असता. .

पण तुम्ही चार सामान्य स्त्रियांप्रमाणं नव्हताच. जन्मतःच फार चांगले संस्कार घेऊन जगात पाऊल टाकलं होतंत. आणि आमच्या साऱ्या कुटुंबाचंच ऋण गेल्या जन्मी घेतलं होतंत की काय देवच जाणे. आम्ही सर्व कुटुंबियांनी जणू काही तुमच्याच उदरी जन्म घेतल्याप्रमाणे, अगदी आईच्याच मायेनं तुमच्याकडून लालनपालन करून घेतलं. दुखण्यात शुश्रुषा करून घेतली. खाण्यापिण्याचे लाड अगत्यानं करून घेतले. तुमच्या स्वप्नातही कधी तुम्ही मानलं नाही की, ही भावंडं सावत्र आहेत, भावजया परक्या आहेत. सगळ्यांसाठी मी किती दिवस कष्ट करू ? शरीर थकलं तरी तुमच्या मनानं त्याला थकू दिलं नाही.

सर्वांच्यावर समान भावानं माया करणारं हे थोर मन आक्का, तुम्ही कसं तयार केलंत ? साधुसंतांच्या मार्गानं जाणारी ही वाटचाल कशी सुरू केलीत ?


मी सारखी सगळीकडे पाहात असते. आक्का, तुमच्यासारख्या बायका घरोघरी दिसत नाहीत. तुमच्यासारखी अशी व्यक्ती क्वचितच कुठं आढळायची. म्हणजे, जगात कुठेतरी आढळेल. पण दुर्मिळच !

□

मी सासरी आले तेव्हा तुमची ' प्रतिमा ' अगदी पूर्ण झाली होती. पण आरंभीच्या ज्या आठवणी तुम्ही मला सांगितल्या, त्यावेळी तुम्ही हताश झालेल्या होतात. तुमची जडणघडण अजून व्हायची होती. वडील असूनसुद्धा तुम्हाला काही काही वेळेला निराधार वाटायचं. वाटतंच असणार. अशावेळी आक्का, परमेश्वराला अगदी आर्ततेनं आळवत असाल; ' दयाळा, मार्ग दाखव रे; आयुष्य कसं घालवू मी, सांग. तूच सांग.' जीवभाव ओतून हाक मारली असेल. अशा आर्ततेनं परमेश्वर अंतःकरणातच वसतीला येतो म्हणे. आक्का, खरोखर परमेश्वरानंच तुमच्या मनात वसती केली. त्यानंच तुम्हाला अंतर्मुख केलं. जसा काही तो तुम्हाला म्हणालाच, ' बाळे, मनाला मुळीच दुःखी करू नको. तूच आपलं मन एवढं मोठं कर, की तुला जे मिळत नाही, माया, जिव्हाळा, सहानुभूती ती तूच भरभरून दुसऱ्यांना दे. आणि दुसरे घेत राहू देत. आणि बघ तुला सात्विक आनंदाचा ठेवा किती मिळतो ते.' हृदयस्थ परमेश्वरानंच तुम्हाला धीर दिला. मार्ग दाखवला. तोच तुमचा गुरू झाला.

म्हणूनच तुमची ही वाटचाल धैर्यानं चालू झाली ना ? एकादं सोपं गणित सोडवावं तसं चार ओळीत लिहून मी मोकळी झाले. पण ही वाटचाल एवढी सोपी गेली असेल ? परिस्थितीच्या टाकीचे घाव सोसत, रोज परमेश्वराला आळवत, हळूहळू तुमच्या मनाला हे सामर्थ्य मिळालं. मनाची श्रीमंती मिळाली आणि ती इतकी मिळाली की, शेवटपर्यंत भरभरून दिलीत तरी कधी संपली नाही.

□



गंगूताई, रंगूताईच्या (गंगू, रंगू व भीमा : आक्काच्या बहिणी) जन्मापर्यंत मला वाटतं, आजी घरी होत्याच. पण तोपर्यन्त तुमच्या घरकामाची जरुरी आणि ओळख या घराला चांगलीच झाली होती. शिवाय सैंपाक तुमच्याकडे आल्यामुळे जेवणाचे बोभाटे नव्हते. भावंडांत हळूहळू तुमचं एक स्थान निर्माण झालं. तुम्हीच ते मिळवलंत, पण ते वरच्या पातळीवरचं, नैतिक मोलाचं. भौतिक मोल मात्र तुम्हाला शेवटपर्यन्त मिळालं नव्हतं. जन्मानं या घरच्या वारस होतात, पण कायद्यानं नव्हता ना ? तुम्ही सुद्धा अशा स्वाभिमानी की, मूठभर तांदूळ किंवा एकादा पैसा देवाला जाताना कधी नेला नाही. तुमचा स्वभाव वाद घालायला, भांडायला, अगदी भित्रा होता. पण, पण स्वाभिमानाचा प्रश्न आला की, अतिशय ' तेज ' होता. तापट होता. त्याचे क्लेश अर्थात तुम्हालाच व्हायचे, दुसऱ्यांना त्याचं काय ?

स्वतःच्या खाण्यापिण्याबद्दल किंवा देण्याघेण्याबद्दल दुसऱ्यांच्या मनात किंचितसा किंतु आहे असं वाटलं, तर ती गोष्ट तुम्ही जन्माची वर्ज्य करीत होता. कमीतकमी अन्नवस्त्राखेरीज कशाबद्दलही कुणी काही म्हणू नये, त्याबद्दल आपल्याला कमीपणा येऊ नये म्हणून तुम्ही फार सावध राहात होता. मी एकदा विचारलं, ' साधी बिनकाठाची पातळं सारखी असतात. चांगली कधी नेसतच नाही का ? बाकीच्या बायका इरकली महेश्वरी अशी नेसतात की.'

' हे बघ, एकदा कुणीसं दिलं होतं एक इरकली लुगडं. मी आपलं दिवसभर नेसले. मग ऐकलं, "असली रोज नेसून का फाडायची ? बाहेर जाताना जपून वापरावी." तेव्हापासून ठरवलं. नेहमी साधीच वापरायची. नाहीतरी मला कुठं समारंभाला जायचं असतं.'

दिवसातून एकदा जेवण. दुसऱ्यावेळी धान्याचं काही खायचं नाही हा नियम. मी म्हटलं, ' इतर बायका भाजणीचं थालिपीठ, दुधाची दशमी, सांजा असं काहीतरी खातात. आपण तर चहाकॉफीसुद्धा घेत नाही. मग काही खात का नाही ? भूक लागत नाही का ? निदान उपासाचं तरी काही खावं.'

' हे बघ, निर्लेप रोज करायचं म्हणजे व्याप पडतो. उपासाच्या वस्तू सगळ्या महाग असतात. रोज तरी काय खाणार ?

उपासाच्या दिवशी खायचंच असतं की. त्यातून कधी कधी खात की; आणि दुपारी पोटभर जेवल्यावर भूक कुठं लागती !'

पुढे, हळूहळू, या तुमच्या राहाणीचा अर्थ कळायला लागला. दोन्ही वेळच्या भाकरी पोळ्या करून मग तुमची देवपूजा व्हायची. थोडा जप करून मग तुम्ही जेवायला बसायच्या. हा वेळपर्यंत सगळ्यांची जेवणं, कामं होऊन गेलेली असायची. चुलीपुढे फक्त अन्नाची भांडी असायची. कारण तुमचं जेवण अजून व्हायचंच असायचं. हवं-नको पाहायला कुणी थांबायला नको. म्हणून एकदम वाढून घ्यायचं. जेवताना कुणी थांबायला नको. म्हणून एकदम वाढून घ्यायचं. जेवताना बोलायचं नाही. नुसतं गोविंद, गोविंद म्हणायचं. एकवाढ करून घेतल्यावर पुन्हा दुसऱ्यांदा काही घ्यायचंच नाही, हा तुम्ही कायमचा नेम करून टाकला होता.

मी सासरी आले, तेव्हा तुमचं जेवण होईपर्यंत तिथंच भिंतीशी बसून राहायची. मनात आश्चर्य वाटायचं. पहिल्या पंगतीला गरम भाकरी पोळ्या होतच असत. पण आम्हा भावजयांना घाई करून बोलावून घेत होता, आणि आग्रहानं गरम गरम वाढत होता. मग भाकरी असो की पोळी असो. जेवणारं समाधानानं जेवलं की तुम्हाला आनंद होता.

साक्षात अन्नपूर्णाच तुमच्या रूपानं स्वैपाकघरात वावरत होती. वर्षानुवर्षं न कंटाळता आमची जेवणं झाल्यावर, रात्रीला पुरेशा भाकरी पोळ्या झाल्यावर तुमचा स्वैपाक संपायचा. इथून पुढे तुमची देवपूजा व्हायची. आधी करायला बहुतेक वेळ झालेला नसायचाच. पूजा, जप झाल्यावर मग तुम्ही आपलं जेवण वाढून घ्यायचं. बहुदा दुपारचे दीड-दोन झालेले असायचे. केळीचं छोटं पान. त्यावर गार भाताचं ढेकूळ, भाजीच्या चार फोडी. भाकरी, एका छोटया भांड्यात आमटी, चटणी आणि एका छोटया तामलीत दोन–तीन पळ्या ताक. अन्नशुद्धी म्हणून चमच्याच्या टोकावरनं, एवढसं तूप बोटानं काढून घ्यायचं. कुणी तूप वाढायला आलं तर अहं, अहं म्हणून खुणेनं सांगायचं; जेवताना बोलायचं नाही ना ?

नुकतीच आम्ही गरम वाफेचा भात, चतकोरागणीक तूप घेऊन जेवलेल्या असू. तुमचं हे पान बघून माझ्या पोटात कसंतरी व्हायचं. आमच्या जेवणाच्या मानानं मला ते कदान्नच वाटायचं. हात धुवायला जेवण झाल्यावर, मागीलदारी गेलात की मग तुम्हाला तिथं खूप वेळ लागायचा. पुष्कळ चुळा भरायच्या. तुळशीच्या काडीनं सगळ्या दातातले अन्नाचे कण स्वच्छ काढायचे. तोंडात खरकटं राहू नये ही कल्पना सोवळ्यासाठी होती. पण त्यामुळे तुमचे दात शेवटपर्यंत किती टणक राहिले. हे तुमचं होईपर्यंत मी चुलीपुढचा पसारा आवरून, शेण लावून स्वच्छ करत होते. आणि मागल्या दारी येत होते. मग तुम्ही म्हणायचंच, 'कशाला ग ताटकळत बसतीस रोज ? आपलं काम झालं की, जावं बाहेर. काही


हार्दिक शुभेच्छा
भारतातील सर्वात मोठी सहकारी सूत गिरणी

◇◇
◇◇

दि डेक्कन को. ऑप. स्पिनिंग मिल्स लि.

इचलकरंजी, जि. कोल्हापूर

दर्जेदार सुताचे उत्पादक

| | | |
|---|---|---|
| वि. ह. म्हाळे | म. वि. दातार | ग. कृ. कांबळे |
| जनरल मॅनेजर | व्हा. चेअरमन | चेअरमन |

शिवणं, टिपणं, दुसरं काही असलं तर करावं. मी केलं असतं तेवढं.'

मी नुसतं हसायची. पण मनात म्हणायची, पहाटे चार पासून तुमचं सारखं चालू आहे. आणि आता जेवल्यावर चुलीपुढचंही तुम्हालाच ठेवून मी आराम करू ?

याबद्दल मला एकदा इशाराही मिळाला होता: 'काय ग, वन्संची मर्जी धरून असतीस म्हणे ?'

खरं तर हा मला टोमणा होता. पण एकदम लक्षातच आलं नाही. लक्षात आलं एवढंच की, वन्संची मर्जी हा काय विनोद आहे ? मी चटकन् म्हणून गेले, 'वन्संची मर्जी ? त्यांना कुठं आहे मर्जी ?' सासूबाई हसल्या. म्हणाल्या, 'बरं, बरं. जा.'

घरात ज्यांच्या हाती सत्ता असते, त्यांची मर्जी राखायची असते आणि जे उपेक्षित आहे त्याच्याकडे आपणही दुर्लक्ष करायचं असतं. म्हणजे अधिकारी व्यक्ती आपल्यावर प्रसन्न राहाते. हे राजकारण मोठ्या कुटुंबातून चालतं. मला हे जमलंच नाही, आपला तो स्वभाव नाही. त्यामुळं काही चुकलं असं वाटत नाही.

□

आक्का, आता आधी तुमची क्षमा मागते. इथून पुढे मी जे काही लिहिणार आहे, ते म्हणजे तुमच्या वाट्याला आलेल्या उपेक्षा अपमानाबद्दलच आहे. त्या आठवणी सांगताना जर मी कुणाला दोष दिला, तर खरंच मला क्षमा करा. कारण कोणत्याही घडलेल्या चुकीच्या गोष्टीबद्दल तीनतीनदा बोललेलं तुम्हाला मुळीच आवडत नाही. वरचेवर उगाळून दोष देत बसलेलं अगदी आवडत नाही. 'झालं होऊन गेलं; गंगेला मिळालं. पुन्हा कशाला बोलायचं?' ही तुमची विषय संपवण्याची पद्धत.

एकच गोष्ट शेकडो वेळा घोकत राहाणाऱ्या आमच्या घरात तुम्ही अगदीच कशा वेगळ्या ?

आता मी ज्यांच्याबद्दल थोडं आश्चर्यानं, थोडं निराशेनं बोलणार आहे, त्या माझ्या सासूबाईंची पण क्षमा मागते. कारण माझ्याशी त्या कधी वाईट वागल्या नाहीत. उलट भरपूर कौतुकच केलं आहे. माझंच काय सगळ्याच सुनांचं केलं आहे. म्हणून त्यांची पुन्हा एकदा क्षमा मागते.

तुमच्याकडून आयुष्यभर इतकी जिव्हाळ्याची सेवा करून घेऊन सुद्धा तुमच्याविषयी त्यांच्या मनात थोडीसुद्धा आपुलकी किंवा मनाचा उदारपणा कसा आला नाही ?

मी म्हणते, आतड्याची माया म्हणतात ती नसेल. पण सुनासुद्धा परक्याच ना ? मग सुनांच्या एक-शंभरांश सुद्धा कौतुक किंवा मनाचा उदारपणा तुमच्या वाट्याला त्यांच्याकडून का बरे येऊ नये ? तो. काकांच्या सारख्या आदरणीय व्यक्तीचा सहवास चोवीस तास मिळून सुद्धा. तुमच्याकडून हरतऱ्हेची सेवा, सुख मिळून सुद्धा. असा हा ऋणानुबंध म्हणायचा ?

आक्का, सगळ्या कुटुंबाची सेवा तुम्ही केलीच आहे. पण व्यक्तिशः माझ्यावर तर तुमचे डोंगराएवढे उपकार आहेत. आणि ते माझ्याने कधीच फिटणार नाहीत. मी उपकार म्हटलेलं तुम्हाला मुळीच आवडणार नाही. कारण जे केलंत ते सारं आई होऊनच जसं काही केलं आहे. म्हणून तर माझा जीव कळवळतो हो.

असं वाटतं, पन्नास वर्ष प्रामाणिकपणानं, अत्यंत जिव्हाळ्यानं घरासाठी कष्ट उपसलेत. त्याची अंशतः फेड म्हणून तरी एकादी गोष्ट तुम्हाला करावीशी वाटली तर, 'यमू, कर बरं तुझ्या मनात आहे तर, किंवा एखादी गोष्ट घे तुला हवी तर', असं म्हटलं असतं, तर तेव्हढ्यानं सुद्धा तुम्हाला किती आनंद वाटला असता. वास्तविक तुम्ही इतक्या निरीच्छ आणि निस्पृह होता की दुसऱ्याला तुम्ही कधी काही मागतच नव्हता. अशाच एक-दोन आठवणी आता सांगणार आहे.

असं वाटतं आक्का, कशाला मुलीच्या जन्माला आलात ? मुलगा झाला असतात तर मुलांच्या बरोबरीनं वाटणी घेऊन, शिकून-सवरून मजेत राहिला असतात, आणि तुमच्या या थोर स्वभावामुळं कितीतरी लोकोपयोगी कामं करून कीर्ती मिळवली असतीत. उत्तम शिक्षण घेणं तर तुम्हाला मुळीच अवघड नव्हतं. नक्कीच घेतलं असतं, कसलीही संधी नव्हती तरी. कधी-कधी सासरी जायला मिळे, तेव्हा छोट्या पुतण्याजवळ बाराखड्या शिकलात. वाचायला शिकलात. तुम्हाला शिक्षण थोडंच अशक्य होतं ?

शिक्षणावरून आठवण झाली. एकदा म्हणालात, 'पुण्याला कर्व्यांनी आमच्यासारख्या मुलींसाठी शाळा काढलीय म्हणे ! पण त्यावेळी मला कोण पाठवणार होतं !' हे तुम्ही म्हटलंत, तेव्हा मी एकदम चमकले होते. तुमच्या स्वाभिमानी मनाला परावलंबनाचा काटा रात्रंदिवस किती सलत होता, हे लक्षात आलं. पण पुण्यात सुद्धा कर्व्यांना किती विरोध झाला, मग जमखंडीसारख्या मागासलेल्या गावात एवढं धाडस कोण करणार होतं ? काकांना तरी कसं शक्य होतं ?


हार्दिक शुभेच्छा


**दि कॉसमॉस को. ऑप. अर्बन बॅन्क लि.**

मुख्य कार्यालय

६१२ सदाशिव पेठ, कुंटे चौक, पुणे ३०

आमच्या अन्य शाखा

पर्वती ◈ खडकी ◈ कोथरुड ◈ गोखलेनगर ◈ चिंचवड ◈ विठ्ठलवाडी ◈ औंध



तुमच्या पहिल्या 'माहेरवासाच्या' आठवणी सांगताना मी म्हटले की, घरात घडत असलेल्या गोष्टी काकांच्या कशा लक्षात आल्या नाहीत, हे कोडं मला सुटत नाही. अजून सुटलं आहे असं नाही. पण थोडंसं असंही वाटतं, त्यांना वाटलं असेल, की 'मुलीचं भाग्य तर संपलंच आहे, सारा जन्म जायचा आहे. सगळ्या लौकिकाच्या दृष्टीनं, देवाधर्माच्या वातावरणात कष्ट करीत आहे. करू दे. आपलं तसं लक्ष आहेच.'

काकांना सुद्धा लहानपणापासून आई नव्हतीच. पण एक म्हणजे ते मुलगा होते. त्यामुळे तुम्हाला आलेले अनुभव, येऊ शकतात हे त्यांना कळलंही नसेल. कळणं शक्यच नव्हतं. कारण आई नव्हती तरी गंगावहिनी सारखी गृहिणी घरात असल्यावर वाईट अनुभव येणारच कसा? शिवाय माजघरापलिकडे काका मुळीच लक्ष घालत नव्हते. त्यामुळे त्या 'राज्यात' असं काही घडत असेल याची कल्पना त्यांना आली नसेल.

त्यातून तुम्ही मुलखाच्या भित्र्या. आपण काही काकांना सांगायचा प्रयत्न केला आणि आपल्यावर खोटेपणाचा 'गहजब' झाला तर आपली बाजू घ्यायला कोण होतं? काकांना आपलं खरं वाटलं नाही, आणि त्यांचं मन विटलं तर? त्यांचा आधार आहे, तोही नाहीसा होईल. त्यापेक्षा आपणच सोसावं. घरात बोलाचाली झाली, भांडणं झाली तर गडी-माणसांत, शेजाऱ्या-पाजाऱ्यांत आपल्या सज्जन पित्याला कमीपणा येईल, दुःख होईल. त्यापेक्षा सहन करायचं, चोखपणानं वागायचं, सावध राहायचं, आणि आपल्या वडिलांची सेवा देवाप्रमाणं करायची, असं ठरवून टाकलंत.

ती. काकांचा स्वभाव अतिशय संयमी, गंभीर, अबोल होता. दोन शब्दांनी भागत असेल तर तिसरा शब्द बोलायचे नाहीत. कधी कुणावर टीका करायचे नाहीत. स्वतः केलेल्या उत्तम कामाविषयी सुद्धा बोलणार नाहीत. त्यांच्याबद्दल आदर फार वाटायचा पण धाकही वाटायचा. तसाच तुम्हालाही वाटत असेल. आपलं वागणं काकांना आवडत असेल ना, असंही वाटत असेल. होय, वाटत होतंच. त्यांनी आपल्याबद्दल दोन शब्द तरी बोललेले आपण ऐकावेत, अशी एक प्रकारची भूक तुमच्या मनाला होती.

त्यांची अशीच एक आठवण सांगितलीत. एकदा कोणी गृहस्थ काकांना भेटायला आले होते. बराच वेळ बोलत बसले होते. बोलताना तुमचं नाव ऐकू आलं म्हणून दाराआड कानोसा घेत उभ्या राहिलात. खरं तर मनात भ्याला होतात, आपल्याबद्दल काही वाईट तर सांगत नसतील ना म्हणून. पण तुमच्याबद्दल कोण कशाला वाईट सांगेल? पण मन भित्रं. ते गृहस्थ चांगलंच सांगत होते. तुमच्या मायाळू, कष्टाळू स्वभावाविषयी बोलत होते. संयमित, निस्वार्थी वागणुकीचं कौतुक करत होते. हा तुमचा घराबाहेर पसरलेला लौकिक होता. कौतुकानं ते काकांना अगत्यानं सांगत होते. काकांना अर्थातच समाधान झालं असणार. मग काकांनी त्यांना दोन शब्दात दिलेलं उत्तर ऐकलंत.

'पिल्लू वाघाचंच आहे.' एवढ्याशा शब्दात काकांनी तुमचा गौरव केला होता. हे मला सांगतानाची तुमची नजर मला अजून आठवते आहे. तुम्ही मनात अगदी धन्य झाला होतात. तुमचे वडील फार बोलत नसले तरी मनातून तुमच्यावर संतुष्ट आहेत, प्रसन्न आहेत, एवढं समाधान तुम्हाला मिळालं होतं. आता आणखी त्यांच्याकडून तुम्हाला काही नको होतं.

ती. काकांचा स्वभाव धार्मिक आचाराविषयी फार श्रद्धाळू होता. पण त्यांचं आचरण त्याचं महत्व समजून असायचं, उगीच कर्मकांडाचं अवडंबर कधीच नसायचं. पूर्ण संयम पाळून श्रद्धेनं पूजन, अर्चन, दान असं चालायचं. मी सासरी आले. त्यापूर्वीच ते नोकरीतून निवृत्त झाले होते दिवसांतून व्यवहारातलं बोलणं गरज असेल तेवढंच असे. पण बराच वेळ वाचन, चिंतन, अभंग म्हणणं असाच जायचा. वर्षातून वरचेवर धार्मिक गोष्टींसाठी, पूजेसाठी जेवणावळी होत, त्या सगळ्या तुमच्यामुळे यथासांग होत. वरची कामं बाकीच्या सुना करीत. पण पहाटेपासून शुचिर्भूतपणे जी पाकसिद्धी व्हायची ती केवळ तुमच्यामुळेच. ही जाणीव काकांना नक्कीच असावी. संयम आणि श्रद्धा यांचा आदर्श त्यांच्यामुळे तुमच्यासमोर नेहमीच होता.

ती. काकांचं व्यक्तिमत्व खरोखर आदरणीय होतं. व्यवहाराला चोख, प्रामाणिक, अधिकारावर असताना कामाचा उरक इतरांनी धडा घ्यावा इतका उत्तम आणि पैशापासून पूर्ण अलिप्त. संसारातील कर्तव्य व्यवस्थित पार पाडली. पण नंतर त्यात गुंतून राहिले नाहीत. संस्थानात निरनिराळ्या अधिकारांवर कामं केली, पण सगळ्यात यशस्वी झाले होते. या कर्तृत्वाबद्दल घरी कधी बोलत नसत. त्यांच्या कामाच्या काही आठवणी तुम्हीच मला सांगितल्या होत्या.

एकदा नगरपालिकेत कामाचा सगळा गोंधळ झाला होता. काकांना व्यवस्थापक नेमलं होतं. त्यांनी भरभरा चौकशी आखून एकेक खातं सुरळीत चालू केलं. पण सर्वात आधी सफाई कामगारांचे पगार व्यवस्थित सुरू केले. त्या गरिबांचे पगार सुद्धा तुंबले होते. या गोष्टीमुळं त्या लोकांच्या मनात काकांबद्दल कायमची आपुलकीची भावना राहिली.

पुढे बऱ्याच वर्षांनी काकांनी जव्हा जगाचा निरोप घेतला त्यावेळी अपरात्र असूनसुद्धा ही गोरगरीब माणसं त्यांच्या अंत्यदर्शनाला आली होती. त्यांच्या गर्दीनं घरासमोरचं पटांगण भरून गेलं होतं.

पहिल्या महायुद्धात बरेचसे संस्थानिक ब्रिटिशांना मदत म्हणून युद्धावर गेले होते. एक वर्ष जमखंडीचे राजे गेले होते. ते येईपर्यंत त्यांचे सर्वाधिकार राजांनी काकांना दिले होते, कारण ते त्यांचे मुख्य सचिव होते. स्टेट सेक्रेटरी किंवा चीफ ऑफिसर असं त्यांच्या अधिकारपदाचं नाव होतं. सर्व संस्थानची व्यवस्था दिवाणांच्याकडे होती. पण राजांची स्वत:ची काही खाती असत. जमखंडी हायस्कूलचं मॅट्रिक पर्यंतचं शिक्षण विनामूल्य होतं. फी नव्हती आणि गरीब विद्यार्थ्यांना मधुकरी मिळे. ती साधारण दोन वेळा पुरेशी असे. एक मोठी मूद भात, दोन मोठ्या जाड भाकरी व मोठं ओगराळभर आमटी असं मिळायचं. अशा गोष्टींच्या व्यवस्थापकांना त्यातून काही मिळवावसं वाटतं. मग गरिबांची कुचंबणा.

चार्ज घेतल्यावर एक दिवस मधुकरीचा स्वैंपाक चालू होता, तिथं अचानक जाऊन पोचले-म्हणाले, आज मी इथंच जेवणार आहे. सर्वांची धावपळ उडाली व दहा वाजले होते, १०–१५ मिनिटांत विद्यार्थी यायला लागणार होते. त्यांचा उद्देश होता, कोठीत धान्य मंजूर होतं त्याप्रमाणं मुलांना भरपूर मिळतं की नाही हे पाहणे. भाकरी लहान होत्या. आमटी अगदी पातळ होती. हे पाहिल्यावर व्यवस्थापकांना योग्य ती समज दिली. म्हणाले, ग़रीब विद्यार्थ्यांच्या अन्नात वासना ठेवू नका. बावांनो, पाप आहे ते.

काका केव्हा येऊन उभ राहतील याचा नेम नसल्यामुळे ही मधुकरी व्यवस्थित झाली.

अशा कितीतरी गोष्टी. तुम्ही सांगितल्या होत्या.

त्यांच्याबद्दलची तुमची भावना व्यक्त करणारी एक आठवण इथंच सांगते हं. त्यांच्या आयुष्याच्या अखेर-अखेरचीच आहे. घरी, अंबुराव महाराजांना ( एक साक्षात्कारी पुरुष, कै. गुरुदेव रानडे यांचे गुरुबंधू ) बोलावलं होते चि. गंपाभाऊजी (गंपा उर्फ गणपती : आक्काचे कनिष्ठ बंधू) आणि मी टाईफाईडनं आजारी होतो, डॉक्टरनी आशा सोडली होती. सत्पुरुषांच्या अंगाऱ्यानं तरी उतार पडेल, ही भावना म्हणून ते आले होते. घरी सगळ्यांनी गुरुपदेश घेतला होता. पण काकांनीं घेतला नव्हता. नाना (नाना (शंकर) : आक्काचे क्रमांक २ चे भाऊ) आग्रह करीत होते. 'काका, तुम्ही नाम घ्या. मन:शांतीला बरं असतं.' तुम्ही माझ्या अंथरुणाशी बसला होता. थोडसं स्वत:शीच म्हणालात. 'कशाला बावांनो त्याना आग्रह करत आहात ? अरे, त्यांच्याकडूनच दुसऱ्यांनी उपदेश घ्यावा, अशी त्यांची योग्यता आहे. त्यांना कशाला हवं आहे नाम ? सारा दिवस त्यांचा नामस्मरणातच जातो आहे.'

ती. काकांच्याविषयी तुम्ही सांगितलेल्या गोष्टी, आणि घरी बोलल्या जाणाऱ्या अशा कितीतरी लहान-मोठ्या गोष्टी आहेत की त्याबद्दल, त्यांच्या आम्हा कुटुंबियांना नेहमीच आनंद, आदर आणि अभिमान वाटतो. माझ्या लग्नानंतर काका अवघे तीन वर्षंच होते. पण तेवढ्या थोड्या दिवसांत सुद्धा माझ्याबद्दल त्यांना वाटलेला


## दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप लॅन्ड डेव्हलपमेंट बँक लि., मुंबई

**दूरध्वनी क्रमांक– ३५९६६४।६५।६६** **टेलिग्राम–" मॉर्गेज "**

खास योजना तयार करून त्यायोगे समाजाच्या दुर्बल घटकास मदत करते. तसेच मागास जाती व जमातीस खास सवलती बॅन्केने जाहीर केल्या आहेत.

वेळेवर हप्ते भरणाऱ्या कर्जदार सभासदांस अनेक सवलती बॅन्केने जाहीर केल्या आहेत.

◈ ◈ ◈ ◈

बॅन्क शेतीविकासाच्या विविध योजना आपल्या ६ विभागीय कार्यालये, २६ शाखा व ३१० उपशाखा मार्फत कार्यान्वित करीत आहे.

शेती विकासाच्या कर्जासाठी कृपया वरील ठिकाणी संपर्क साधावा.

**किसनराव साबळे पाटील**
जिल्हा संचालक
जिल्हा शाखा सातारा

**शामराव भि. पाटील**
अध्यक्ष

जिव्हाळा आणि त्यानी केलेलं कौतुक याचा अनुभव मी घतला. त्या दोन-तीन आठवणी सांगते. कारण, आक्का, त्या तुमच्या समोरच घडल्या आहेत.

लग्न झाल्यावर पहिल्या चातुर्मासात मुलींनी रोज गोपद्म काढायची असत. गोपद्मांच्या खालच्या बाजूला एकीकडे गाय-वासरू आणि दुसऱ्या बाजूला हत्ती काढायचा असे. त्यावेळी बायका रांगोळीनं जे गाय-वासरू काढीत, त्यांच्याखाली गाय-वासरू असं लिहिलं तरच ओळखणारं असे. पहिला आषाढ म्हणून मी माहेरी आले होते. त्यामुळे गोपद्मांना आरंभ तिथंच झाला. मी माझ्या आजोबांना म्हटलं, 'भाऊ, मला हत्ती काढता येतो. हुदग्याच्या वेळी शिकले. पण गाय येत नाही. शिकवता ?'

भाऊंना गाय काढण्याचं काय अवघड ? त्यांनी एका मिनिटात माझ्यापुढं रांगोळीतून गाय-वासरू काढून दाखवलं. मग सात-आठ वेळा काढून, गिरवून मी गाय-वासरू बऱ्यापैकी काढायला लागले. जमखंडीला श्रावणात आल्यावर गोपद्मं काढली. थोड्याच वेळात काका आंघोळ करून पूजा करायला आले. देवघराशेजारीच रांगोळी काढलेली होती. त्यांनी सासूबाईंना हाक मारून म्हटलं, 'अग, तुझ्या सुनेनं गाय-वासरू किती चांगलं काढलं आहे बघ बरं.' मोठ्या माणसांनी, त्यातून सासरच्या, असं कौतुक केलं तर किती आनंद वाटतो. लहान वयात हे कळायला, त्या काळातली सासुरवाशीणच व्हायला पाहिजे.

एकदा सासूबाईंनी भीमाताईंना पत्र लिहायला सांगितलं. तसं लिहिलं आणि पत्ता इंग्रजीमध्ये लिहिला. बाहेरच्या बाजूला एक डेस्क होतं. तिथं ठेवलेली पत्रं आण्णांचा शिपाई पोस्टात टाकायचा. म्हणून तिथं ठेवून आत आले. काकांनी पत्र वाचलं, आणि हाक मारली. 'शारदाबाई, इकडे ये.' मनात थोडी भीती वाटली. ते कामासाठी सुद्धा सुनांना कधी बोलवत नसत. भीत भीत गेले. ते म्हणाले, 'पत्ता कुणी लिहिला ?'

'मीच.'

'जोगचं स्पेलिंग चुकलं आहे. ज ओ ए जी लिहिलं आहेस. उच्चार 'जूग,' 'जोअग' असा होईल. जे ओ जी लिहावं.' ते हसतच बोलत होते. मी हळूच म्हटलं, 'पुण्याला प्रो. जोगांच्या नावाच्या पाटीवर मी तसं वाचलं होतं.'

'असं ? पण चूक आहे ते, जे ओ जी लिहावं.'

मी तुम्हाला मागल्यादारी येऊन सांगितलं, अशी गंमत झाली. 'असं,' तुम्ही म्हणालात, 'काकांना तुझं कौतुक वाटलं ग. नवी सून यस्फ्यस् लिहिती म्हणून,' आणि तुम्हीही मजेनं हसलात.

घरातली प्रकृतीनं सर्वात रसरशीत असलेली, आम्ही दोन मुलं, दोन्ही तापाच्या तडाख्यात सापडलो होतो, मी आणि गंपाकाका. एक दिवस कमी झालेला ताप पुन्हा उलटला. दुपारी काका माझ्या उशागती येऊन बसले. सासूबाई पायगती बसल्या होत्या. बहुतेक


किशोर ट्रॅव्हल्सच्या आकर्षक सहली

जून – बद्रीनाथ–केदारनाथ
ऑगस्ट – युरोप सहल
१६ ऑक्टो. – जपान सहल
(साउथईस्ट एशियासह)

योग्य हवामानात आतापर्यन्त स्वदेश, विदेशात ३८० सहली काढणारी पुण्यातील अग्रेसर ट्रॅव्हल्स कंपनी. माहितीपत्रक मागवून आपणही सहलीचा निरागस आनंद लुटा.

**चौकशी** : ६९१ बुधवार, दक्षिण मुखी मारुती समोर, पुणे २ फोन ४४८३०९



*With Best Compliments From*

**M/s. Jay Fabrics**

777 Sadashiv Peth
(Opp Vishrambagwada Post Office)
Poona – 411030.

Retail Shop
– The R. B. M
Poona Mills Ltd.

त्यांच्या डोळ्यातून पाणी येत होतं. कारण सासूबाईंनी हातानी नको अशी खूण करून म्हटलं, '.ती घाबरेल. चला, बाहेरच जाऊ या.' उठता उठता काका म्हणाले, 'एकेक आवरायला पहातो आहे. देवाच्या मनात काय आहे काही कळत नाही.' तुम्ही बाजूला तोंड करून डोळे टिपलेत. तेही मला दिसलं. पण आक्का, खरं सांगू का, मी मात्र त्यावेळी अगदी मजेत पडलेली असायची. त्यावेळचं सगळं मला चांगलं आठवतं. पण मी काळजी वाटण्यासारखी आजारी आहे, असं मात्र मला कधीच वाटलं नाही.

तऱ्हे-तऱ्हेची दृश्यं दिसायची, स्वप्नं पडायची, आणि तुम्हाला सांगत रहायची. आणि मनाच्या एका कोपऱ्यात असंही वाटायचं, सासुरवाशीण मी, आणि कामं सोडून चक्क गादी घालून झोपले आहे कशी.

एकदा सासूबाई काकांना बोलता बोलता सांगत होत्या. 'फडक्यांच्या माणसांनी काही हौस केली नाही. रुखवत केवढसं आणलं होतं. मी भीमाताईच्या लग्नात वीस शिप्तरं मांडली होती.' काका म्हणाले, हे बघ, तिची आई असती तर त्यांनी पंचवीस शिप्तर मांडली असती.' खरं तर काकांचा स्वभाव अगदी गंभीर. या बायकी गप्पांत ते कधी भाग घ्यायचेच नाहीत. पण यावेळी एक वाक्य बोलून त्यांनी ती टीका बंद केली. मला आई नाही, याची जाणीव त्यांनाच जास्त होती, हे मला त्यावेळी कळलं आणि त्यांच्याविषयी आणखीनच आदर, आपुलकी वाटायला लागली.

□

आक्का, माझं लग्न झाल्यानंतर, सात-आठ महिन्यांनी असेल, एक दिवस पहिली जेवणं झाली होती. बाकीची अजून व्हायची होती. तुम्ही आज आणखी एक वेगळा सैपाक केला होता. वरण, भात, खीर, पोळी असा. आणि बारा वाजता एक विद्यार्थी दिसणारा ब्राह्मण जेवायला आला. त्याच्या पानात ते स्वतंत्रपणे केलेले जिन्नस वाढलेत. विडा–दक्षिणा देऊन, डोळे मिटून त्यावर पाणी सोडलंत, आणि त्यांना जेवायला सांगितलंत. थोरल्या बाई (आण्णांच्या पत्नी, रुक्मीणीबाई) देवघरात देवाला गंधफुलं वाहात होत्या. त्यांना मी विचारलं, 'आज वन्संनी कशासाठी ब्राम्हण जेवायला बोलावला आहे ? कसलं उद्यापन आहे ?'

'आज त्यांच्या नवऱ्याची पुण्यतिथी आहे. सासरचे पैसे यायला लागल्यापासून त्या हा दिवस पाळतात.'

थोरल्या बाईंनी गंभीरपणे बोललेले ते शब्द ऐकले, आणि पोटात कसं गलबलून आलं. आक्का, सासरचे म्हणजे अगदी हक्काचे पैसे यायला लागल्यापासून तुम्ही ही उघड श्रद्धांजली वाहायला लागलात. तोपर्यंत ती तिथी मनाच्या पेटीत जपून ठेवली होतीत. आणि दरवर्षी त्यांना अश्रूंची अंजली वाहात होतात. केवढी थोर तुमची निष्ठा, श्रद्धा, भावना !

आक्का, तुम्हाला अभागी करून, घाईघाईनं पुढं गेलेला तो तुमचा भाग्यवान पती, खरोखर तुमची वाट पाहात स्वर्गाच्या दारातच थांबला असेल, तुम्ही जाईपर्यंत –

तुमच्या मनःचक्षुपुढे असलेली वीस-एकवीस वर्षांच्या नवतरुणाची मूर्ती, आणि पन्नाशी उलटलेल्या तुम्ही, डोळे मिटून त्याचं स्मरण करीत, विडा–दक्षिणेवर पाणी सोडत आहात, हे दृश्य मी अजून विसरत नाही.

मग तुम्हाला कसा विसर पडेल ?

त्यावेळी तुम्ही लहान असलात, मोकळेपणी वागत नसलात तरी सहा–सात वर्षं सहवासात होतात. तुम्ही दोघंच एकमेकांची आहात हे मनात भिनलेलं होतं.

आक्का, मी जाणते तुमच्या मनाची अवस्था.

याच्याच आसपासची तुमच्या दुखण्याची एक आठवण आहे. जमखंडीत 'गुद्दव्वा'ची साथ आली होती. गुद्दव्वा हे कानडी नाव. दुखणं बरंचसं फ्ल्यू सारखचं असायचं. पण तेव्हा हे नाव नव्हतं. खूप अंग दुखायचं, तापही जोरात यायचा, आणि सांधे धरायचे. आमच्या घरात तुम्हालाच या दुखण्यानं पकडलं. दुपारचं जेवण केलंत आणि बाळंतिणीच्या खोलीत एक चौघडी टाकून लवंडलात.

संध्याकाळी पाहिलं तर सपाटून ताप आला होता. सारखं हुश्श हुश्श करीत होतात. अंग फार दुखत होतं, रात्रभर झोप आली नाही. पहाटे पाण्याचा शोष पडला होता. मी म्हटलं, 'पाणी देवू थोडं ? की कॉफीच आणू ?'

'किती वाजले ?'

'पाच वाजले. आताच पाणी गेलं, कॉफी करून आणते.' 'आणशील ग. पण आता आंग धुते. पारोशानं मला काही नको.'

'पण ताप किती अंगात ? अंग धुवून आणखी काही झालं म्हणजे ?'

'अग, काही होत नाही. सगळी दुखणी मला भिऊन पळतात. घाल बाई आंघोळ. फार तहान लागलीय.'

तुमच्या निश्चयापुढं माझं काय चालणार होतं ? हात धरून तुम्हाला उठवलं, हळूहळू आधार देत न्हाणीघरात नेलं. बाळंतिणीसाठी हंडा तापला होता. बोटापासून पायापर्यंत तुमचे सगळे सांधे दुखत होते. हातपाय थरथरत होते. खाली बसवेना. उभंही राहाता येईना. वाकत–वाकत कशातरी भिंतीला धरून उभ्या राहिलात. अंगावरून हात फिरवत मी कशातरी पाच–सहा तपेल्या पाणी तुमच्या अंगावर ओतलं, आणि हात धरून हळूहळू आत आणलं. स्वैपाकघर आल्यावर म्हणालात, 'थांब.' तिथल्या कोनाड्यात तुमचे देव होते. तशा ओलेत्यानं तुम्ही तिथं गेलात. उभ्या–उभ्या देव धुतलेत. कापऱ्या हातानं हळद–कुंकू वाहिलंत, आणि म्हणालात, 'आज एवढंच रे बावांनो.' मी नुसती नवलानं पाहात होते. कोरडं पातळ गुंडाळून कसंबसं तुम्हाला अंथरूणावर निजवलं. तुम्हाला इतका थकवा आला होता की अंथरूणावर अगदी निपचित पडलात.

आक्का, दुसरी कुणीही बाई अशा अवस्थेत उठलीसुद्धा नसती. पण तुम्ही त्या अंग धुण्यासाठी आणि देवपुजेसाठी, त्या बिचाऱ्या शरीराची कसली फरफट केलीत ! का त्या शरीराला असं जरबेत ठेवलंत ?

पाण्याचं भांडं तोंडाशी धरून मी म्हटलं, 'एक दिवस नुसतं पाणी, दूध, कॉफी घ्यायला अंग धुतलं नाही तर चालत नाही ? कसलं हे अंग धुणं ?'

आता तुम्हाला बसवतसुद्धा नव्हतं. पडल्या-पडल्याच पाण्याचे घोट घेतलेत. नंतर म्हणालात, 'बाई ग, शक्य तेवढं पारोश्यानं काही घेऊ नये अशी इच्छा आहे. आता देवाच्याच मनात नसलं, एकादवेळी बेशुद्ध झाले तरच पंचाईत आहे. पण तुम्हाला सगळ्यांना सांगून ठेवते. कुणीही जवळ असलात तरी अंगावर दोन तांबे पाणी घातल्याशिवाय पाणी सुद्धा पाजू नका. अग कशासाठी भ्यायचं ? मरणासाठीच ना ? माझ्यासारखीला त्याचं कसलं भय ?' अशा तुम्ही हटयोगी.

नको पण, नाही म्हणत तसं. खरोखर परमेश्वरानं सुद्धा हा तुमचा हेतू पुरवला. जगाचा निरोप घेतलात, त्यावेळी तुम्ही गंगास्नानालाच निघाला होतात. शेवटपर्यंत शुचिर्भूत राहाणाऱ्या अशा तुम्हाला हटयोगी म्हणायची माझी लायकी तरी आहे का ? पण त्या लहान वयात मला वाटलं होतं हो, किती हा अंगधुण्याचा हट्ट म्हणून. पुढे सुद्धा तीन-चार दिवस हीच तऱ्हा चालू होती. शेवटी ते दुखणंच कंटाळलं आणि तुम्हीं बऱ्या व्हायला लागलात. पुढे किती दिवस तरी तुमचे गुढगे बसता-उठताना दुखायचे. तुम्ही कश्शाला दाद देत नव्हता ती गोष्ट निराळी !

तुमच्या आजारीपणात आठवडाभर तुम्ही करीत होता ती नेहमीची कामं मी केली, आणि घरादाराकडून शाबासकी मिळवली. (कारण पार्वतीबाई, नानांच्या पत्नी, बाळंतीण होत्या.) तरी सैपाक नव्हेच. तो थोरल्या बाईंनी केला. पाणी पहाटे चार वाजता यायचं. अवघं वीस मिनिटं. थेंबसुद्धा वाया जाऊ न देता भरून घ्यायचं. एवढ्या मोठ्या सैपाकघराचं चूल-पोतेरं, सडा-रांगोळी, पाण्याचा हंडा तापवणं. बाळंतिणींची शेकशेगडी वगैरे. वय लहान, कधी केलं नव्हतं, मनाची खूप तारांबळ झाली. पण निभावलं. त्यावेळी काकाही होते. सर्वांनी खूप कौतुक केलं. पण आक्का, तुम्ही हेच काम, सैपाकही करून आणखी कितीतरी गोष्टी जन्मभर करीत आलात. शाबासकी राहू दे, साधी जाणीव तरी याची आमच्या घरानं ठेवली का ?

आक्का, तुमची देवपूजा खरोखर बघण्यासारखी असे; त्यात कर्मकांड अगदी नसायचं. खरा भक्तिभाव.

प्रथम सासरी आले तेव्हा तुमच्या पूजेच्या वेळी मी रिकामीच असायची. तिथंच भिंतीशी बघत बसायची. किती उशीर झाला तरी पूजा अगदी संथपणानं चाले. थोडीशी जमीन सारवून घ्यायची. त्यावर रांगोळीनं 'श्री गणेशाय नम:' मग चार गोपद्मं, शंख, चक्र, गदा, स्वस्तिक, रोज ज्ञानकमळ काढायचं. देव काढून पाटावर घ्यायचे. संकल्प सोडायचा, आम्ही महापूजेला सोडतो तसा. चोवीस नावं. तिथी, वार नक्षत्रांचा उच्चार करून. सगळं कसं पद्धतशीर चालायच. हा पूजापाठ तुम्ही हौसेनं पाठ केला होता. बेल, तुळस, दुर्वा, फुलं सगळं असायचं. पण एखाद्या ठिकाणीं बेल-तुळस मिळाली नाही तर तुम्ही बेल, तुळशीची खोडं जाड फाटक्या) समळीत ठेवली होती. गंधाबरोबर ती उगाळायची. कशाची अडवणूक नाही. देवाचं स्नान होताना कधीतरी बाळकृष्ण, गणपती उडी मारायचे. मग त्यांच्याशी तुमचा संवाद चालू व्हायचा, 'एवढी कसली गडबड रे बाबांनो, भूक लागली होय ? आंघोळ झाली की नैवेद्य, आधी कसा बरं द्यायचा ?' धूप, दीप, नैवेद्य झाला की, मग डोळे मिटून जप व्हायचा. त्यानंतर पोटपूजा. बहुतेक दोन वाजलेले असायचे. चहा-कॉफी काही नाही. अंग धुतल्यावर दोन भांडी पाणी फक्त प्यायलेलं असायचं. मी एकदा विचारलंच, 'भूक कशी नाही लागत ?' तुम्ही म्हणालात 'मोठेपणी कामाच्या नादात भूक लागलेली समजत सुद्धा नाही. कळेल तुला पुढं.'

शक्य तो ओळीनं सांगायचा बेत केला. पण एका आठवणीतून दुसरी आठवते, आणि मग मागं-पुढं होतंय. होईना का, इथं कुठं परीक्षा द्यायची आहे ? हा तर तुमच्याशी माझा संवाद चाललाय. आणि बरं तर हे तुमच्या आठवणीचे मणी ओढतेय जपमाळेसारखी.

□

एकदा तुमच्या सासुबाईंची आठवण सांगितली होतीत. त्या तुम्हाला दोन-तीन वर्षांनी आपल्याकडे रहायला बोलावून घ्यायच्या. त्या असेपर्यंत चार-पाच वेळा गेला होतात. नुकतंच आंब्याचं लोणचं घातलं होतं. त्यावेळी मोठी बरणी सोवळ्यात असायची. आणि वाढण्यासाठी लहान सटात बरणीतून काढून देत. तसं काढून देण्यासाठी त्यांनी तुम्हाला देवघरात बोलावलं. लोणचं काढून दिल्यावर म्हणाल्या, 'पार्वती, हात कर पुढं.' तुम्ही म्हणालात 'कशाला' तर त्या म्हणाल्या, 'लहानपणी आवडतं ग असं खायला. तर सगळ्यादेखत खाणं बरं दिसत नाही. नशीबाला भोग आले आहेत. इथंच खा हवं तेवढं. आणि हात धुवून मग घेऊन जा.' लहान वयात संन्यास वाट्याला आला होता ना.

आठवण दिसायला किती साधी. पण त्यातला अर्थ तुमच्या दृष्टीनं खूप मोठा होता. तुमची आवड ओळखून आपुलकीनं विचार करणारी ही सासू तुम्हाला किती थोर वाटली असेल ?

असा अनुभव त्यावेळी तुम्हाला भेटत नव्हता. मग याची अपूर्वाई वाटणारच.

तुमच्या सांगण्यावरून वाटतं की तुमच्याबद्दल त्यांना फार माया वाटायची. चांगल्या घरची मुलगी आपल्या घरी आली, पण सर्वार्थानं बुडाली. आपण सुद्धा तिच्यासाठी काही करू शकत नाही म्हणून फार वाईट वाटायचं. शेवटच्या क्षणी त्यांनी आपली देवपूजेची चांदीची उपकरणी तुम्हाला द्यावी असं आपल्या मैत्रिणीला सांगून ठेवलं होतं.

□

आता मागं पडलेल्या आठवणी सांगते हं.

कमलच्या (शारदाबाईंचे पहिले अपत्य) जन्माआधी दोन महिने तुम्ही श्रीशैल्य मल्लिकार्जुनच्या यात्रेला गेला होतात. पंधरावीस दिवसांची एकंदर यात्रा होती. आळीतल्या, गावातल्या बऱ्याच बायका आणि थोडे पुरुष जाणार होते. स्वतःच करून जेवायचं असल्यामुळं तांदूळ, पीठ, तिखट, मीठ, उपासाचे जिन्नस, साबुदाणा, दाणे, रताळ्याचं पीठ असं सगळं एकमेकींना विचारून तयारी झाली. पातळं, शाल, अंथरुण घेताना तुम्हाला वाटलं, रेशमी मुकटाही घ्यावा. एकादे वेळी पातळ वाळलं नाही तर, उशीर झाला तर तो नेसून सैपाक करता येईल. म्हणून तुम्ही सासूबाईंना म्हणालात, 'मी मुकटा घेते बरं का.'

'नको बाई, इथं कुणाला लागला तर? उगीच खोळंबा.' 'बरं बरं; नाही नेत.' तुम्ही पाठ फिरवून चालायला लागलात. कारण निघायची वेळ झालीच होती. तुम्ही असले शेकडो अपमान संयम ढळू न देता पचवलेले. जणू काही घडलंच नाही असं दाखवून त्या यात्रिकांत मिसळलात. पण आम्हा दोघी-तिघींना अगदी बेचैन झालं. तुम्ही गेलात आणि आम्ही म्हटलं, 'मुकट्यासाठी कशाला नको म्हटलं. त्याना फार उपयोग होता आणि इथं कशाला लागणार आहे.'

एवढं तिघींनी म्हटल्यावर सासूबाईंनाही जरा विचार पडला. म्हणाल्या, 'अजून मोटार निघाली नसेल. दोघीजणी जाऊन या बाई, उगीच वाईटपणा नको.'

आम्हाला फार बरं वाटलं. मुकटा घेऊन घाईनंच आम्ही त्या घरी पोचलो. सगळ्या बायका जमल्या होत्या. उत्साहानं बोलत होत्या. तुम्हीही त्यात मिसळून गेला होतात. स्पेशल मोटार इथूनच निघणार होती. थोरल्या बाई म्हणाल्या, 'मुकटा आणलाय बरं का. बांधून घ्यावा.' 'अग, पण मला नको आहे, रुक्मिणी. काही अडत नाही त्यावाचून हो' 'पण मी वेळेवर आणला आहे ना? घ्यावा आता.'

'हे बघ, आणला आहेस ठीक झालं. आता तसाच परत ने घरी, म्हणजे झालं. मला पुन्हा बोलायला लावू नको. समजलं ना? उगीच उन्हात तळतळत आलात. आमची वेळ झालीच आहे. जा आता घरी.'

शेजारच्या तंगूआत्या तिथंच होत्या; त्या म्हणाल्या, 'यमूआक्का, घे ग ठेवून, येवढ्या घाईनी पोरींनी आणलाय.' 'तंगू, नको आग्रह करू. माझ्या अंगी लागणार नाही ते.'

तुमच्या स्वाभिमानाची ओळख मला पुरेपूर पटली. खरंच किती साधी गोष्ट. जुना विरलेला मुकटा तुम्ही मागितला, म्हणून त्याला पैठणीचं मोल आलं का? खरं तर तुमच्यासाठी एखादा नवाच घेऊन ठेवायला हवा होता. काय हरकत होती? पण इथं तर जुनंच नाकारलं!

आता जी आठवण सांगणार आहे ती याच्या आधी दोन वर्षांची आहे. नवरात्र आलं होतं. दरवर्षीप्रमाणं सैपाकघर वरपासून खालपर्यंत झाडून सारवायचं होतं. त्यासाठी गडी कामाला आला होता. चातुर्मासात तुम्ही रोजच जमगीला (जमखंडीपासून पाच मैलांवरील कृष्णातीरीचे खेडे) कृष्णास्नानाला जात होतात. तशाच आज गेला होता. मला वाटतं, जाताना सासूबाईंकडून इशारा मिळाला होता की आज सैपाकघर सारवायचं आहे. 'सोवळ्यातल्या वस्तू काढायच्या असतात. लवकर ये. नाहीतर जाऊच नको.' तुम्ही म्हणालात, 'गडी सुरुवात करील तोपर्यंत मी येतेच आहे. उगीच तेवढ्यासाठी नेम कशाला मोडायचा?'

तुम्ही गेलात. पाच मैल जाऊन परत यायचं म्हणजे नऊ तरी वाजायचेच. तशा तुम्ही आलात. पण त्यापूर्वी दहा मिनिटं गडी भिंत सारवत आला तिथं खूप उंच एक कोनाडा होता. त्यात तुमच्या लक्षाच्या रुद्रवातींची टोपली होती. तुम्ही नदीला गेलात हा राग होताच. त्यात अजून परत आला नाहीत याची भर पडली.

आणि काय?...... त्या वातींचं टोपलं सासूबाईंनी पारोशानंच उचललं आणि मागच्या पडवीत नेऊन ठेवलं. आणि गड्याला म्हणाल्या, 'घे बाबा सारवून. उगीच खोळंबा नको.'

लक्षाच्या वातींना आंग धुतल्याशिवाय शिवायचं नसतं. चुकून कुणी हात लावू नये म्हणून तर इतक्या उंच ठेवल्या होत्या. पाचदहा मिनिटांत गडी कुठं निघून जाणार होता? अजून दुसरीकडं सारवायचं होतंच ना?

फारच झालं तर तेवढी जागा तशीच ठेवून तुम्हाला सारवायला सांगायची. पण एवढा विचार कुणी कशासाठी करायचा? राग आणि विचार एकत्र कधी राहतात?

एवढ्यात तुम्ही आलात. आल्या—आल्याच तुमचं स्वागत. 'यमू, तुझ्या वाती मी ठेवल्या ग मागल्या पडवीत. हो, उगीच खोळंबा किती करायचा?'

तुमच्या मनावर केवढा आघात झाला असेल? नदीहून दमून आला होतात पण काही क्षणातच मनावर ताबा मिळवलात. खरोखर तुमच्या संयमानं मी चकीत झाले. तुम्ही थंडपणानं म्हणालात, 'ठेवल्यात ना उचलून? बरं झालं.' श्रीराम, श्रीराम म्हणत आपलं ओलं पातळ वाळत घालण्यासाठी हातात घेतलंत. पुन्हा एका अक्षरानं याचा कधी उच्चार केला नाहीत.

भीमाताई दिवाळीत आलेल्या होत्या. कुठे माडीवर होत्या वाटतं. नाहीतर त्यांनी वातींना नक्की शिवू दिलं नसतं. आईचा आवाज ऐकून त्या खाली आल्या, आणि हे समजल्यावर अशा संतापल्या.

'आई, असं केलंस कसं तू? किती कष्टाच्या ग वाती तिच्या. आमच्याकडून कधी कापूस सुद्धा विचारून घेत नाही. तुमच्या सगळ्यांच्या वाती, सगळ्यांची कामं करून, फावल्या वेळात ती आपला लक्ष करती आहे. अगदी स्वतःच्या रुद्रवाती. अकरा सुताच्या चाळीस हजार वाती.'

त्यांचा स्वर अगदी रडवेला झाला होता. 'तिनं सारवली असती ग तुझी दोन-तीन हात भिंत नंतर.'

भीमाताई आईची अत्यंत लाडकी लेक. ती सुद्धा रागावली म्हणजे आपलं बरंच चुकलं. हे आता सासूबाईंना जाणवलं.

मग लगेच गुरुजींना बोलावणं धाडलं.

थोड्या वेळात ते आल्यावर त्यांना म्हणाल्या, 'गुरुजी, हे बघा. चुकून पारोशानं लक्षाच्या वातींना शिवले आहे. पण माझ्या एवढ्या म्हातारीला पारोश्याचा दोष आहे का? लहान मूल आणि म्हातारं माणूस सारखंच की नाही?'

गुरुजी वर्षानुवर्षाचे उपाध्याय. त्यांना पेचच होता. काय सांगायचं? ते आपली चुळबूळ करू लागले.

म्हातारं माणूस आणि लहान मूल, सारखं असेल काही बाबतीत, पण मुळीच समजत नसणं आणि भरपूर समज असणं, यातल्या फरकाचं काय?

'सांगताय ना?'

'हो, तसा फारसा दोष नाही. शिवाय चुकून झालेला दोष नाही म्हणतात.' एवढं म्हणून गुरुजी उठले. आणि मग, 'यमू, तुला वाती लावायला हरकत नाही म्हणे ग. गुरुजी, लावू दे मग वाती?'

'लावू देत, लावू देत. वडीलांनी सांगितलं, यात सगळं आलं.'

यावेळी तुम्ही पन्नाशी उलटलेल्या होतात. व्रत–वैकल्यशिवाय तुमच्या मनाला समाधानाची दुसरी गोष्ट नव्हती. इतक्या वर्षाचा अनुभव घेतल्यानंतर तरी या गोष्टींचा आदर, जाणीव राखायला हवी होती. पण अविचाराला त्याचं काय?

नंतर त्या वाती तुम्ही 'लक्षात' मिळवल्यात की, परत पहिल्यापासून केल्यात मी विचारलं नाही; तुम्ही सांगितलं नाहीत.

आता आणखी एक आठवण, याच प्रकारची. आणखी चार–पाच वर्षांनंतरची. पण यावेळी मी समक्ष नव्हते. पुढे कधीतरी ती मला सांगितलीत. तुमच्या जमान्यात स्वत: केलेल्या व्रतांचं उद्यापन करणं हा एक हौसेचा, समाधानाचा समारंभ असे. तुम्ही व्रत खूपच केली होती. वयाची साठी जवळ आली होती. तुम्हाला वाटलं आता उद्यापन करुन घ्यावं. म्हणून तुम्ही आपले सासरचे पैसे साठवून ठेवले होते आणि एक दिवस गुरूजींना बोलावणं धाडलंत. ते आल्यावर त्यांना म्हणालात, 'गुरूजी, व्रताचं उद्यापन करावं म्हणते आहे. चांगला दिवस बघून सांगा.'

'यमूआक्का, फार चांगली गोष्ट आहे; दिवस बघून सांगतो हं, काकू, तुमचं काय म्हणणं आहे? साधारण कधीचा दिवस ठरवू या?'

'हे बघा गुरूजी. माझ्यानं आता दगदग होत नाही. खोकून खोकून जीव हैराण होतो. होमाचा धूर व्हायचा, आताशा अगदी सोसत नाही मला. याशिवाय हे आणवा ते आणवा, हा आणखी व्याप. त्यातून तुम्हाला काय करायचं ते करा.'

गुरूजी : 'होम काय, तासभर चालेल. तेवढा वेळ तुम्ही मागच्या दारी बसा म्हणजे झालं. असं बघा काकू, यमानाक्कांचीही एक महत्वाची धार्मिक गोष्ट आहे. होऊन जाऊ दे.'

तुम्ही म्हणालात, 'काकू, तुमच्यापर्यंत कसला व्याप आणत नाही रुक्मिणी, पार्वती बघतील सगळं.'

'बघा बाबा, मी काय सांगायचं ते सांगितलं आहे.'

गुरूजी : 'यमनाक्का, मग काय ठरवायचं?'

तुम्ही शांतपणे उठलात. पैसे घेऊन आलात. आणि अगदी थंडपणे म्हटलंत, 'गुरूजी, मी व्रतासाठी ठेवलेले हे पैसे. तुमच्या हातावर ठेवते आहे आणि नमस्कार करते. तुम्ही नुसतं म्हणा, तुमच्या व्रतांचं उद्यापन झालं, तुमच्या व्रतांचं उद्यापन झालं. म्हणजे माझं समाधान होईल.'

'यमनाक्का, असं कसं हो?'

'गुरूजी, वेदोनारायणाच्या मुखानं आलं की, परमेश्वरानं सांगितल्यासारखंच आहे. म्हणा बरं.'

'अग बाई यमू, होऊ दे ग तुझ्या मनासारखं. मी काय महतारी बसेन मागच्या दारी खोकत. घरी कमी का आहे कशाला.'

'काकू, घरात तिजोरीत तसं पुष्कळ आहे. पण मलाच आता इच्छा राहिली नाही.' आणि तो विषय तुम्ही संपवतात.


आक्का, घरात किती वेळा होम–हवन झालं, समारंभ झाले. तुम्ही सर्वात आपुलकीनं भाग घेतलात. आनंद मानतात. चुलबाईची सगळी कामं अगत्यानं पहाटेपासून केलीत. हे तुमचं एकच कार्य अगत्यानंच व्हायला पाहिजे होते. तुम्हाला आहेर सुद्धा करायला हवा होता. पुण्याहवाचन भाऊ–भावजयीनंच ठेवायचं होतं. पण व्रताची पूजा करताना 'मम' म्हणणार होता तुम्ही, उद्यापन तुमचं होतं. हाच तुमचा आनंद होता. समाधान होतं. पण तेवढंही समाधान घरानं तुम्हाला दिलं नाही असा कसा हा ऋणानुबंध? कसा या घराचा न्याय? आक्का, या आठवणीनं तुमच्या मन:संयमाचा अगदी कळस झाला.

□

आता सांगणार आहे तुमच्या सहवासातल्या माझ्या स्वत:च्य आठवणी, आणि सत्संग म्हणजे काय याचा घेतलेला अनुभव.

आक्का, तुकाराम महाराज म्हणतात, 'नलगे मुक्ति धनसंपदा! संतसंग देई सदा' किती खरं आहे. मुक्तीचा अनुभव कुणी घेतला? आहे? पण नुसत्या धनानं समाधान मिळणे शक्य नाही, याचा अनुभव असतोच. माझ्या भाग्यानं संतस्वभावाच्या अशा तुमच्या सहवासाचा आनंद मी जो घेतला, तो माझ्या आयुष्यातला सर्वोत्कृष्ट आनंद आणि समाधान आहे.

आक्का, मी प्रथम सासरी आले तेव्हा तुमच्यासारखं माणूस तिथं होतं, याचा मला केवढा आधार वाटला. याची तुम्हाला सुद्धा कल्पना यायची नाही. पंधरा वर्षांचं माझं वय 'कुणाच्या ओळखी नाहीत. स्वभाव माहीत नाहीत. मन धास्तावलेलं असायचं. नव्या मुलीविषयी एकदम आपुलकी तरी कुणाला कशी वाटणार?



ती कशी वागते, शहाणी आहे की वेंधळी आहे,. इकडंच सर्वांचं बहुतेक लक्ष असतं. इथून पुढेच माया द्यावी, माया घ्यावी या न्यायानं काही माणसं जवळ येतात. काहींच्या स्वभावाचं गोत्र आपल्याशी जुळतं म्हणूनही जवळ येतात. काहींनी मात्र गैरसमजाचेच चष्मे लावलेले असतात. त्यांना कुठलंच काही सरळ दिसत नाही. आणि म्हणून मग आपलंही गोत्र त्यांच्याशी जमत नाही. आयुष्य हे असंच असतं, पण हे सगळे पुढचे अनुभव. सुरवातीला मात्र या नवीन मुलीला, आपल्याला कुणीतरी आपुलकीनं वागवावं, आधार द्यावा असं वाटतं, आणि सुदैवानं तुम्ही तशा मला भेटलात. सासरच्या दृष्टीनं तशी मी सुदैवीच म्हणायची. काम करण्याचा मला कधीच कंटाळा नव्हता. त्यामुळे सासूबाई खूष होत्या. ती काका एवढे गंभीर, पण त्यांच्यासुद्धा आपुलकीचा, जिव्हाळ्याचा अनुभव त्या थोड्या दिवसांतही पुष्कळदा मिळाला. पण ही मोठी माणसं. तुम्ही सुद्धा वयानं तशाच मोठ्या, नाही का ? पण तुम्ही मला, आईसारख्या मायेनं, मला इतकं जवळ केलंत की, त्या घरातला माझा वेळ कामाशिवाय असेल तो तुमच्याच सहवासात जायचा. तुमच्याजवळ काही करीत असले किंवा नुसतीच बसले, तरी गार सावली देणाऱ्या वृक्षाखाली बसल्यासारखं कसं शांत वाटायचं.

लग्न झाल्याला वर्षच झालं. आणि टॉयफाईड झाला. चाळीस दिवस ताप आणि न्यूमोनिया.

अंथरुणाला खिळलेल्या मुलीचं तुम्हाला काय करावं लागलं नसेल ? ती. नाना डॉक्टर, औषधं हे सर्व पहायचे. अतिशय जिव्हाळ्यानं पहायचे. इतर सर्व मंडळी आपापल्या परीनं काळजी वाहात होतीच. घरात एकाच वेळी दोन पेशंट होते. चि. गंपाभाऊजी आणि मी. दोन्ही सिरीयस. आक्का, यावेळा आजाऱ्याच्या सर्व परीनं ज्या खस्ता तुम्ही काढल्यात, त्या आईच्याच मायेनं. खरोखर एकटीनंच माझं सर्व सर्व केलंत. तेव्हापासून तुमच्या माझ्यातलं नणंद–भावजयीचं नातं संपूनच गेलं.

तापाला तेरा दिवस झाले आणि पहाटे पाय गार पडायला लागले. त्यावेळी घाबरून बाहेर गेलात. काकांना म्हणालात 'तिच्या माहेरी कळवा हो. पोरीचं लक्षण बरं दिसत नाही.' दुसरे दिवशीच वडील आले. आजी आली आणि निदान तुमची रात्रपाळी कमी झाली. पण शुश्रूषेचं सारं काम शेवटपर्यन्त तुम्हीच करीत होता.

आजाऱ्याशी हसत-खेळत वागायचं काम जणू उपजतच शिकून आला होतात. सकाळी तोंड धुवायला पाणी घेऊन आला की म्हणायचं, 'कुठल्या भाषेत काय काय बोलतीस ग बाई, रात्रभर ? एक शब्द कळेल तर शपथ. हं, भरा चूळ आणखी एक. आज कॉफी छान केलीय बघ. आणखी थोडी द्या म्हणशील.' रात्रभर तुम्हाला जागरण झालेलं असायचं. न्यूमोनिआचं माणूस बडबडतंच म्हणे. शुद्धी, बेशुद्धी अशी उघडझाप चालू असायची. म्हणूनंच ती स्वप्न मजेची. रोज तुम्हाला सांगत बसायची मी. दूध, कॉफी, पाणीसुद्धा वाईट लागायचं, म्हणून मग काहीतरी विनोद करत वळेवळे पोटात घालत होता. आक्का, तुमच्यासारखं शुश्रूषा करणार भेटलं, तर एकाद्याला आजारी पडायचीच हौस वाटायची.

कमलचा जन्म झाला तेव्हा माझी प्रकृती अगदीच वाईट होती. पहिले आठ दिवस तर जेवण, कपडे बदलणं एवढ्यापुरतं सुद्धा उठवत नव्हतं. जमखंडीचा उन्हाळा आणि अशक्तपणा. पहाटे घसा तहानेनं अगदी कोरडा व्हायचा. पण मी पाणी मागायच्या आतच, पावणेचार वाजता, सुंठसाखरेची गोळी, तुपातली खारीक आणि एक मोटं फुलपात्र भरून कॉफी घेऊन यायच्या. पुन्हा आणखी म्हणायच्या ' अनशापोटी पाणी पिऊ नको बाई. हे खाऊन कॉफी घे, म्हणजे तहान भागेल. अगदी सात वाजता भात करून आणते बघ. मग हवं तेवढं पाणी पी. एकदा हाती–पायी धड हो. म्हणजे माझा जीव भांड्यात पडला.' रोज वाटायचं, आईनं तरी यापेक्षा जास्त काय केलं असतं ? गेल्या जन्मीचे लागेबांधे. नाहीतर काय म्हणायचं याला. याच पहाटेच्या वेळी ती. सासूबाईंच्यासाठी भांड भर गरम दूध, साखर घालून, त्यात थोडं लोणी घालून आणायच्या- 'काकू रात्रभर खोकल्यानं झोप नाही. घेऊन बघा बरं, बरं वाटेल,' असं म्हणत त्यांना देत होतात.

कमलच्या वेळीच नाही तर मंगलच्या वेळेपर्यंत हाच जिव्हाळा आणि हीच शुश्रूषा. आक्का, तुमच्यामुळेच तर मी धट्टीकट्टी राहिले. कुणाकुणाची किती बाळंतपणं केलीत, सगळी मिळून ? पण सगळीकडे तोच भाव, तोच जिव्हाळा. स्वप्नात सुद्धा कधी कंटाळा केला नाहीत. (कमल, निर्मला, इंदू व मंगल : शारदाबाईंच्या मुली)

दोन-दोन महिने बाळंतिणीचं सगळं काम करीत होतात, पण ते श्रम जसे काही मजेत चालले आहेत असं वातावरण ठेवत होतात. आंगाला तेल लावणं, म्हणजे इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत, विनोद करत चालायचं. काही आठवणी, घराण्याची माहिती, जुनी राहाणी, मला वाटतं, या तेल लावण्याच्या वेळीच ऐकल्या आहेत. पहाटेची शांत वेळ असायची. सगळं घर झोपेत असायचं. त्यामुळं स्वस्थपणे चालायचं. तुमच्या कृश हाताचा तो प्रेमळ स्पर्श मला अजून जाणवतो. त्या दहा–बारा दिवसांच्या बाळाचं न्हाणं

करताना, तेल लावायला सुरवात झाल्यापासून त्याच्याशी बोलायला सुरवात. इंदूला कुणीतरी म्हणालं, नाक नकटं आहे. मग त्या चिमुरडीशी बोलायचं; 'नाक नकटं काय म्हणता? उद्या शालू नेसून, लफ्फेदार हजाराची नथ घालून आली म्हणजे बघा म्हणावं. रंग गोरा आहे ना? तो तरी मानाल?' निर्मलेला नहायला घालताना एकदम तपेलीभर पाणी डोक्यावर घातलेलं सोसलं नाही. घुसमटली. तुम्हालाहि थोडं भय वाटलं. पण त्या दिवशी बोलला नाहीत. दुसरे दिवशी म्हणालात. 'तुझी पोरगी भारीच बाई बोभाटेखोर. एक तपेली पाणी घातलं तर लागली की वरवर जीव करायला. मी सुद्धा जरा घाबरलेच. तुला काल सांगितलं नाही. कारण मग ठीक होती. नाजुक नार कुठली!' मग तिचा एक पापा. 'आज मात्र तुला पाणी फुलपात्रानं घालायचं बरं का लबाडे.'

इंदूच्या जन्माच्या वेळी कन्यागत सुरु होतं. तुम्ही वर्षभर रोज कृष्णास्नानाला जात होता. कारण दर बारा वर्षांनी प्रत्यक्ष गंगा कृष्णेला भेटायला येते अशी भाविकांची श्रद्धा आहे. म्हणून या वर्षी कृष्णास्नानाला फार महत्व होतं. रोज पाच मैल जाणं-येणं नको म्हणून तुमच्या बऱ्याच मैत्रिणी जमगीला विठोबाच्या देवळात रहायलाच होत्या. तुम्हीही गेला होतात. पण मी आले त्यामुळं तुम्हाला घरी यावं लागलं. मग घरूनच रोज जात होता.

खरं म्हणजे तुम्हाला किती कटकट वाटायला हवी होती? काय या यांच्या नेहमीच्या अडचणी? आपल्या मनाचं समाधान बघायला वेळच केव्हा मिळणार कुणास ठाऊक? असं वाटलं असतं तर काही नवल नव्हतं.

पण तुम्ही सर्वसामान्य माणसासारख्या नव्हताच. या घरची सगळी माणसं तुमचीच होती. त्यांच्या अडचणी तुमच्याच होत्या. तुमची लेकच माहेरी आल्यासारखं स्वागत केलंत.

पहाटे पाचला स्नानाला निघायचं म्हणजे त्या आधी पाणी भरणं, आणि बाळंतिणीचं सगळं व्हायचं म्हणजे तुम्ही साडेतीनला उठून पाणी तापवत होतात. मला त्याच वेळी उठवत होता. तेल लावणं, माझं न्हाणं, इंदूचं नहाणं होईपर्यंत पाच वाजायला यायचेच. तेवढ्यात वैद्यांच्या आनंदीकाकूंची हाक यायची. 'यमनाक्का, झालं का?'

पुष्कळ वेळा इंदूचं नहाणं अजून व्हायचं असायचं. मग त्या म्हणायच्या, 'यमनाक्का, मी पाणी घालते, पुसते. तुम्ही आतलं काही राहिलं काय ते बघा.' मग तुम्ही माझ्यासाठी कॉफी करायला गेलात की बाळाला पुसत आनंदीकाकू मला म्हणायच्या 'शारदाबाई, यमनाक्का तुला फार वाखाणतात बघ.' 'कशासाठी हो?' 'सगळं कसं समजुतीने करून घेतेस; काही विसरलं-राहचलं, तक्रार नाही. साडेतीनला उठवलं, तरी उठतेस; कुरकुरत नाहीस.'

'काकू, अहो, या वयात त्यांच्याकडून ही सेवाचाकरी करून घ्यायलाच मला किती संकोच वाटतो. पण त्याशिवाय उपाय नाही


*With best compliments from*

**ASMITA TRAVEL SERVICES**

1365 Sadashiv peth,
Nava Vishnu Chowk,
Bajirao Road, Pune – 411030

Phone : 444562



*With Best Compliments From*

**RUCHIRA RESTAURANT**

Pune

म्हणून करून घ्यायचं. यात जर मी तक्रार केली तर आनंदीकाकू पाप लागेल मला. एवढं जिवाभावानं करताहेत तेच माझ्यावर केवढं ऋण आहे.'

एवढ्यात कॉफी, डिंकाचा लाडू, सुंठ, सगळं आणून तुम्ही स्टुलावर झाकून ठेवायचं. आणि निघताना रोज एकदा म्हणणार, 'निघतोय ग आम्ही, आणि हे बघ, मुलीला पाळण्यात ठेवताना जपून ग बाई. मध्ये शेगडी असते; पेंगशील-बिंगशील, एकादे दिवशी झोप झालेली नसते. मला रोज रस्त्यात काळजी वाटते बघ. कुठं पदराला हाय लागेल काही झालं तर. माझं कृष्णामाईचं अंगधुणं (स्नान) निघायचं.'

'अगदी काळजी करू नये. निर्धास्त जावं. मी झोपलेच नव्हते. पेंगणार कशी ?'

'म्हणजे ? तीनवाजेपर्यन्त अभ्यासच करीत होतीस ? धन्य ग बाई तुझी.' आनंदीबाई नवलाने बघायला लागल्या.

मी म्हटलं, 'काकू, अहो त्या मजेनं म्हणतात. अभ्यास कुठला ? तिथं वाचायला काही मिळत नाही. इथं नाना खूप पुस्तकं आणून देतात. (कुणीहि वाचलं तरी ती नानांना फार आनंद व्हायचा. अच्युताला म्हणायचे, 'तुझं झाल्यावर काकूला दे रे. म्हणावं, वाचा. मी पुष्कळ आणून देईन.' ती. नानांची ही आठवण मी कधीच विसरणार नाही.) दिवसा अच्युत वाचतो. रात्री सगळी झोपल्यावर मी वाचते. दिवसा सगळी रागावतील, डोळे बिघडतील असं म्हणतील म्हणून रात्री वाचते. दिवसा झोपते भरपूर. मग तुम्ही दोघी बोलत-बोलत कृष्णाबाईला निघायच्या. (अच्युत: नानांचा मुलगा. विश्वास व सदानंद : शारदाबाईचे मुलगे)

किती काम असलं, श्रम पडले, तरी मागं-पुढं करून पण हे गंगास्नान तुम्ही एकदा सुद्धा चुकवलं नाही. त्यात तुमचा खराखरा आनंद होता.

सदानंदच्या वेळेस आपण अष्टयाला होतो. जमखंडीला श्रमाची कामं तुम्ही करीत होतात. पण बाकीची जबाबदारी तुमची नसायची. अष्ट्याला आता सारीच जबाबदारी तुमच्यावर होती. जिन्नस आणवणं, काही गोष्टी ठरवणं, पण तुम्हाला जशी नवी उमेद आली होती. सदानंदचा जन्म रात्री एक-दीडचा आहे. सगळं स्थीर-स्थावर व्हायला अडीच-तीन वाजले. मी म्हटलं, 'झोपा आता, जाई सुद्धा झोपेल.' हो म्हणालात आणि वातीकरायला बसलात.

मी म्हटलं, 'हे काय चाललंय ?'

'अग, मुलगा झाला ना ? वंशाचा दिवा आहे तो. दिवे लावते.' आणि पाच वातींची समई लावून ठेवलीत.

आक्का, तुमच्या मनातला भावच इतका सोज्वळ की, तुमच्या आशीर्वादाने दोन्ही मुलगे वंशाचे दिवे शोभताहेत.

आणखी दोन दिवसांनी म्हणालात, 'तुझ्याकडे नवे खण आहेत का ग ? ट्रंकेत आहेत ना ?' 'कशाला हवेत ? 'दोन टोपरी शिवते, एक कुंची शिवते.' मी म्हटलं, 'एकटीवर सगळं पडतं. शिप्या-


कॉन्टिनेन्टल

# चार नवी प्रकाशने

वाचनीय व संग्राह्य

**शिकस्त : ना. सं. इनामदार**

पेशवाईतील गोपिकाबाईंच्या शोकात्म जीवनाची हळुवार कहाणी

पृ. डेमी ५९०. चित्रे पद्मा सहस्रबुद्धे
किंमत साठ रुपये

**चेरीचा मळा : आंतोन चेखोव**

एका जगद्विख्यात् नाटकाचा मूळ रशियन वरून केलेला सुरस अनुवाद : सुमती कानिटकर

रेखाचित्रे : उज्वला मेहेंदळे

(पृष्ठे क्र. ९६. किंमत दहा रुपये)

**अर्ध-कथानक : बनारसीदास**

साडे तीनशे वर्षांपूर्वीच्या एका मजेशीर हिंदी आत्मकथेचा भावगर्भ अनुवाद

वसंत पटवर्धन.

रेखा चित्रे : गणेश पाई

(पृष्ठे क्र. १२०. किंमत पंधरा रुपये)

**उलगा-उलग : श्रीपाद जोशी**

एक प्रांजळ आणि परखड आत्मवृत्त.

(पृष्ठे ३७६. किंमत चाळीस रुपये)

**कॉन्टिनेन्टल प्रकाशन**

विजयनगर, पुणे ३०

कडे टाकावीत.' 'झालं का? तो काय नीट मापाची शिवणार आहे? आणि, टोपरी शिवण्याचं एवढं काय? ओझं का उचलायचं आहे?' आणि मग शिवायला बसलात. उलट–सुलटं होत होतं. बरेच दिवसात शिवलं नसेल ना? पण चिकाटीनं बसून सगळं शिवलंत अगदी छान.

एक पाचवीच्या पुजेला आणि एक षष्ठीपूजनाला घालायला दिलंत. घातल्यावर म्हणालात, 'बघ बरं कसं गोजिरवाणं दिसतं आहे. उगीच शिपी न् ब्रिपी हवा कशाला? हं, आता तुझ्या मामीला आणि बहिणीला पत्रं लिही, बारशाला यायला. सकाळी लवकरच या म्हणावं.'

मी म्हटलं, 'हे काय पहिलं–वहिलं का बारसं आहे? परगावला कशाला पत्रं लिहायची?'

'अग, नऊ मैलावर तर सांगली; परगाव कसलं? नंतर तुला भेटायला तरी येतीलच की नाही? मग वेळेला बोलावलं तर शोभा येईल. आणि आलेल्या बायका मला मदतच करतील.' तुमची साठी उलटली होती एकटीला श्रम होतील म्हणून मला भीती. पण तुम्ही ऐकलं नाहीत. पत्रं लिहिली. इथून नुकत्याच बदलून गेलेल्या गोगटे काकू सुद्धा तुमच्या मदतीला आदले दिवशीच आल्या.

माणसं जोडावीत ती तुम्हीच. गोगटे काकू तर जातानाच सांगून गेल्या होत्या, 'मी बारशाला येणारच, आक्कांच्या मदतीला, म्हणून. आणि त्याप्रमाणं त्या आल्याच. तुमचा तयारीचा उत्साह बघून मी खरोखर चकित झाले. भराभर जिन्नस आणवत होता. पाणी भरणाऱ्या द्वारकाबाई आणि जाई यांच्याकडून निवडून भरून ठेवत होतात. शांत करायची होती. गुरुजींना विचारून तीही तयारी करून ठेवलीत. आणि थाटात बारसं झालं.

दुसरे दिवशी सौ. चिमुताई, सौ. मामी, सौ. गोगटे काकू परत जायला निघाल्या. तर त्यांच्या डब्यात पेढे, लाडू स्वतः भरलेत. नवे खण आणवले होतेत. ते द्यायला सांगून, माझ्याकडून त्यांच्या ओटचा भरवल्यात आणि सगळ्यांना प्रेमानं निरोप दिलात. या वयात तुमचा हा उत्साह बघितल्यानंतर मग माझ्या मनात आलं की, जमखंडीला तुम्ही फक्त सांगितल्या कामाच्याच धनी होता. एखादी गोष्ट तुम्हाला हवी म्हणून तुम्ही करू शकत नव्हता. माणलाला ही सुद्धा एक भूक असते. पण ती कधी तुम्हाला मिळालीच नाही की, आपल्या हौसेनं आपण काही करावं.

यावेळी मात्र सर्वाधिकार अगदी तुमचा होता. तुम्ही म्हणाल तसं होत होतं आणि पार पडत होतं त्याचंच तुम्हाला समाधान वाटत होतं. एक मोठा कार्यक्रम एकटीच्या जबाबदारीवर नीट आखून व्यवस्थित पार पाडला होतात. त्याचा तुम्हाला आनंद होता. त्यामुळंच तुमचा मनाचा उत्साह तुमच्या वयाला बाजूला सारून तुमच्याकडून काम करून घेत होता का? सगळ्यांची सेवाचाकरी करण्याकरिता, सगळ्या नडी–अडचणी काढण्याकरिता कोडकौतुक पुरविण्याकरिता चंदनासारख्या अहोरात्र झिजलात.

तुका म्हणे आता, राहे उपकारापुरता.

☐

सदानंद चार महिन्याचा झाला आणि जमखंडीला जनार्दन-उपेंद्र (नानांचे मुलगे) यांच्या मुंजी ठरल्या. तुम्हाला बोलावणं आलं; तुम्हाला निघायला हवंच होत, पण सदानंदच्या जन्मापासून विश्वास तुमच्या इतक्या सवयीचा झाला होता की तुम्हाला सोडून तो पंधरा मिनिटं सुद्धा दूर राहात नव्हता. तुमचा सैपाक, पूजा, जेवण होईपर्यंत स्वैपाकघरातच भिंतीशी बसून राहायचा. संध्याकाळी देवाला केव्हा निघता याच्या पाळतीवरच असायचा. तुम्ही त्याला चुकवायला पाहात असायच्या, कारण वाटेत तो कडेवर बसायचा. तुम्हाला त्याचं वजन आता पेलत नव्हतं. किती वेळा त्याला चुकवायचा प्रयत्न केलात. पण १५–२० पावलं चालला नाहीत तोपर्यंत त्याला पत्ता लागायचा, आणि वाऱ्यासारखा धावत सुटायचा. 'आक्का, मी येतो ग. मी कडेवर बसतो म्हणत नाही. मला घेऊन जा. मी चालतो.' रोज ही गमत चालायची. झोपायला तर तुमच्याच जवळ. तुम्हाला कधी लवकर झोप लागली तर तंबूत शिरल्यासारखा हळूच तुमच्या पांघरूणात शिरायचा.


आणि आता तुम्ही निघाला होतात, सकाळ पासूनच 'मी येतो' म्हणत रडत होता जाताना तुम्ही समजावलंत; आम्ही सगळ्यांनी सांगितलं, 'आपण सगळीच मुंजीला जाऊ, मग आक्काला येताना घेऊन येऊ या.' कसातरी रडायचा थांबला. संध्याकाळपर्यंत अस्वस्थच होता. तुमच्या जुन्या पातळाचं एक मोठं चौकोनी फडकं होतं. संध्याकाळी ते पायरीवर अंथरून बसला. त्याचा मित्र खेळायला आला. त्याला सांगत होता,' विष्णू, माझ्या आक्काचं पातळ आहे हे' आणि त्या फडक्यावरून मायेनं हात फिरवीत होता. ते बघून माझ्याच पोटात कसंतरी झालं. लहान मुलं किती हळवी असतात!

होय, खरंच आहे हे.

पण आक्का, तुमची माया त्याला त्या जुन्या फडक्यात भेटत होती, हे सत्य केवढं मोठं आहे.

चार वर्षांपूर्वी विमल (विमल साठ्ये : नानांची मुलगी) मुंबईला भेटली होती. तुमचं अखेरचं वर्ष अलाहाबादेस तिच्या सहवासात गेलं. ती भेटल्यावर तुमच्या आठवणी निघाल्याच. ती सांगत होती: तिची मुलंसुद्धा, तिथं तुम्ही होता तोपर्यंत तुम्हालाच जशी बिलगून होती; झोपणं तर तुमच्या जवळच. विमल म्हणाली, 'आक्का कधी गादीवर, कॉटवर जन्मात निजणार नाही; तर मुलंही तिच्याजवळ खालीच झोपायची, दोन्ही बाजूला.' ती आणखी म्हणाली, 'तिथली थंडी किती कडाक्याची. आम्ही गरम कपडे घालून कुडकुडत होतो. आणि आक्का मात्र वर्षभर पहाटे गंगास्नान करून यायची!' श्री. साठ्ये वरचेवर म्हणायचे, 'आक्कांच्या जवर इच्छाशक्तिमुळंच

(पान नं ७२ पहा)



## हे कोण माहीत आहेत का? हे डॉ. सुरेश भाटिया

(एम.बी.बी.एस., एम.एस., एफ.आर.सी.एस.)

### अर्थात् शक्य आहे. विशेषकरून स्टेट बँकेच्या शिक्षण योजनेमुळे

आपल्या छोट्यांच्या बाबतीत आपण मोठी स्वप्नं पहातो. पण ती साकार करण्यासाठी पैसे लागतात.

आणि गरज भागवण्यासाठीच आहे ही स्टेट बँकेची शिक्षण योजना. तुमच्या मुलाच्या उच्च शिक्षणाची संपूर्ण आर्थिक बाजू चांगल्या रितीने सांभाळू शकेल अशी खास योजना! तशीच ती सोपी आणि सोयिस्कर सुद्धा आहे.

या योजनेत तुम्ही केव्हाही आणि कितीही रक्कम (द. म. किमान रु. २०) भरून सामील होऊ शकता.

समजा की, तुमचा बाळ २ वर्षांचा असताना, या योजनेत सामील होऊन तुम्ही द. म. रु. १०० याप्रमाणे फक्त दहा वर्षेपर्यंत पैसे भरलेत, तर तुमची एकूण ठेव झाली रु. १२,०००. परंतु तुम्हाला मिळतात रु. ४७,१८८.
रु. ५,१८८ तुमचा मुलगा सतरा वर्षांचा होऊन कॉलेजच्या उंबरठ्यावर उभा असेल तेव्हा त्याची फी, पुस्तके, इ. खर्चासाठी आणि ४२,००० रुपये त्यानंतरच्या पाच वर्षांत दरमहा ७०० रुपये याप्रमाणे हप्त्याहप्त्याने.

शिवाय, गरज लागलीच तर पुढेही भारतात अगर परदेशात उच्च शिक्षणासाठी स्टेट बँक कर्जसुद्धा देते.

तुमच्या नजिकच्या स्टेट बँकेच्या शाखेत चौकशी करा. तुमच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन ते तुमच्यासाठी सोयिस्कर व्यक्तिगत योजना आखतील.

**स्टेट बँक**

सुरक्षितता — एक सुखद भावना

CHAITRA-SBI-1065 MAR

# सातही रंग प्रकाशाला म्हणाले

● दत्तप्रसाद दाभोळकर ●

—तसे पाहिले तर एक लोकविलक्षण अद्भुत घटना !
—तसे पाहिले तर एक सहजसुंदर नैसर्गिक गोष्ट.
....या देशाच्या समृद्ध-संपन्न संस्कृतीचा वारसा सहजपणे सांगणारी !

वयाच्या साठाव्या वर्षी कोणी एक नाना देशमुख सारे काही सोडून लोककल्याणाकडे वळला.

—खरे सांगावयाचे तर नानांचा संसार तसा संन्याशाचाच संसार होता.

पण त्या वेळी नाना नानाजी होते. सत्तारूढ जनता पक्षाचे सरचिटणीस. संसदेचे सन्माननीय सभासद. केंद्रीय मंत्रिमंडळातील एक महत्त्वाची खुर्ची आपल्या स्वधर्माच्या विरुद्ध म्हणून सहजपणे नाकारणारे !

—नानाजी ! – संघ-जनसंघाचा हा चाणक्य किंवा नाना फडणवीस ! संघटनेवर विलक्षण पकड असणारा.

पक्षाच्या काचांमधून ही घटना पाहाणाऱ्यांना त्यात वेगवेगळे रंग दिसतात.

कोणाला ही नवी कामराज-योजना वाटते.


कोणाला यात गुरुजींच्या यतिकल्पनेचा गौरव आढळतो.

काही जाणकारांना विनोबा-जयप्रकाशांची आठवण येते.

काही जणांना हा नानाजींचा त्रागा वाटतो.

अनेकजण बुद्धिबळातील ही एक फार चांगली खेळी आहे असे म्हणतात.

कोणत्याच पक्षाची बांधिलकी न मानणारे तुमच्या-माझ्यासारखे लोक मात्र चक्रावून जातात.



## एक

नाना मात्र ठरल्याप्रमाणे ऑक्टोबर १९७८ पासून उत्तरप्रदेशातील गोंडा जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी स्वत:ला झोकून देतात. सारे काही विसरून. किमान तसे सांगत ! गोंडा हा उत्तरप्रदेशातील विश्वास बसू नये इतका मागासलेला जिल्हा. उत्तरप्रदेशच तसा मागासलेला. उत्तरप्रदेशात साक्षरतेचे प्रमाण २२ टक्के इतके कमी आहे. गोंडा जिल्ह्यात ते फक्त १४ टक्के होते. स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण चार टक्के इतकेच होते. उत्तरप्रदेशात साडेतीनशे महाविद्यालये आहेत; पण या जिल्ह्यात फक्त तीन महाविद्यालये होती. जिल्ह्यातील नव्वद टक्के कुटुंबांचे दैनंदिन उत्पन्न एक रुपया येवढे कमी होते.

त्यानंतर दोन–तीन वर्षांतच खूप काम झाले.–किमान आकडयांची घोडदौड सुरू झाली ! १९८१ साली प्रसिद्ध झालेल्या आकडयांप्रमाणे जिल्ह्यात या काळात एकतीस हजारांहून अधिक बोअरिंग विहिरी खणण्यात आल्या. पंधरा हजारांहून अधिक डिझेलवर

चालणारे पंप बसविले गेले. गोबरगॅस निर्माण करणारे १३० संच कार्यान्वित झाले. अंत्योदयाच्या कार्यक्रमातून १४०० हून अधिक कुटुंबांना फायदा झाला. कोंबडीपालन, डुकरे पाळणे, मासे पाळणे, ग्रामोद्योग, फळझाडे लावणे याबाबत सर्वसामान्य माणसाला मदत व मार्गदर्शन करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न झाले. शिक्षण आणि आरोग्य या दोन क्षेत्रांत नवे प्रयोग सुरू झाले.–होणाऱ्या कार्यक्रमांमुळे भलेभले पत्रकार चक्रावून गेले. हिंदुस्थान टाइम्सचे माजी संपादक आणि ख्यातनाम पत्रकार बी. जी. व्हर्गिस १७ ते १९ ऑक्टोबर ८१ या काळात गोंडा जिल्ह्यात भटकून आले. या कामाचा त्यांनी गौरवाने उल्लेख केला. एक नवी रोमांचकारक कृषिक्रांती या जिल्ह्यात होते आहे आणि दीनदयाळ संस्था त्या क्रांतीचे मार्गदर्शन आणि नेतृत्व करते आहे म्हणून त्यांनी भलावण केली. आपल्या १५ ऑगस्टच्या खास अंकात 'ब्लिटझ'ने लिहिले, 'गोंड्यात अक्षरश: चमत्कार घडताहेत! त्यागी आणि निष्ठावान कार्यकर्त्यांनी ते घडवून आणलेत.' २२ मे १९८२ च्या आपल्या लेखात लंडनच्या इकॉनॉमिस्टने बांबूचे नळ बनविण्याच्या व डिझेल, वीज यांच्याऐवजी बैलजोडीवर पंप चालविण्याच्या यांच्या प्रयोगाचे खूप कौतुक केले.

अश्वमेधयज्ञातील घोडा असा भरधाव सुटला होता. नानाजींनी राजकारण सोडले होते; पण राजकारण नानाजींना सोडत नव्हते ! संजय गांधींचे अपघाती मरण झाले, हा नानाजींनी घडवून आणलेला अपघात आहे म्हणून काही उच्चपदस्थांनी जाहीरपणे सांगितले. ज्या आरोपांची साधी चौकशीसुद्धा होत नाही त्या आरोपांना आपण बेजबाबदार आरोप म्हणतो ! त्याच सुमारास आणखी एक गोष्ट घडली. दिल्लीत मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या दीनदयाळ संस्थेच्या कचेरीच्या बाहेर नानाजींचा ड्रायव्हर भगतराम याचा सफाईने चाकू मारून खून करण्यात आला ! दोन महिन्यांची रजा संपवून तो त्याच दिवशी परत आला होता. खरे पाहता पाच मिनिटांनी नानाजी त्या ठिकाणी असणार होते. खुनी मिळाला नाही; पण चाकू इतक्या सफाईने फिरविलेला होता की, रक्ताचा एक थेंबही शरिराच्या बाहेर आलेला नव्हता. दीनदयाळ शोधसंस्थानचे प्रधान सचिव डॉ. जे. के. जैन यांनी हा नानाजींच्या खुनाचा फार नियोजनपूर्वक आखलेला कट होता म्हणून आरोप केला. स्वत: नानाजींनी मात्र हे म्हणणे हसण्यावारी नेले. आपले कोणाशीही वैर नाही व आपण असे समजत नाही म्हणून सांगितले.

घटनांचा मागोवा घेणाऱ्या जागरूक वाचकांनी आणखी पण काही गोष्टी नोंदवल्या होत्या. गोंड्याचा प्रकल्प हा दिल्लीच्या दीनदयाळ शोधसंस्थानतर्फे चालविला जातो. पुण्याचे कृष्णा जोशी हे त्या संस्थानचे नवे प्रधान सचिव बनले. यात तसे नवे काही नव्हते; पण आधीचे प्रधान सचिव व नानाजींचे जवळचे दोस्त डॉ. जे. के. जैन यांनी 'सूर्य' हे मेनका गांधींचे मासिक विकत घेऊन त्या कार्याला आपल्याला वाहून घेतल्याने हे सचिवपद मोकळे झालेले होते ! संस्कृतिरक्षण, समाजकारण यात तसा साऱ्याच गोष्टींचा समावेश होऊ शकतो. आणखी एक घटना घडली. कोणत्याच मोठ्या वर्तमानपत्राने ही गोष्ट नोंदवली नाही; पण गोंडा जिल्ह्यातील या प्रकल्पाविरुद्धचा आणखी एक आवाज १६ मार्चला, गोंडा जिल्ह्यात मनकापूर येथे उठला. भर सभेत आनंदसिंगने सांगितले–हे लोक सांगतात ते आकडे चुकीचे आहेत. भ्रामक कल्पना निर्माण करणारे आहेत. आमच्या जिल्ह्यात काम वगैरे काही झालेले नाही. नानाजींना दिल्लीत बसून पत्रके आणि पुस्तिका प्रसिद्ध करणे जमते. त्या कामात ही मंडळी फार तरबेज आहेत आणि आनंदसिंग (अण्णूसिंग) हा कोणी मामुली माणूस नाही. गोंडा जिल्ह्याचा प्रतिनिधी म्हणून ७९ साली तो लोकसभेवर निवडून आलाय. नुसता निवडून आलेला नाही. गोंडा प्रकल्पाचे संचालक शारदाप्रसाद यांचा तीस हजाराहून अधिक मतांनी पराभव होत असताना निवडून आलाय !

सूर्यावर थुंकणारे पण लोक असतात. त्याचबरोबर भर मिरवणुकीत 'राजा नागडा' हे कोणाला तरी अखेर सांगावेच लागते !

–गोंडा जिल्ह्यात खरेच नक्की काय घडलंय ?

...या जिल्ह्याची एक मुक्त भ्रमंती करावयास हवी !

□

## दोन

हे संघवाले म्हणजे एकूणच तसा ताप आहे !

मी या मंडळींना अजिबात ओळखत नाही असे नाही. वि. आ. बुवांची 'एक एक माप' म्हणून एक विनोदी कादंबरी होती. फडके, खांडेकर, सानेगुरुजी या प्रत्येक लेखकाच्या शैलीचे अनुकरण करून त्या कादंबरीचे एक एक प्रकरण लिहिले होते. मी व माझ्या पिढीतील अनेक जण असे संघ, सेवादल, भूदान, साम्यवाद, कॉंग्रेस अशी एकेक झटापट करत लहानाचे मोठे झालो. यातील कोणताच वाद आम्हाला मोहवू शकला नाही किंवा कुठलीच बांधिलकी आणि काम न करता, नुसत्याच टिवल्या–बावल्या करीत पुढे सरकण्यात आम्ही यशस्वी झालो ! लहानपणी मी नियमित शाखेत जात होतो. शाळेत सुरू असलेला जादुगार रघुवीरांचा कार्यक्रम संघस्थानावर पोचावयास उशीर होईल म्हणून रंगात आला असताना, निम्म्यावर सोडून जाण्याचे 'देशकार्य' पण मी माझ्या मित्रांच्या बरोबर केले होते; पण माझी व माझ्या मित्रांची अर्धी चड्डी व संघ बरोबरीनेच सुटले ! त्यानंतर मी त्यांच्या वा ते माझ्या वाटेला गेलो नाही !

गोंड्याला जावयाचे म्हणजे या मंडळींना भेटावयास हवे. वासन नावाचा माझा एक फार जवळचा पंजाबी मित्र आहे. उंचा पुरा, तगडा, देखणा वासन आमच्याच संशोधनसंस्थेत माहिती व ग्रंथालयविभागाचा प्रमुख आहे. तो काही वर्षे प्रचारक होता. तो मला नानाजींची भेट करवून देण्याचे मान्य करतो. पुण्याहून देवदत्त दाभोळकर पण दिल्लीला आलेत. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या भारतातल्या निरनिराळ्या स्वयंसेवी संस्थांना ते भेट देत हिंडताहेत. त्यांना पण गोंड्याला जायचंय. शनिवारी संध्याकाळी पाच वाजता दीनदयाळकेन्द्रावर आम्ही वासनबरोबर नानाजींना भेटावयाचे ठरले.

दिल्ली स्टेशनच्या जवळ, पहाडगंज क्रॉसिंगजवळ दीनदयाळ शोध संस्थेची आकर्षक इमारत उभी आहे आम्ही पाच वाजून पाच मिनिटांनी तेथे पोचलो. शनिवार म्हणून ऑफिसात कोणी नाही. वासनचा पण पत्ता नाही. तो दूर भायापुरीत

राहतो. पाच–दहा मिनिटे आम्ही त्याची वाट पाहतो. नंतर तेथील ग्रंथपाल परमेश्वरन यांना मी वासनबद्दल विचारतो. म्हणतात, पाच वाजायला पाच मिनिटे असताना तो आलाय. नानाजी व संस्थेचे संचालक प्रा. देवेंद्र स्वरूप यांच्याबरोबर दाभोळकर म्हणून कोणी येणार आहेत त्यांची वाट पहात बसलाय ! या संघाच्या लोकांचा वक्तशीरपणा पाळणे म्हणजे मला एकूणच ताप आहे !

नानाजींच्या डोळ्याचे ऑपरेशन झालंय. डॉक्टरांनी त्यांना बोलावयास मना केलेली आहे; पण नानाजी ठणकावून बोलताहेत. मी आणि देवदत्त त्यांना प्रथमच भेटत होतो. पण हमीद दलवाई आणि ए. बी. शहा नानाजींचे चांगले दोस्त होते. नानाजींच्या खोलीत बैठकीवरच आमची बोलणी सुरू आहेत. खोलीत जयप्रकाश, दीनदयाळ यांच्या तसबिरी आहेत. आपल्या अकृत्रिम स्नेहाने, प्रसन्न वागणुकीने आणि मोकळेपणाने नानाजी पहिल्याच भेटीत आम्हाला जिंकून घेतात. दीनदयाळ शोध संस्थेतर्फे तशी खूप कामे होतात. 'मंथन' नावाचे हिंदी, इंग्रजीत प्रसिद्ध होणारे त्रैमासिक आहे. वेगवेगळ्या विषयांवर या मासिकात चर्चा होते. दीनदयाळ संस्थेचे अद्ययावत वाचनालय व संदर्भ ग्रंथालय आहे. परिसंवाद, चर्चा, निबंधस्पर्धा, पुस्तकप्रकाशन अशी अनेक कामे सुरू आहेत. आंध्रच्या पूरग्रस्तांसाठी 'दीनदयाळपुरम', याच संस्थेने उठवलंय. बिहारमधील सिंधभूम आणि ओरिसामधील सुंदरगड येथे विकासकार्य सुरू आहे; पण या संस्थेचा खरा महत्त्वाचा आणि महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे तो गोंडा जिल्ह्याच्या संपूर्ण विकासाचा !

आम्ही गोंड्याचे काम पहावयास जाणार म्हटल्यावर नानाजींना मनापासून आनंद झाला. ते म्हणाले, मोकळेपणाने हिंडून या. काय वाटतंय ते सांगा. हे काम आम्हालाही नवीन आहे काही चुका होत असल्यास सुधारावयाच्यात. उणीवा असल्यास दूर करायच्यात. तुमच्या भेटीचा मला फायदाच होईल. काही लपवायचा वा प्रचार करण्याचा प्रयत्न आहे असे त्या वेळी तरी वाटले नाही. नानाजी दर महिन्यात १० ते २५ तारखेपर्यंत असे पंधरा दिवस गोंड्याला असतात. नानाजी म्हणाले देवदत्त माझ्याबरोबर आले तर अधिक बरे. मी लगेच जावयाचे ठरवले. नानाजी म्हणाले, भरपूर हिंडा. सगळ्यांशी मोकळेपणाने बोला. येथे व तेथेही हवी ती माहिती विचारा. वाटेल ते प्रश्न पुढे करा. नानाजींना भेटणे व त्यांच्याबरोबर बोलणे हा मला शब्द समृद्ध करणारा अनुभव वाटला. बैठकीवर गप्पा-टप्पा सुरू आहेत. विवेकानंद–केंद्र, आसामनिधी, विद्यार्थ्यांच्या स्पर्धा अशा अनेक कारणांनी लोक येताहेत आणि जाताहेत. एक प्रसन्न मोकळी मैफल जमलीये. घरगुती चहाचे कप येताहेत आणि जाताहेत. झपाट्याने कामे उरकली जात असतानाच एक घरगुती वातावरण कायम आहे. मी संघीय नाही. पुढे–मागे बनण्याची पण आता अजिबात शक्यता नाही; पण या लोकांचा स्वभाव आणि काम करण्याची पद्धत मला फार आवडली !

¤

## तीन

सकाळी बरोबर नऊ वाजता गोमती राबती गोंडास्टेशनवर पोचली. लखनौ मेलचा आमचा डबा काढून लखनौला या गाडीला जोडण्यात आला होता. खरे पाहता लखनौ–मेल कानपूरला आली त्याच वेळी मी जागा झालो होतो; पण अनेक कारणांमुळे कानपूर-लखनौ स्टेशनकडे पहाण्याचीसुद्धा माझी अजिबात इच्छा नव्हती. मी आपला मजेत अंथरुणात चुळबुळ करत बसलो होतो. गोंड्याला उतरल्यावर काय हा प्रश्न मला नव्हता. गाडी लागण्याच्या आधी पाच मिनिटे मंडळी मला घ्यावयास स्टेशनवर येणार आणि गाडी निघून जाऊन पाच मिनिटे होईपर्यंत माझी वाट पहात उभी रहाणार हे मला आता अनुभवाने कळले होते ! माझा होरा चुकला नाही. प्रथमच एकमेकांना पाहून आमची ओळख पण पटली. शारदाजी आणि जीपचे ड्रायव्हर कृष्णाजी या दोघांनीही साठी ओलांडलेली आहे. शारदाजींच्या चेहऱ्यावर एक निरागस हास्य आणि उत्साह आहे; पण माणूस थकलेला-दमलेला दिसतो. बरोबरचे तीन कार्यकर्ते विशीतले, सडपातळ, उत्साही. नंतर कळले यांचे सारेच कार्यकर्ते असे तरुण आहेत. सर्वांचे कपडे कमालीचे साधे आहेत. कार्यकर्त्यांची दाढी वगैरे तीन–चार दिवसात न केलेली. सगळे खेडवळ वातावरण आहे. शारदाजी सर्वांत अधिक साधे वाटतात. पायांत चपला, हातधुलाईची इस्त्री वगैरे न केलेला मळका थोडा आखूड पायजमा, तसलाच एक शर्ट, एक जाकीट, खांद्यावर मफलर, तोंडात पान, वागण्यात कमालीचे अगत्य आणि मोकळेपणा. हा माणूस प्रकल्पाचा संचालक आहे हेच खूप वेळ पटत नाही ! मंडळी औपचारिक उगाच वेळ घालवत नाहीत. सरळ विचारतात, तुम्हाला आमी काही दाखवायचं की तुमचा 'पॅडी' सारखा काही विचार आहे ?

पॅडी (PADI)च्या नावाने मी मनसोक्त हसलो ! सारे माझ्या हास्यात आपले हास्य मिसळतात ! पॅडी हा या गोंडा प्रकल्पातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. नानाजींनी हा प्रकल्प सुरू केला त्या वेळी संघातही माझ्या माहितीप्रमाणे अनेक मतप्रवाह होते. नानाजींनी देणार असतील त्या सर्वांकडून मदत घेण्याचे ठरवले. अनेकांना ते मान्य नव्हते. पॅडी म्हणजे 'पिपल्स ॲक्शन फॉर डेव्हलपमेंट' ही एक स्वायत्त संस्था. ही संस्था भारत सरकारच्या कृषिमंत्रालयाच्या अखत्यारीत येते. ग्रामीण विभागात विकासाचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटनांना मिळणारे सहाय्य या संस्थेमार्फत मुख्यत्वेकरून नियंत्रित होते. नानाजींनी पॅडीकडून मदत घेण्याचे ठरविले. दत्तोपंत ठेंगडीप्रभृतींनी त्याला विरोध केला. जे काही करावयाचे ते स्वयंसेवकांनी स्वत: करावे म्हणून आग्रह धरला; पण अखेर पॅडीकडून आर्थिक सहाय्य घ्यावयाचे ठरले. साठ कार्यकर्त्यांना महिना पाचशे रुपयेप्रमाणे दरमहा तीस हजार रुपये पॅडीने द्यावयास सुरुवात केली. ७९ सालच्या सुरुवातीला पॅडीकडून अशी मदत मिळणे सुरू झाले. दोन वर्षांनी म्हणजे जानेवारी १९८१ मध्ये झालेल्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी पॅडीची तीन तज्ज्ञांची समिती आली. त्या समितीत, मिर्झापूरच्या बनवारी सेवाआश्रमाचे सचिव श्री. प्रेमभाई, अखिल भारतीय पंचायत परिषदेचे सरचिटणीस श्री. लालसिंग त्यागी आणि मद्रासच्या विद्याभारतीच्या श्रीमती जया अरुणाचलम यांचा समावेश होता. जया अरुणाचलम या इंदिराजींच्या खास मैत्री-



मानचित्र जनपद-गोण्डा
DISTRICT GONDA
उत्तर
जनपद सीमा
DISTRICT BOUNDRY
तहसील सीमा
TEHSIL BOUNDRY
ब्लाक सीमा
BLOCK BOUNDRY
सड़कें
ROADS
रेलवे लाइन
RAILWAY LINE
ग्रामोदय संयोजक का केन्द्र
GRAMODAYA SANYOJAK CENTRE
नैपाल
NEPAL
बहराइच
BAHRAICH
बस्ती
BASTI
FAIZABAD
फैजाबाद
बाराबंकी
BARABANKI
GHAGHRA R.
शिवपुरा (हरैया सतघरवा) ब्लाक
तुलसीपुर ब्लाक
तहसील बलरामपुर
BALRAMPUR-T
पचपेड़वा ब्लाक
गैसड़ी ब्लाक
महराजगंज
आदमताला
बलरामपुर ब्लाक
श्री दत्तगंज ब्लाक
उतरौला ब्लाक
तहसील उतरौला
UTRAULA-T.
रेहरा ब्लाक
गैड़ासबुजुर्ग ब्लाक
बभनजौत ब्लाक
मनकापुर ब्लाक
छपिया ब्लाक
रुपईडीह ब्लाक
कटरा ब्लाक
तहसील गोण्डा
GONDA-T.
इटियाथोक ब्लाक
पंडरीकृपाल ब्लाक
मुजेहना ब्लाक
हलधरमऊ ब्लाक
करनैलगंज ब्लाक
गोण्डा
परसपुर ब्लाक
झंझरी ब्लाक
तहसील तरबगंज
TARABGANJ-T.
वजीरगंज ब्लाक
बेलसर ब्लाक
तरबगंज ब्लाक
नवाबगंज ब्लाक
बिशनोईपुर
परास पट्टी
कटरा
बस्ती को
गोण्डा
GONDA

तल्या ! लखनौच्या अमौसी हवाईतळावर यांना घेण्यासाठी कार्यकर्ते जिप घेऊन गेले होते. जिपमध्ये बसण्यापूर्वी समितीने कार्यकर्त्यांना सांगितले, 'गोंडा जिल्ह्याचा नकाशा तुम्ही सांगता त्या केलेल्या कामाची यादी आणि तीन जिप्स आम्हाला लागतील !' दुसऱ्या दिवशीपासून सकाळी आठ वाजता हे तीन जण वेगवेगळ्या जिप्समधून बाहेर पडत. बघावयाच्या ठिकाणाचे नाव, पहावयाच्या विहिरी, भेटावयाचे लोक यांची यादी कार्यकर्त्यांना देत. प्रत्येक जण दररोज नवी प्रश्नपत्रिका आपल्याबरोबर घेई. गावकऱ्यांची सभा घेऊन ती प्रश्नपत्रिका भरून घेत. खूप रात्री परत येत. दोन दिवस हे तिघे असे हिंडत होते.

तिघांनीही आपल्या अहवालात झालेल्या कामाचे अफाट कौतुक केले. श्रीमती जया अरुणाचलम यांनी सांगितले, काम पाहून मी फार प्रभावित झाले आहे. खालील चार गोष्टी मला प्रामुख्याने जाणावल्या : (१) कार्यकर्ते फार प्रामाणिक आणि निष्ठावान आहेत. कामात त्यांना आस्था आहे. (२) विहिरींचा हे लोक सांगतात तो आकडा खरा आहे. (३) उपलब्ध झालेल्या या जादा पाण्यामुळे खेड्यापाड्यांत अन्नधान्याचे उत्पन्न वाढलेले आहे. (४) सुशिक्षित बेकारांना पर्यायी उद्योग देण्याचे काम प्रयत्नपूर्वक सुरू आहे.

श्री. प्रेमभाईंनी आपल्या अहवालात म्हटले, '...फार चांगले काम झाले आहे याबाबत आम्हा तिघांचेही एकमत आहे. सरकारी आणि स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याने अविकसित ग्रामीण भागात पाणी उपलब्ध करून, उत्पन्न वाढवून गरिबी किती झपाट्याने हटवता येते याचा एक सुखद अनुभव या प्रकल्पामुळे आला. पॅंडीने या प्रकल्पाला दिलेले आर्थिक सहाय्य फारच नगण्य आहे. सरकार आणि बँक्स यांच्याकडून बारा कोटी रुपयांचे सहाय्य मिळवून फक्त दोन वर्षांत सत्तावीस हजार टयूब-वेल्स खणल्या गेल्या आणि दोन हजार खेड्यांतील सुमारे एक लाख किसानांची अडीच लाख एकर जमीन बागायतीखाली आणण्यात आली. कोणत्याही निकषावर तपासले तरी हे फार यशस्वी काम आहे. इतर अविकसित भागात हे काम कसे नेता येईल हे आपण तपासले पाहिजे...'

—पॅंडीचा अहवाल असा आला; पण पॅंडीतर्फे मिळणारी मदत मात्र बंद झाली ! अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना याचाही मनापासून आनंदच झाला. माहितगार सांगतात, शारदाजींनी दत्तोपंत ठेंगडींना लिहिले, 'मला आनंद होतो आहे. तुमच्या मनासारखे झाले आहे. आता आमच्यात परत या !'

पॅंडीची मदत या प्रकल्पाने का घेतली ? पॅंडीने यांना मदत का दिली ? पॅंडीने आपली मदत का थांबवली ? पॅंडीने असा चांगला अहवाल का दिला ? हे सारे वादाचे मुद्दे आहेत; पण पॅंडीच्या अहवालाने आणि मूल्यमापनाने या गोंडा प्रकल्पाच्या शिरेटोपात एक मानाचा तुरा लावला गेला हे मान्य करावेच लागेल !

¤

## चार

मी जाम दमलोय. माझे अंग पार मोडलंय. शारदाप्रसाद म्हणजे मला दादाजी कोंडदेव वाटले होते. कोवळ्या मावळ्यांना तयार करून तोरणा घ्यावयास पाठवणारे; पण हा म्हातारा शेलारमामा निघाला ! त्यांचा उत्साह, तडफ, कणखरपणा पाहूनच मी हबकून गेलोय. आल्यापासून तो मला नुसता भिंगरीसारखा घुमवतोय !

तुम्हाला सारा प्रकल्प आम्ही दाखवायचा का तुम्हाला 'पॅंडी' प्रमाणे तो पहावयाचाय या त्यांच्या प्रश्नाला मी माझ्या मते छान बगल दिली होती. पॅंडीच्या अहवालात वा कोणत्याच अहवालात मला फारसा रस नव्हता. आकड्यांची जादू आणि प्रात्यक्षिकांची नाटके करून भल्याभल्यांना चकवता येते हे मला माहीत आहे. एक खाजगीतली गोष्ट सांगतो. काही वर्षांपूर्वी माझी त्या वेळची संस्था एका महत्त्वाच्या संशोधन प्रकल्पात गुंतली होती. देशातील आणखी प्रमुख तेरा राष्ट्रीय प्रयोगशाळा पण प्रकल्पात होत्या. युनिडोची फार मोठ्या तज्ज्ञांची एक भली मोठी तुकडी साऱ्या प्रकल्पाचे मूल्यमापन करावयास आली होती. आमचे तसे काहीच काम झालेले नव्हते. त्या तज्ज्ञांनी सर्व प्रयोगशाळांना भेटी दिल्या. खूप आकडे जमवले. जाम डोकेफोड केली. नंतर त्यांचा अहवाल आला. आमच्या संशोधनसंचाने फार अनमोल कामगिरी केली, म्हणून त्यात वारेमाप स्तुती होती. त्यात पुढे म्हणले होते, 'बाकीच्या प्रयोगशाळांनी आमच्यापासून काही शिकून थोडे तरी आमच्यासारखे काम करावे !' मी तो अहवाल जपून ठेवलाय.आता एक शक्यता आहे. इतरांनी काहीच काम केलेले नसेल. शेवटी वेळ आली की 'उडदामाजी काळे गोरे' पण करावे लागतेच की !

मी म्हणूनच शारदा प्रसादांना सांगितले होते, 'मंडळी, मी सवडीने आलोय. आवडीने राहणारे ! तुम्हाला जे काय दाखवावयाचे आहे ते सारे तुम्ही दाखवा. नंतर मला जे पहावेसे वाटेल वा ज्यांना भेटावेसे वाटेल ते तुमच्याबरोर वा एकट्याने उरकेन. महत्त्वाचे म्हणजे मला तुमच्या कार्यकर्त्यांच्या बरोबर रहायचंय. त्यांचा मित्र बनून त्यांच्याशी खूप गप्पा मारायच्यात. कोणत्याही प्रकल्पात तुमचा कार्यकर्ता वा संशोधक खरा महत्त्वाचा असतो. त्याच्या पोटात शिरलात तर साऱ्या गोष्टी सुतासारख्या सरळ समजतात !'

शारदाप्रसाद म्हणाले, 'आम्हालाही तसेच कोणी पाहून काही सांगणारे हवेत. आमचा प्रयत्न प्रामाणिक आहे; पण प्रयत्नात उणीवाही असतील. त्या तुम्ही दाखविल्यात तरी बरे वाटेल. आमच्या कार्यकर्त्यांशी घरचे बनून घरगुती बोला !' त्यानंतर फक्त चहा झाला. आम्ही जिपमध्ये चढलो. जिप भन्नाट फिरत होती. माझे अंग मोडले होते. पोटात कावळे कोकत होते.

मुख्य रस्ते छान होते. भोवताली दुतर्फा गच्च भरलेली शेती आहे. पंजाब-हरियानामधून फिरल्यासारखे थोडे-फार वाटले. ऊस शेतात उभा आहे. गव्हाला कोवळ्या कोवळ्या लोंब्या फुटल्यात. मुख्य रस्ता सोडून थोडे आत गेलात की अंगाला जबरदस्त हादरे बसताहेत. बैलगाडीसुद्धा जाऊ शकणार नाही असे खड्डे, ओढे, दगड यांनी भरलेल्या या आडवाटा आहेत. त्या चक्रव्यूहाच्या आत मातीने बनवलेली ओबडधोबड घरे, त्या घरांतून साकार होणारे एखादे कुग्राम. गाडीचे चालक कृष्णाजी म्हातारे, थकलेले; पण फार कसलेले सारथी आहेत ! शारदाजी

संचालक, कृष्णाजी, ड्रायव्हर; पण दोघेही अगदी भावा–भावासारखे वागताहेत. खरे सांगावयाचे तर कृष्णाजींचाच रुबाब जास्त आहे! सबंध प्रवासात एक गोष्ट अगदी सहजपणे लक्षात आली. बारा तासांत २००-२५० किलोमीटर आम्ही पालथे घातले; पण एकसुद्धा खाजगी गाडी आमच्यासमोर आली नाही! फक्त बसेस किंवा ट्रक. खाजगी गाड्यांशिवायचा भाग असतो ही कल्पनाच मला विलोभनीय वाटली. आणखी एक गोष्ट वरवर पाहतानाही समजून आली. प्रमुख रस्त्यावरून जाणारेही तीस-चाळीस टक्के लोक अनवाणी चालताहेत!

¤

मी काय पहावयाचे, काय विचारावयाचे हे अजून काही ठरवले नव्हते. एखाद्या टिपकागदासारखे दिसेल ते, जमेल तसे नुसते टिपतोय! निघण्यापूर्वीच गोंड्याला असलेले त्यांचे विक्रयकेन्द्र पाहिले होते. जयप्रकाश, दीनदयाळ, गांधीजी यांचे ठसठशीत फोटो. सामानांची सजावट. मला तो सारा प्रकार खादी ग्रामोद्योग आयोगाच्या जिल्ह्यातील एखाद्या विक्रयकेन्द्रापेक्षा वेगळा वाटला नाही. उत्साह तेवढाच होता. विक्रयकेन्द्राला विक्री वगैरे पण नसावी. पुढे कळले की, हे खादीग्रामोद्योगाचेच विक्रयकेन्द्र त्यांनी विकत घेतलंय. विक्रयकेन्द्राच्या जवळच छोटया छोटया बैठया घरात निष्ठेने चालविले जाणारे टायपिंग, शिवण, विजेचे काम यांचे शिक्षण देणारे वर्ग होते. छोटी छोटी मुले-मुली, वयस्क स्त्री–पुरुष मन लावून शिकत होते. वर्गांना खूप गर्दी होती. नंतर कळले की, मामुली फी व मन लावून शिकविणारे कार्यकर्ते यामुळे या वर्गांची लोकप्रियता वाढते आहे. जागेची व यंत्रांची अडचण लक्षात घेऊन दोन पाळयात म्हणजे सोळा तास हे वर्ग चालविण्याचा विचार आहे. सध्या हे वर्ग फक्त गोंड्यालाच आहेत; पण लवकरच ते इतरत्र पण सुरू होणार आहेत. माझ्याबरोबरच्या तीन कार्यकर्त्यांशी माझा आता छान परिचय झालाय. एक रामकृष्ण गुप्त. तो गोंडा तहसीलचे काम बघतो दुसरा आशुतोष पाठक. तो तरुणोदय मंडळाचे काम बघतो. तिसरा विक्रम प्रसाद पांडे, उतरौला तहसीलचे काम बघणारा. तिघेही तरुण, शिडशिडीत. आपल्याच तंद्रीत आणि मस्तीत असलेले. मी रेल्वेतून उतरल्या उतरल्या विक्रम प्रसादने माझी बॅग माझ्या हातातून ओढून घेतली. त्या वेळी माझा भलताच गैरसमज झाला होता. आता समजलंय हे सारे उच्चशिक्षित तरुण आहेत. विक्रम अलाहाबाद विद्यापीठाचा एम्. एस्. सी. (अॅग्रि) आहे. याच जिल्ह्यात त्याचे घर आहे. बऱ्यापैकी शेती आहे. कॉलेजात असताना भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सहा जिल्हे असलेल्या अवध विभागांचा तो संघटक होता. आता या कार्याला वाहून घेतलंय. मंडळी काही ना काही माहिती सारखी देताहेत. मला त्यामुळे अजून काहीच कळलेले नाही. मी आपले हा हा म्हणत आपल्याच तंद्रीत त्यांचे बोलणे ऐकतोय.

¤

खाडकन ब्रेक लागले आणि गचका देत आमची जीप अचानक थांबली. समोरच्या झाडीतून बाहेर आलेला, कमरेला पिस्तूल लावलेला एक पोलीसअंमलदार आमच्यासमोर उभा आहे. विक्रम प्रसाद सांगतो ही आमची पहिली कमाई! हा रामभजन राम, मोतीगंज पोलीसस्टेशनचा ठाणाध्यक्ष, याला खरे तसा कोणत्याच कामात रस नाही; पण एक दिवस मला शोधत आला. म्हणाला, 'काल बिरापूरला तुमच्या कार्यकर्त्यांचे, ठाकुरांचे आणि हरिजनांचे एकत्र झालेले जेवण स्वतः पाहिले. मी चांभार आहे. ठाकुर आणि तुमचे कार्यकर्ते, माझ्या चांभारांच्याबरोबर एका पंक्तीत खेड्यात जेवले यावर विश्वास बसत नाही. मला तुम्ही आवडलात. काहीही काम असेल तर सांगत जा. कोणी काही त्रास



¤

बांबूचा नळ
ट्यूबवेलवर बसतोय...
अशा विहिरींची संख्या?
सतरा हजार.....!

¤

दिला तर सांगत जा. मी तुमच्याबरोबर आहे.' रामधवन तगडा, उमदा, देखणा आहे. त्याच्याबरोबर बोलत आम्ही आडवाटेने पुढे गेलो. टयूबवेल हे या संस्थानचे एक चांगले काम आहे. त्यांना लावलेले बांबूचे नळ हे एक महत्त्वाचे संशोधन आहे. ते सारे नीटपणे समजावून घ्यावयाचे होते. एका टयूबवेलसाठी सुमारे दहा हजार रुपये खर्च येतो. सरकार मदतीच्या स्वरूपात छोटया शेतकऱ्यांना तेहेतीस टक्के इतके अनुदान (Subsidy) देते. सहकारी पद्धतीने गावाने वा शेतकऱ्यांनी विहीर खणली तर हे अनुदान पन्नास टक्के इतके अधिक असते. बाकीची सर्व रक्कम बँकेच्यामार्फत फार कमी व्याजावर मिळते. खेडचातील लोकांना याची माहिती द्यावयाची, खोदकामाची व्यवस्था करावयाची, पंप वगैरे खरेदी करावयाची सोय करावयाची, लाल फितीचा गळफास साऱ्या कार्यक्रमाला लागत नाही, हे पहावयाचे. हे काम पॅडीच्या संयोजकांनी करावयाचे होते. ही विहीर खणावयाचे तंत्र पण नवीन होते. लोकांचा सहयोग घेऊन ते काम पार पाडावयाचे होते. विहीर खणण्याचे व बांधण्याचे यांचे तंत्र जुनेच आहे; पण अधिकात अधिक शरीरश्रम वापरण्यावर भर आहे. लागणारी छोटी–मोठी थोडी गुंतागुंतीची अवजारे, पण जवळपासच बनविण्यावर भर आहे. चार–पाच मजूर एक-दोन दिवसांत सव्वाशे–दीडशे फूट खोल पोचतात. बांबूचे नळ हा तसा नवा प्रकार नाही. उत्तरभारतात व पंजाबात अनेक ठिकाणी हे असे नळ वापरतात; पण ही तशी नाळकी असतात. टयूबवेलच्या खोलीपर्यंत जाणारा बांबूचा नळ ही तशी अभिनव कल्पना आहे. याचा झपाटयाने विकास व प्रसार करावयाचे श्रेय संस्थानला द्यावयासच हवे. या विभागात बांबूची समृद्ध जंगले आहेत. खास प्रकारचा बांबू तेथे तयार होतो विहिरीला लोखंडी नळ लावले तर किंमत सुमारे दोन हजारापर्यंत येते. बांबूचे नळ बनवून वापरले तर ही किंमत ५००–७०० रु. पर्यंत कमी येते हे बांबूचे नळ किती काळ टिकतील याचा अभ्यास झालेला नाही; पण पिढयानुपिढयांच्या अनुभवाप्रमाणे ते लोखंडाच्या नळापेक्षा अधिक काळ टिकतील. कारण लोखंडाप्रमाणे ते गंजत नाहीत. या विभागात एकूण तीस हजार विहिरी खणल्यात. त्यापैकी सतरा हजार विहिरींना बांबूचे नळ बसवले गेलेत. बांबूचे नळ बनवीत असलेल्या अशा एका केन्द्रावर गेलो. बांबू हिरवे असतानाच काढले आणि वाळण्यापूर्वीच नळ बनवून वापरले तर ते अधिक सोपे पडते आणि नळ पण अधिक काळ टिकतो हे कार्यकर्त्यांनी हेरलंय. बांबूची थप्पी लागलेली होती. १०–१२ फूट लांबीचे, आतील पोकळी सारख्याच व्यासाची असलेले बांबू घेऊन त्यांची टोके काथ्याच्या दोरांनी झटपट मजबूतपणे एकमेकात बांधली जात होती. या नळांना भयंकर मागणी आहे. बाहेर गर्दी जमली होती. आपला वायदा आज पुरा होऊन आपल्याला नळ नक्की मिळेल का याची शेतकरी आतुरतेने चिंतित स्वरात चौकशी करत होते. जवळच एके ठिकाणी छान गालिचे विणले जात होते. लखनौहून आणलेले कारागीर त्या मुलामुलींना गालिचे विणण्याचे शिक्षण देत होते. मुले–मुली तृप्त चेहऱ्याने कामात गढून गेली होती. दूरवर वेतकामाचे शिक्षण सुरू होते. वेताच्या सुंदर, नाजूक मजबूत वस्तू तयार होत होत्या. छोटे छोटे जीव आपण काही शिकतोय या आनंदात गर्क होते. सारे वातावरण कसे प्रसन्न होते !

☐

पण ही प्रसन्नता फार काळ टिकली नाही. आमच्या जिपने एक वळण घेतले आणि आम्ही आणखी थोडे आतवर गेलो पाणी पिण्याच्या निमित्ताने मी जिप थांबवली. मित्रांच्याबरोबर जाऊन एका झोपडीचे नसलेले दार ठोठावले... मी भरपूर भटकलोय आणि खूप भारत पाहिलाय, हा माझा गर्व पाण्यात पडलेल्या ढेकळासारखा विरून गेलाय. माझ्यासमोर मूर्तिमंत दारिद्र्य उभे आहे. भीषण, भयानक कल्पनाही करता येणार नाही असे ! हे जिवंत अस्थिपंजर सापळे आहेत. अर्धनग्न वा नग्न ! कुबेर हा संपत्तीचा देव आहे दारिद्र्याचा देव कोणाला बनवावयाचा असेल तर यांच्यापैकी कोणाचीही मूर्ती तेथे उभी करता येईल. हे पाहून आपण अस्वस्थ, शरमिंदे वगैरेसुद्धा काही होत नाही. स्थिती त्याच्या पुढची बनते. आपण सन्नाटा पांघरून सुन्न, बधिर बनतो !

मी प्रगत प्रांतातील खूप भूमिहीन मजूर–शेतमजूर पाहिलेत साऱ्या मोठ्या शहरांतील झोपडपट्ट्या आणि रेडलाइटविभाग स्वत:ला विसरत मित्रांबरोबर विमनस्क अवस्थेत पालथे घातलेत. माझ्या आत्तापर्यंतच्या भ्रमंतीत मला कानपूर हे शहर, जेथे क्रिकेटचे कसोटी सामने घ्यावे लागतात इतके मोठे ! माळरोड आणि सिव्हिललाइन्स सोडून हे सारे शहर बकाल झोपडपट्टी आहे या शहरात ऑटोरिक्षा नाहीत, पंचवीस हजार सायकलरिक्षा आहेत जख्खड म्हातारे आणि दहा–बारा वर्षांची कोवळी पोरे पोळून काढणाऱ्या उन्हात वा गोठवणाऱ्या थंडीत चार–आठ आण्यात दोन–तीन किलोमीटर घेऊन जाण्यासाठी तुमची मनधरणी करतात. प्रमुख बाजारपेठेला लागून आडगल्लीत देहविक्रय चालतो. चौदा–सोळा वर्षांच्या कोवळ्या निष्पाप पोरी विझलेल्या नजरेने दारात उभे

**२१ मार्च ७८ ते ३१ मार्च ७९ या काळात गोंडा जिल्ह्यात झालेले काम**

| विभाग | संयोजकांची संख्या | बोअरिंग विहिरी | विहिरींवर बसवलेले पंप | विजेवर चालणाऱ्या विहिरी | अन्त्योदय | वृक्ष पेन्शन | सडकनिर्माण | विहिरींची डागडुजी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. उतरौला | १४ | १६२१ | ११६२ | — | ६५१ | २०४ | ८३ | ९३ |
| २. गोंडा | १४ | २६९३ | ११९५ | ३५ | २६६ | २१ | ९६ | ६० |
| ३. बलरामपूर | १० | १०४७ | ६११ | ३० | ३०९ | १५३ | २०८ | ७६ |
| ४. तरबगंज | १२ | १९८७ | १०३५ | ७१ | २२३ | १ | ६९ | ८९ |
| एकूण | ५० | ७३४८ | ४००३ | १३६ | १४४९ | ३७९ | ४५६ | ३१८ |



एका मुलाने तर चक्क डोळ्यांवर हात धरलाय ! गुळाचा खडा दिसू नये म्हणून.

राहून एक रुपयासाठी तुमची मनधरणी करतात—शांघाय आणि कलकत्त्याच्या मार्गे वॉशिंगटनला जाऊ शकणारा साम्यवाद कानपूरला का पोचला नाही हे मला अजून समजले नव्हते. धर्म ही अफूची गोळी असते. रामनामाची धून पाजून या लोकांना चैतन्यहीन केलंय असे मला वाटावयाचे. आज याचे कारण मला थोडेफार कळले आहे असे मला वाटले. माझ्या समोरच्या या माणसांच्या दृष्टीने कानपूरच्या झोपडपट्टीत राहणारा रिक्षावाला हा अक्षरशः स्वर्गातील जीवन जगत असेल ! या माणसापर्यंत न पोचलेला कोणताही वाद या देशात काही करू शकणार नाही !

माझ्यासमोरचा हा माणूस भिकारी नाही. तो गृहस्थ आहे. आडवेळी दारी आलेला माणूस हा अतिथी वा देव आहे असे सांगणाऱ्या जगातील एका सनातन संस्कृतीचा व सभ्यतेचा वारसा मिळविणारा ! वाडग्यात जवाच्या भाकरीचे काही तुकडे आहेत. दोन टपोरे तुकडे त्यांनी माझ्या हातात ठेवलेत. कुठल्या तरी डब्यात लपवून ठेवलेला गुळाचा एक काळपट खडा माझ्या भाकरीवर ठेवलाय. भोवताली चार—पाच मुले असूयेने पोळलेल्या आपल्या नजरेने त्या गुळाच्या खड्याकडे बघताहेत. मी आग्रह करूनही त्यातील एकाही मुलाचे तोंड

तो खडा घ्यावयास उघडत नाही. तोंडे शिवल्यासारखी त्यांनी गच्च बंद करून घेतलीत. एका छोटया मुलाने तर चक्क डोळयांवर हात धरलाय गुळाचा खडा दिसू नये म्हणून ! या देशात परमेश्वराला जन्म घ्यावयाचा असेल तर तो भाकरीच्या रूपात घ्यावा लागेल म्हणून गांधीजींनी सांगितले होते. मला वाटले गांधींचे ते वाक्यही अर्धसत्य आहे. भाकरीशिवाय इतर कोणत्याही रूपात जन्म घेणाऱ्या परमेश्वरालासुद्धा या देशातील जनता आज राक्षसच समजेल ही या विधानाची दुसरी बाजू आहे !

¤

मी विमनस्क आहे. भोवताली अमाप ऊस पिकलाय. नुसता पिकला नाही, तो सुकून चाललाय. तो ऊस घेऊन खावयाची त्या मुलांना इच्छा का होत नाही ? ते असो. सुकणारा हा ऊस हा एक जळता प्रश्न आहे. ऊस खूप पिकलाय. आपली क्षमता नाही म्हणून शेजारचा साखरकारखाना तो घेत नाही. विकत घेतला तर वाहतुकीची चणचण आहे. ऊस तिथे पोचवला तर पैसे मिळत नाहीत. आणखी एखादा कारखाना, सहकारी कारखाना उभा का करत नाहीत ? कारखान्याचे राहू दे, घरोघर गूळ बनविण्याच्या भट्टया का बसवत नाहीत ? या क्षेत्रात साखरकारखाना असल्याने गुळाची भट्टी लावावयास परवानगी नाही. आई जेवू घालत नाही आणि बाप भीक मागू देत नाही असा सगळा प्रकार आहे. उसाचे नाव काढले की, शेतकरी लाही फुटावे तसे फुटताहेत. मी विक्रमप्रसादला म्हणतो, 'तुम्ही याबाबत काही करत का नाही ?' तो अस्वस्थपणे म्हणतो, 'करावयास हवे. संस्थान नक्की करेल ! शेतीमालाला योग्य भाव नाहीत हा एक खरा प्रश्न आहे.' पण याच्याशी जास्त बोलणे म्हणजे वैताग आहे ! इतर कोणत्याही सेवाभावी संस्थांची कामे याला माहीत नाहीत. बाबासाहेब आमटे, शरद जोशी यांची त्याने नावेही ऐकलेली नाहीत ! यांच्याच मंथनमध्ये त्यांच्यावर लेख आलेत ! त्यातून हा शेतीचा उच्च पदवीधर. विद्यार्थीपरिषदेचा प्रमुख. संस्थानने ही दोन्ही कामे अग्रक्रमाने करावीत असे मला वाटते, म्हणून तो पुढे सांगतो. संस्थानने हे केले नाही तर तू काय करशील हा प्रश्न त्याला विचारावा की विचारू नये अशा संभ्रमात मी असतानाच आमची जिप थांबते. सारे वातावरण क्षणार्धात बदलते. पंचपूनी येथील जोखू महाराच्या तरारून फुललेल्या शेतापुढे आम्ही उभे आहोत.

¤

आपल्या देशातील कृषिखाते, कृषिविद्यापीठे अनेकविध प्रयोगांत आणि योजनांत गुंतलेली आहेत. शेतकऱ्यांचा सहयोग त्यांना हवा असतो. प्रयोगशाळेपासून शेताकडे ( Lab to land ) हा भारतीय कृषि

¤




¤

या माणसांच्या दृष्टीने कानपूरच्या झोपडपट्टीत राहणारा रिक्षेवाला स्वर्गसुख भोगत असेल !

संशोधनसंस्थानाचा एक खास कार्यक्रम आहे; या मंडळींनी हा कार्यक्रम फार प्रयत्नपूर्वक पाठपुरावा करून चांगल्या प्रकारे राबवलाय. या विभागातील दीडशे परिवार या कार्या-खाली निवडले गेलेत. प्रत्येक परिवाराच्या दोन बिघे जमिनीत नवी बियाणी वापरून, योग्य खत देऊन शास्त्रीय पद्धतीने शेती केलीये. खत, बियाणे इतर मदत कृषिअनु-संधानाने दिलेली आहे. शेताच्या कोपऱ्यात अधिक तरारून फुललेली ही शेती बघताना शेतकऱ्याला खूप काही समजते. आपली शेती येवढी चांगली आली आहे म्हणून जोखू अगदी खुश होता. पुन्हा पुन्हा आणखी काही प्रश्न विचारत होता. कार्यकर्ते मनापासून त्याला माहिती देत होते. गव्हाच्या सुधा-रित बियाणांचा हा प्रयोग फार यशस्वी झालाय आणि हा कार्यक्रम काही एकच नाही साराच विभाग अनेक नव्या प्रयो-गांनी कसा फुललाय! दिनकरपूरमध्ये श्रीवास्तवजींचे शेत पाहिले. तीन भाऊ अस-लेले हे एक एकत्र कुटुंब. मोठा परिवार. सारे जण मेहनती, जमीन फक्त एक एकर! या एका एकरात या कुटुंबाच्या साऱ्या गरजा भागतील असे उत्पादन काढावयाचे कार्य-कर्त्यांनी व श्रीवास्तवजींनी ठरवलंय. गहू, तांदूळ, कोबी, मटार, पालक, टॉमेटो, वांगी, बटाटे या साऱ्या भाज्या. लिंबू, केळे, पपई, पेरू यांची झाडे; कापूस आणि तेलासाठी मोहरी सारे या एका एकरात उभे आहे. शेत कसे नुसते गच्च भरलेय. एक एकरावर एक एकत्र कुटुंब मजेत राहू शकेल हे यांना दाखवायचंय. कोंबड्या आणि मधमाशांच्या पेट्या आहेत. गावातील सार्वजनिक तलावा-तून हवे तर मासे मिळतील, विक्रमप्रसाद भान विसरून आपले स्वप्न रंगवून सांगत होता. नवी नवी अनेक माणसे भेटत होती. कामाबरोबर किंवा त्यातूनही अधिक माणसे बघावयास अधिक मजा येते. भेटलेल्या सर्व माणसात मी दिनकरपूरच्या थोड्या पुढे राह-णाऱ्या श्री. जे. पी. त्रिपाठी यांना अजिबात विसरणार नाही. पोस्टविभागात नोकरीला होते. नोकरीत असताना डाव्या कामगार संघटनेचे काम बघावयाचे. सेवानिवृत्त झाल्या-वर आपली शेती करावयास परत आलेत. समोरच्या माणसाला थोडाही हलवयास न देता अर्धा तास बोलत राहणार. करपून जाणारा ऊस, शेतीमालाचे भाव याबाबत खड्या स्वरात सांगत होते. यासाठी झालेल्या वा होणाऱ्या चळवळी त्यांना माहीत नाहीत. पुण्याचे के. डी. जोशीजी, उज्जैनचे बापटजी ही देवमाणसे आहेत. आमच्यासाठी खूप काही करतात. नेहमी हिंडतात म्हणून त्यांनी गहिवरून सांगितले. शारदाजींचे तर त्यांनी पायच पकडले!

¤

मी दचकून, घाबरून म्हणा हवे तर, वर पाहिले. खूप रात्र झालीये. मी खूप दमलोय. श्री दत्तगंज येथील ग्रामीण उद्योग आणि विक्रीकेन्द्रात (Rural Marketing Service Centre) मधे मी खुर्चीवर बसलोय. समोर कंदिलाच्या उजेडात श्री. रमाशंकर द्विवेदी हे त्या केन्द्राचे प्रमुख मला काम सम-जावून देताहेत. श्री. द्विवेदी एम. ए. आहेत. प्रशिक्षित शिक्षक आहेत; पण त्यांना या कामाची गोडी आहे. त्यांनी या कामात स्वतःला वाहून घेतलंय. मला खूप नवी माहिती पुरवताहेत आणि इतक्यात अचानक डोक्यावरचा पंखा गरारा फिरावयास लागतो. येथे वीज नाही. हा काय भुताटकीचा प्रकार आहे? मी शारदाजींच्या मिस्किल डोळ्यांत बघतो. टेबलाखाली असलेले पाय ते भरारा हलवताहेत. शिवणमशीन चालवताहेत तसे. हा पायावर चालवावयाचा पंखा येथील कारागीरांनीच शोधून काढलाय आणि बनव-लाय. हा अक्षरशः अजबखाना आहे. ग्रामीण तरुणांच्या प्रतिभेचे पहिले अंकुर भोवताली पसरलेत. कपाटे, जाळ्या यापासून शेतीत वापरावयाच्या थ्रेशरपर्यंतच्या अनेक गोष्टी



¤

...दत्तगंजचा अजबखाना
ग्रामीण तरुण प्रतिभेचा अंकुर

¤

त्यांनी आपल्या कल्पकतेने बनविल्यात. या केन्द्राचे काम थोडे आणि विस्कळित स्वरूपाचे आहे; पण जे आहे ते दाद द्यावी असे आहे. या केन्द्राने सुधारित बैलगाड्या कमी किमतीत बनवल्यात आणि त्या शेतकऱ्यांना पुरवल्यात; पण सुधारित बैलगाडीसाठी बंगलोरच्या संस्थेने केलेले काम वा नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंट कार्पोरेशनने बनवलेली बलवंत बैलगाडी त्यांना अजिबात माहीत नाही. खरे पाहता या कार्पोरेशनने पत्रावळी-द्रोणावळीपासून अनेक विषयांवर चांगले संशोधन बाहेर आणलंय. खादीग्रामोद्योग आयोगाचे पण काही प्रयोग सुरू असतात. या कामाची माहिती झाली तर दत्तगंजच्या लोकांना फायदाच होईल. या संस्थेने केलेले सर्वात चांगले काम म्हणजे दोरखंड बनविण्याचे यंत्र. दोरखंड बनविण्याचा उद्योग दीनदयाळ संस्थेनेच या विभागात वाढवला. दोरी वळण्याचे यंत्र पंजाबातून आणावे लागते. चार-पाच हजाराला ते बसते. बँकेकडून कर्ज, सरकारकडून अनुदान अशा प्रकारे अशी अडीचशे यंत्रे या भागात आज काम करताहेत. यावर काम करणाऱ्या माणसाला आठ तासात वीस रुपये सुटतात; पण हे यंत्रच आता येथे बनविल्याने ते स्वस्त बनेल. त्याची दुरुस्ती पण सोपी होईल.

...अशी माहिती घेत घेत मी जयप्रभाग्रामला पोचलो तेव्हा खूप रात्र झाली होती. एक वेळचे जेवण आणि तीन–चार वेळचा चहा यापलीकडे वाटेत काहीच घेतले नव्हते; पण असा दमलो होतो की अजिबात भूक नव्हती. जयप्रभाग्राम, मला दिलेली खोली काहीही बघण्याची हिंमत नव्हती. अंथरुणावर अंग टाकले आणि कळण्यापूर्वीच डोळे मिटले ! (अपूर्ण)

## गोंडा ग्रामोदय प्रकल्प

### ( ३१ डिसेंबर १९८१ पर्यंत झालेले काम )

| | |
|---|---|
| सहभागी झालेली खेडी | २,००८ |
| संपूर्णपणे बागायतीखाली आलेली खेडी | १,०३९ |
| खणलेल्या बोअरिंग विहिरी | ३१,५२९ |
| बसवलेले डिझेल पंप्स | १५,३८६ |
| विजेवर चालणाऱ्या ट्यूबवेल्स | ५११ |
| प्रकल्पामुळे बागायतीखाली आलेली जमीन | २,३९,३९४ एकर |
| वर्षातून दोन पिके देणारी जमीन | १,६३,९१७ एकर |
| वर्षातून दोनहून अधिक पिके देणारी जमीन | २,१५,६२८ एकर |
| प्रकल्पामुळे फायदा झालेले परिवार | ९३,५५४ |
| पिण्याच्या पाण्यासाठी नव्या विहिरी | १,३१८ |
| विहिरींची डागडुजी | ३,३३० |
| अन्त्योदय कार्यक्रम | १,४३९ |
| वृद्धांना मानधन | २५३ |
| बांधलेले रस्ते | १,१५२ किलोमीटर |
| जयप्रभा ग्रामला गोपिखाद्यकेंद्राची स्थापना सहकारी दूध संस्था | ११७ |
| दूध योजनेखाली बँकेकडून साहाय्य मिळालेले परिवार | २,६७५ |
| प्रशिक्षण देण्यासाठी जयप्रभा ग्रामला कोंबडी पालनकेंद्राचीस्थापना | |
| कोंबड्या पाळण्यासाठी बँकेकडून साहाय्य मिळालेले परिवार | २७५ |
| मासे पालनाचे शिक्षण देण्यासाठी जयप्रभा ग्रामला केंद्राची स्थापना | |
| बँकेकडून मासे पाळण्यासाठी कर्ज मिळालेले लोक | १३० |
| डुकरे पाळण्यासाठी बँकेकडून कर्ज मिळालेले लोक | १०३ |
| सुरू केलेले गोबरगॅस | १२९ |
| ग्रामोद्योगासाठी कारागिरांना पुरवलेला माल | ६०,००० |
| ग्रामोद्योगातील विकलेल्या वस्तूंची किंमत | ४०,००० |
| ग्रामीण विक्रयकेंद्राची स्थापना | ७ |
| बँकेच्या कर्जाने दोरी वळण्यासाठी बसवलेली यंत्रे | २९६ |
| फायदा झालेले कारागीर | ६६७ |
| दारिद्र्यरेषेच्यावर आलेले कारागीर | ८५ |
| ग्रामोद्योगासाठी प्रशिक्षित केलेले लोक | ६८ |

## .. आधुनिक सेवाग्राम : जयप्रभाग्राम

सकाळी उठलो तेव्हा लख्ख उजाडले होते. खोलीत भयंकर डास आहेत. त्यांनी माझे तोंड अक्षरशः फोडले होते; पण असा दमलो होतो की, झोप अगदी छान आली होती...


मी बाहेर बघतो. जयप्रभाग्रामचे पहिले दर्शन फार प्रसन्न करणारे आहे. दूरवर पोस्टाची, बँकेची टुमदार छोटी इमारत आहे. त्याला लागूनच दीनदयाळ संस्थेचे कार्यालय. प्रत्येक घरात हातपंप, छान झाडी, छोट्या छोट्या बैठ्या इमारती. माझ्या चेहऱ्यावर हसू उमटते. एका बाजूला संघशाखाही सुरू आहे. शाखा संपते आणि लोक लगबगीने एका बैठ्या इमारतीत जातात. म्हणजे आता प्रातःस्मरण असणार !

पंचवीस तीस कोवळे तरुण आणि तरुणी वर्तुळाकार बैठकीवर बसलेत. पुन्हा माझ्या चेहऱ्यावर हसू उमटते. 'वाह गुरुकी' असा काही तरी शब्द येतो. हा शब्द पूर्वी नक्की नव्हता. मंडळी चलाख आहेत. प्रामाणिक पण असतील. शिखांना जवळ आणण्याचा तो प्रयत्न मला मनापासून आवडतो.

प्रातःस्मरण संपले. परस्पर परिचय झाले. येथून हे सारेजण सरळ कामावरच जातात म्हणे !..

मीही एकेकाला स्वतंत्र भेटण्यासाठी बाहेर पडतो... ¤

या भेटीगाठी पुढील अंकी



# ब्लड कॅन्सर



अगदी वेगळ्या व नवीन विषयावरील ही हृदयस्पर्शी कादंबरी. मूळ कादंबरीचे नाव– 'फीव्हर'. या कादंबरीचे लेखक डॉ. रॉबिन कुक हे स्वतः नाणावलेले सर्जन आहेत. ते न्यू हॅम्पशायर, अमेरिका येथे राहतात. ललितलेखनही दर्जेदार. त्यांच्या इतर कादंबऱ्या म्हणजे Coma, Brain आणि Sphinx. स्वतः वैद्यकीय पेशातील असल्यानं ब्लड कॅन्सरवरील प्रस्तुत कादंबरी त्यांनी अधिकारवाणीनं लिहिली आहे. कदाचित् भावी काळात त्यांचा कल्पनाविलास सत्य ठरणंही शक्य आहे !

वाचकांच्या अंतःकरणाची प्रथमपासून पकड घेणाऱ्या ह्या कादंबरीचा आस्वाद मराठी वाचकांना घेता यावा म्हणून तिचा हा मुक्त अनुवाद प्रा. म. रा. राईलकर यांनी केला आहे.

## उपोद्घात

बेंझिनचे विषारी अणू अस्थिमज्जेमध्ये रानटी सैन्याप्रमाणे घुसले आणि त्यांनी विध्वंस आरंभिला. रक्तनिर्मितीचं काम करणाऱ्या पेशींनी त्यांच्यापुढं शरणागती पत्करली.

लोण्यामध्ये सुरी शिरावी इतक्या सहजपणं हे बेंझिन अणू सगळ्या प्रकारच्या रक्तपेशींमध्ये घुसले. तांबड्या, पांढऱ्या, तरुण, वृद्ध सर्व प्रकारच्या पेशी. क्वचित काही सुदैवी रक्तपेशींना त्रास झाला नाही.

संपूर्ण शरीराला रक्तपुरवठा करणाऱ्या अस्थिमज्जेमध्ये बेंझिन अणूंनी प्रवेश करून DNA चं कार्यच बंद पाडलं. मेंढरांच्या कळपात लांडग्यांनी धुडगूसच घातला जणू.

वास्तविक शरिरात प्रवेश करणाऱ्या जंतूंशी किंवा कोणत्याही परकीय आक्रमणाशी मुकाबला करण्याचं काम श्वेतपेशींचं; पण ह्या बेंझिन अणूंनी श्वेतपेशींच्या गाभ्यात शिरून त्यांची सर्व रचनाच उध्वस्त केली. बेंझिन अणूंनी श्वेतपेशी पूर्णपणं नष्ट केली असती तरी एक वेळ परवडलं असतं; पण श्वेतपेशींचं आमूलाग्र परिवर्तन होऊन त्यांनीच शरिराविरुद्ध बंड पुकारलं. म्हणजे फितूरच म्हणा ना. स्वत:च्या बदललेल्या रूपानेच त्यांनी प्रजननाचं काम– आणि तेही प्रचंड वेगानं आरंभलं! शरिराला केल्या जाणाऱ्या अन्नरसाचं शोषण ह्या फितुरांच्या अवलादीनं मोठ्या जोमानं सुरू केलं. आपल्या स्वत:च्याच घरी ही अवलाद बांडगुळाप्रमाणं वाढू लागली!

एकाच्या दोन, दोनाच्या चार ह्याप्रमाणे पेशींची वाढ होते. अशा वीस आवर्तनांनंतर फितुरांची संख्या लक्षावधी झाली. पंचविसानंतर ती अब्जावधी झाली. चाळीसानंतर?

नुकत्याच उमलू पाहणाऱ्या एका बारा वर्षाच्या कळीला ह्या बेंझिनचा तडाखा बसला. २८ डिसेंबरला तिला तीव्र स्वरूपाचा मायलोब्लास्टिक ल्युकेमिया सुरू झाला. मिचली मार्टल तिचं नाव. कुणालच कल्पना नव्हती आणि तापशिवाय दुसरं लक्षण आढळत नव्हतं.

¤

## एक

पॉटोमॅक नदीच्या तीरावर वसलेलं शाफ्ट्सबरी नावाचं एक गाव. जानेवारीचे थंडीचे दिवस. आजूबाजूच्या डोंगरावर सर्वत्र बर्फ. गावाच्या थेट दक्षिणेला मोठ्या रस्त्यावर विटाविटांच्या भिंतींनी बनलेली रिसायकल कंपनी होती. रबर, प्लॅस्टिक आणि विनील यांची निर्मिती करणारी. तिच्या चिमणीतून धुराचे ढग अखंडपणे शहरी भागावर पसरत होते. आवारात सर्वत्र रबर आणि प्लॅस्टिकचा कचरा पडला होता.

शहराच्या दक्षिणेला नदीनं एक वळण घेतल्यामुळं डोह बनला होता. मात्र डोहात जलचर प्राणी नव्हते आणि आसपास वनस्पतीही उगवलेल्या नव्हत्या.

जवळच एक शुभ्र रंगाचं प्रशस्त घर होतं. सकाळची वेळ. खिडक्यांच्या पडद्यांतून मंद प्रकाश बाहेर डोकावत होता. चार्लस मार्टलला जाग आली. पडल्या–पडल्याच त्याच्यापुढं गेल्या दोन वर्षांतले प्रसंग तरळू लागले. दोन वर्षांपूर्वी पुनर्विवाह केल्यापासून घराला पुन्हा घरपण आलं. प्रथम पत्नीला लिम्फोमा होऊन नऊ वर्षांपूर्वी ती निवर्तल्यानंतर पुन: असे समाधानाचे दिवस आपल्या जीवनात येतील असं चार्लसला कधी वाटलं नव्हतं. शिवाय पदरी तीन मुलं!

आता तो भूतकाळ झाला आणि त्या वेळची भीषण जखम हळूहळू भरून आली. 'दोन वर्षांपूर्वी आपण पुन्हा लग्न केलं खरं; पण काय होतंय नि काय नाही? त्यापेक्षा आपल्या कामात बुडणं चांगलं! नसतं एकेकाच्या नशिबी सुख!' पण त्याच्या आयुष्यात कॅथरिननं पदार्पण केलं आणि त्याचं दु:खमय जीवन आनंदानं आणि समाधानानं भरून टाकलं. दोन वर्षांत तिच्यावरलं त्याचं प्रेम वृद्धिंगतच होत गेलं. शेजारी झोपलेल्या कॅथरिनकडं त्यानं प्रेमभरानं दृष्टी टाकली.

घड्याळाकडं त्याचं लक्ष गेलं. अजून गजर व्हायला वीस मिनटं होती. दिवसभरात करायच्या कामाचा तो विचार करू लागला. 'चार्लस मार्टल नावाच्या टीनॅकच्या पोराला कॅन्सरचं रहस्य सापडलं तर? आपल्याला नक्की यश मिळणार! खरं तर आपण कुठं प्रशिक्षित शास्त्रज्ञ आहोत? पहिली पत्नी इलिझाबेथ आजारी पडली तेव्हा तर आपण साधे इंटर्नी होतो आणि 'ॲलर्जी' वर काम करीत होतो. तिच्या मृत्यूनंतर तर आपली प्रचंड प्रॅक्टिस सोडून आपण संशोधनाकडं वळलो आणि वाइनबर्गर इन्स्टिटयूटमध्ये पूर्ण वेळ संशोधक म्हणून लागलो. पेशा बदलण्यामधल्या धोक्यांची जाणीव आपल्याला किती जणांनी करून दिली; पण आपण कुणाचंच ऐकलं नाही!'

कॅथरिनलाही जाग आली. चार्लसनं आपल्याला पांघरुणात ओढलं आहे हे कळताच ती हसली. त्याच्या बालिश आणि निर्व्याज चेहऱ्याकडे बघून ती म्हणाली, 'कसला एवढा विचार करतोस?'

'काही नाही, तुझ्याकडेच पाहत होतो!'

'छान! म्हणजे मी आज फारच सुंदर दिसतेय म्हणायची!'

'फारच!' म्हणून त्यानं तिला आणखी जवळ ओढलं.

'उठा महाराज, सर्व कामं व्हायची आहेत नि तुलाही जायचंय!'

आणि ती गाउन सावरीत पळाली. तेवढ्यात गजर झालाच. दिवस उगवला!

¤

मिचेलीला कॅथरिनची हाक ऐकू आली; स्वप्नातच कुणी दूरवरून आपल्याला बोलवतंय असा भास झाला तिला. जरा वेळानं आपल्या खांद्यावर कुणाचा हात आहे हे पाहावं म्हणून तिनं डोळे उघडले तेव्हा तिला कॅथरिनचा हसरा चेहरा दिसला.

'उठा, बाईसाहेब!' कॅथरिन म्हणाली.

मिचेलीनं खोल श्वास घेतला आणि मान हलवली. कालची रात्र फारच वाईट होती. सारखी भयानक स्वप्नं पडत होती! सारखं वाटायचं, बाबांकडे जावं. एरवी ती गेलीही असती; 'पण बाबा आता एकटे कुठायत?'

'बाई, बाई, किती लाल पडली आहेस ग!' कॅथरिन चमकली, 'नि तुला चांगलाच ताप आहे मिचेली!' मिचेलीच्या कपाळावर उलटा हात ठेवत ती म्हणाली.

'पुन्हा तुझी तब्येत बिघडली ग!' स्वरात सहानुभूती आणून ती

म्हणाली, 'तुला बरं नाही का वाटत ?'

'छेः छेः,' मिचेली चटकन म्हणाली. तिला पुन्हा आजारी पडायचं नव्हतं. कारण शाळा बुडवायची नव्हती. संत्र्याचा रस आपणच काढायचा होता. तिचंच काम नव्हतं का ते ?

'आपण पाहू या का तुझा ताप ?' असं म्हणून कॅथरिन बाहेर गेली नि थर्मामीटर घेऊन आली. 'एक मिनिट फक्त, शहाणी मुलगी. तोंड उघड पाहू. आलेच हं मी, पोरं उठली का पाहून येते !'

दरवाजा बंद होताच खरा ताप कळू नये म्हणून मिचेलीनं थर्मामीटर बाहेर काढला; पण तेवढ्याच वेळात ९९ वर पारा गेल्याचं तिला दिसलं. आपले पाय दुखतात, पोटात कसं तरी होतं हे तिला कळत होतं. तिनं पुन्हा थर्मामीटर तोंडात घातला. खिडकीतून बाहेर पाहिलं. तेव्हा तिला तिचं खेळायचं घर दिसलं. छपरावर सगळं बर्फ पडलं होतं. सुटीमध्ये तिला तिथं खेळायला फार आवडायचं.

'आपण आणि डॅडी, बस्स !'

¤

कॅथरिननं दार उघडलं तेव्हा पंधरा वर्षांचा जीन पॉल जागाच होता. हातात फिजिक्सचं पुस्तक होतं. कॅथरिननं नाताळात भेट दिलेला लाल रंगाचा पायजमा घातला होता त्यानं.

'आता वीसच मिनटं दिलीत बरं का तुला !' कॅथरिन त्याला टप्पू मारीत म्हणाली.

थँक्स मॉम !' स्मित करीत जीन उत्तरला. कॅथरिन क्षणभर थबकली. त्याच्याकडं बघता बघता तिचं हृदय हेलावलं. तिला वाटलं असंच जवळ जाऊन त्याला कुरवाळावं; पण तिनं मोह आवरला. अंगाला अंग लागलेलं मार्टेल कुटुंबातल्या कुणालाच फारसं भावत नव्हतं. प्रथम प्रथम तिला हे थोडं जड गेलं. कारण ती ज्या कुटुंबातून आली होती तिथं ही प्रथाच होती. 'नाश्त्याला लवकर यायचं', म्हणून ती हलकासा सुस्कारा टाकीत बाहेर गेली.

मॉम म्हणून आपण हाक मारलेलं कॅथरिनला आवडतं हे जीन पॉलच्या लक्षात आलं होतं आणि कटाक्षानं तो तिला मॉम म्हणे. इतक्याशा भांडवलावर तिचं प्रेम आणि आपल्याकडं पुरवलं जाणारं लक्ष हे महत्त्वाचं होतं ! कारण वडील नेहमी कामात. त्यातही त्यांचं सर्व लक्ष चक नावाच्या मोठ्या भावाकडं आणि बहिणीकडं. अशात कॅथरिनचा प्रवेश झाला आणि परिस्थिती सुधारली. कॅथरिनला आवडत असेल तर 'आजी' म्हणायचीसुद्धा त्याची तयारी होती ! मात्र कॅथरिनवर त्याचं प्रेमही खऱ्या आईसारखंच होतं. खरी आई त्याला फारशी आठवत नव्हती. ती गेली त्या वेळी तो जेमतेम सहा वर्षांचा होता.

कॅथरिननं हात लावला त्या वेळी चक जागा होता; पण उशीखाली डोकं घालून त्यानं झोपेचं सोंग केलं होतं. चक अठरा वर्षांचा होता आणि नॉर्थ ईस्टर्न विद्यापीठात पहिल्या वर्षाला होता. तशी त्याची प्रगती फारशी समाधानकारक नव्हती. सेमेस्टर परीक्षेची धास्तीच होती त्याला.

'आता फक्त पंधरा मिनटं', त्याचे लांब केस विस्कटत कॅथरिननं दाटलं, 'डॅडींना प्रयोगशाळेत लवकर जायचंय !'

'फू:'

'चक', कॅथरिननं सावरल्यासारखं म्हटलं.

'मी नाही उठणार इतक्यात !' कॅथरिनच्या हातातली उशी खेचत तो म्हणाला.

'ते काही चालायचं नाही !' तिनं त्याचं पांघरूण ओढलं. त्यामुळं त्याला गारठा झोंबू लागला.

'मी तुला किती वेळा सांगितलंय की, माझं पांघरून ओढू नकोस म्हणून !' आणि त्यानं एक शिवी उच्चारली.

'आणि मी तुला किती वेळा सांगितलंय की, कॉलेजातली भाषा कॉलेजात वापरायची म्हणून. आता फक्त पंधरा मिनटं मिळतील !,

कॅथरिनला मिचेलीच्या खोलीत जाताना पाहिलं त्यानं. आपली आई शोभण्याइतकी काही ही मोठी नाही, त्याला वाटलं.

रागारागानं तो उठला. 'केवळ डॅडींना लवकर लॅबमध्ये जायचंय म्हणून आम्हाला का हा कहार ? आलेत मोठे शास्त्रज्ञ !' चकचं शेजारच्या पुस्तकाकडे लक्ष गेलं. 'गुन्हे आणि शिक्षा'. कालची सगळी संध्याकाळ पुस्तक वाचण्यातच गेली होती. पुस्तक काही अभ्यासाचं नव्हतं; पण म्हणूनच तर फार मजा आली वाचायला. 'बाप रे' केमिस्ट्री वाचायची राहिली की ! हार्वर्डमध्ये प्रवेश कसा मिळायचा. हार्वर्ड म्हणजे डॅडींचं विद्यापीठ ! केमिस्ट्री हा तर आपला प्रमुख विषय ! कसं व्हायचं ?'

'मला मुळीच डॉक्टर व्हायचं नाहीये !' अंगावर तेच घाणेरडे कपडे चढवता चढवता चक ओरडला. त्याचं त्याला फार भूषण वाटे. दाढी पण करायची नाही असा विचार त्यानं केला.

¤

'पंधरा पौंड वजन वाढलं आपलं.' चेहऱ्यावर साबणाचा फेस काढता काढता चार्लस विचार करत होता. मध्येच संशोधनाच्या विषयाकडं त्याचं मन धावलं. त्याच्या मते 'इम्युनॉलॉजी'चा विचार प्रामुख्यानं व्हायला हवा होता. कॅन्सरवर आपल्या मार्गानं लवकरच महत्त्वाचं काही तरी आपल्या हाती लागणार अशी त्याची खात्री होती. अर्थात इतक्या लवकर हुरळून जाण्यात अर्थ नाही हे त्याला कळत होतं; पण वळत नव्हतं. तरीही गेल्या काही वर्षांच्या परिश्रमातून नक्कीच काही तरी सापडणार असं दिसत होतं.

नवीन आणलेल्या HR–7 उंदरांचा विचार तो करू लागला. त्यांच्यात स्तनांचा आनुवंशिक कॅन्सर होता. स्वतःच्याच ट्यूमरविरुद्ध लढण्याची शक्ती त्यांच्यात निर्माण करता येईल असं त्याला वाटत होतं.

त्याच्या पाठीकडून कॅथरिन न्हाणीघरात गेली. पडदा ओढून घेत ती म्हणाली, 'मला वाटतं मिचेलीला खऱ्या डॉक्टरकडं न्यायला हवं !'

चार्लसचा हात थबकला. 'खऱ्या डॉक्टरकडं' हे शब्द त्याला बोचले. त्या बाबतीत तो फारच नाजूक होता.

'मला वाटलं होतं की, डॉक्टरशी लग्न केलं की, कुटुंबाच्या सगळ्या वैद्यकीय तक्रारींकडं नीट लक्ष पुरवलं जाईल !' शॉवरच्या आवाजापेक्षा मोठा आवाज काढत ती म्हणाली.

दाढी करता करता चार्लस थांबला. आपल्या डोळ्यांत राग उतरला आहे हे त्याला आरशात स्पष्ट दिसत होतं. संघर्ष टाळायची धडपड चालली होती त्याची. नव्यानं निर्माण झालेल्या मातृभावनेमुळंच तिला मिचेलीची काळजी वाटते आहे हे त्याला कळत होतं;


# सूर्यफुलांच्या टाकाऊ टरफलांनी प्रकाश दाखविला....

मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या शेतांच्या बांधांवर बी काढून घेतलेली सूर्यफुलांची टरफले भरपूर प्रमाणांत फेकून दिलेली आढळतात.

खान्देशातील एका सुविद्य तरुणाला हीच पर्वणी वाटली. हा हा म्हणता कल्पनेचं रुपांतर प्रत्यक्षांत झालं ! जळगावांत बहुमूल्य 'पेक्टीन' पावडर तयार होऊन देशभर जाऊ लागली. विदेशी मुद्राही कमवू लागली.

एका नव्या कल्पनेला टवटवीत सूर्यफुलाचे स्वरुप आलें.

नव्या नव्या उद्योगधंद्यांचे मागे भक्कमपणानं उभं रहाण हे झालं आम्हाला केवळ निमित्त. त्या मागे तरुण पिढीला भविष्याबद्दल आत्मविश्वास देणं हीच आमची खरी तळमळ.



**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

*-आपुलकीनं वागणारी माणसं!*

स्थापनाः १९३६ शेडयूल्ड बँक
मुख्य कचेरीः सातारा.

विश्वस्त स्वरुपाच्या सर्व कामांसाठी बँकेची संलग्न संस्था दि वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्यूटर कंपनी लि. तुमच्या सेवेसाठी सदैव सज्ज आहे.

BEEJ 203-27

'पण ऊठसूठ स्पेशालिस्टाकडं काय जायचं ?' त्याला वाटलं.

'मिचेलीला अजून अशक्तपणा वाटतो का ?' मुख्य मुद्द्याकडं वळणं चांगलं असा विचार त्यानं केला.

'हे मी सांगायला पाहिजे का तुला ? किती दिवस झाले तिला बरं नाहीये !'

'कॅथरिन मी कॅन्सर-संशोधक आहे !'

म्हाणीचा पडदा बाजूला करीत तो उद्गारला, 'लहान मुलांचा डॉक्टर नाहीये !'

'ओः माफ कर. मला वाटलं तू खराच डॉक्टर आहेस.'

'उगाच शब्दच्छल करू नकोस, फ्लूची साथ आहेच आसपास. मिचेलीलाही गाठलंय त्यानं इतकंच. आणि फ्लूमुळं लोकांना आठवडाभर अशक्तपणा येतोच. मग बरं वाटतं.'

शॉवरखालून डोकं बाहेर काढून चार्लसवर नजर रोखून ती म्हणाली, 'पण आता चार आठवडे झाले, तिला अजून ताप आहे.'

'चार आठवडे !' चार्लसला धक्काच बसला.

'चार आठवडे,' कॅथरीन ठामपणे म्हणाली, 'अगदी पहिल्यांदा थंडी भरल्या भरल्या काही घाबरून गेल्यासारखी बोलत नाहीये मी. लहान मुलांच्या हॉस्पिटलमध्ये डॉ. विलींकडे मी आज मिचेलीला घेऊन जाईन म्हणते. शोनहौजरांच्या मुलालाही तिथं पाहता येईल.'

'ठीक आहे. मी आताच मिचेलीला पाहतो, चार्लस नळ सोडत म्हणाला, 'चार आठवडे म्हणजे फारच झालं. म्हणजे फ्लू नव्हे. कदाचित कॅथरीनच अति करीत असेल म्हणा; पण विषय बदललेला बरा.'

'शोनहौजरांच्या मुलाला काय झालंय ?' चार्लसनं विचारलं. जवळच थोड्या अंतरावर हे शोनहौजर कुटुंब राहात होतं. हेन्री शोनहौजर M. I. T. मध्ये रसायनशास्त्रज्ञ होता. चार्लसला आवडणाऱ्या काहीं थोड्या लोकांत त्याची गणना होती. त्यांचा हा मुलगा टॅड, मिचेलीहून जेमतेम वर्षानंच मोठा होता; पण दोघं एकाच वर्गात होती.

आपला डाव लागू पडला ह्या खुषीत कॅथरिननं पुन्हा शॉवरच्या बाहेर डोकं काढलं, 'टॅड त्या हॉस्पिटलात तीन आठवडे आहे. तो फारच आजारी आहे असं कळलं; पण त्याला हॉस्पिटलातून नेल्यापासून मार्गीशी बोलायलाच झालं नाही.'

'पण झालंय काय ? डॉक्टरांचं निदान काय आहे ? रेझर खाली ठेवत चार्लसनं विचारलं.

'मी तर कधीच ते नाव ऐकलं नव्हतं, काही तरी इलॅस्टिक अनेमिया की कायससं म्हणतात.'

'अप्लास्टिक अनेमिया ?' अविश्वासानं चार्लस उद्गारला.

'बरोबर तसंच कायसं आहे.'

'बाप रे. म्हणजे भलतंच झालं.'.

'म्हणजे काय रे,' चार्लसच्या आवाजातील चिंता जाणवून ती म्हणाली.

'ह्या रोगामध्ये रक्तपेशी निर्माण करण्याचं कामच अस्थिमज्जा थांबवतात.'

'फार वाईट का रे ?'

'फारच. कारण अजून त्यावर काही उपायच माहीत नाही.'

कॅथरिनचे हात-पाय गळल्यासारखे झाले. 'सांसर्गिक नाही ना ?' ती म्हणाली.

'छे !' चार्लस उद्गारला खरा; पण आपण तरी काय सांगणार ? हा काही नेहमीचा आजार नाही.

'मिचेली आणि टॅड नेहमी बरोबर असत,' कॅथरिनच्या आवाजात चांगलाच कंप आला.

चार्लसनं एकदम कॅथरिनकडे पाह्यलं. तिला आपल्याकडून आश्वासन हवंय हे त्याच्या लक्षात आलं. 'एक मिनिट. मिचेलीला पण अप्लास्टिक अनेमिया झालाय असं वाटतंय का तुला ?'

'असेल का ?'

'छे ! डॉक्टरकीच्या विद्यार्थ्यांसारखंच करतेस तू. नवीन रोगाची लक्षणं वाचली की त्यांना वाटतं आपल्यालाच हा रोग झाला नाही ना ? अप्लास्टिक अनेमिया हा अगदी क्वचित होणारा रोग आहे. त्याचं नेमकं कारण अजून माहिती नाही; पण सांसर्गिक नक्कीच

"अप्लास्टिक अनेमिया ?"
अविश्वासानं चार्लस् उद्गारला.




नाही...बिचारा !'

'च, च आणि मी अजून मार्गीला भेटले सुद्धा नाही !' कॅथरिन म्हणाली. आरशात पाहता पाहता तिला वाटलं, 'मार्गी चिंतेनं किती पोखरली असेल. छे ! काही झालं तरी आज तिला भेटायचंच.'

दाढी करता करता चार्लस मनाशी म्हणाला, 'काय आहे या अप्लास्टिक अनेमियाचं ते पुन्हा पाह्यलं पाहिजे. अस्थिमज्जेचं कार्य का थांबतं हे शोधायला हवं. रक्तकर्काचं गुपित तिथंच असावं.'

मिचेलीच्या दारावर चार्लसनं हळुवारपणं टकटक केलं. कान देऊन ऐकल्यावर त्याला शॉवरचा आवाज आला म्हणून तो आत शिरला; पण मिचेली अंथरुणातच त्याच्याकडे पाठ करून झोपली होती. दाराचा आवाज झाल्यावर ती वळली. दोघांची नजरभेट झाली. तिच्या गालांवरून हळूच दोन अश्रू गळले. चार्लसचं हृदय गलवललं.

कॉटच्या कडेला बसून त्यानं हळूच तिच्या कपाळावर ओठ टेकले. तेवढ्यावरून सुद्धा तिला चांगलाच ताप असल्याचं त्याच्या लक्षात आलं. त्यानं टक लावून पाहिलं, तिच्यात त्याला एलिझाबेथचं दर्शन झालं ! किती साम्य दोघींत ! तसेच दात, काळेभोर केस, उंच गालफडं, तशीच तुकतुकीत सावळी कांती ! पण रुंद नाक नि घारे डोळे, मात्र चार्लसपासून उचलले होते तिनं. सगळ्या जगातल्या बारा वर्षांच्या मुलींत तिच्याइतकी सुरेख मुलगी असणार नाही'



अशी त्याची खात्री होती।

आपल्या हातांनी त्यानं तिचे गाल पुसले.

'डॅडी, मला माफ करा,' अश्रुपूर्ण डोळ्यांनी ती म्हणाली.

'माफ करा कशाकरता ?' चार्लस हळुवारपणं म्हणाला.

'मी पुन्हा आजारी पडले. कुणाला त्रास झाला की मला वाईट वाटतं.'

चार्लसनं तिला कुरवाळलं. 'तुझा कुणालाही त्रास होत नाही. तसं तू मनातसुद्धा आणायचं नाही. बरं, पण मी तपासू का तुला एकदा ?'

तिची हनुवटी हलवून त्यानं विचारलं, 'आता सांग पाहू मला, काय होतंय तुला ?'

'मला अशक्तपणा आलाय इतकंच. मी शाळेत जाऊ शकेन. नक्कीच अगदी.'

'घसा दुखतो का ?'

'थोडासा. पण कॅथरिन म्हणते शाळेत नाही जायचं.'

'आणखी काही ? डोक-बिकं ?'

'कान ?'

'काही नाही.'

'थोडंसं दुखतं.'

तिच्या खालच्या पापण्या खाली दाबून चार्लसनं पाह्यलं. पांडुरकेपणा होता. खरं म्हणजे ती सगळीच फिक्कट दिसत होती. 'जीभ पाहू बरं.' किती दिवस आपण हिची तपासणी केली नाही, चार्लसच्या मनात आलं. जीभ बाहेर काढून मिचेली बापाच्या डोळ्यांकडे निरखून पाहू लागली. त्याच्या डोळ्यात काळजीचं लक्षण कुठं दिसतंय का म्हणून शोध घेऊ लागली. घशाच्या गाठी दाबून त्यानं विचारलं, 'दुखतात ?'

'नाही.'

तिला बसती करून तिची पाठ तपासत असतानाच जीन पॉल शॉवरखालून बाहेर आला.

'तू आधी बाहेर जा पाहू डॅडी, त्याला आधी बाहेर जायला सांग ना !'

'बाहेर !' चार्लस म्हणाला. तशी जीन पॉल पळाला. चकच्या हसण्याचाही आवाज आला. चार्लसनं बोटानं मिचेलीची पाठ ठोकून पाहिली. 'छाती तर ठीक आहे.' पुन्हा तिला निजवून पोट दाबून पाहण्यास त्यानं सुरुवात केली. दुखलं तर सांग हं.' थोडा वेळ तपाल्यावर ती एकदम म्हणाली, 'दुखलं.'

'कुठं ?' मिचेलीनं दाखवलं. मध्यावर उजव्या बरगडीखाली दुखतंय असं तिनं सांगितलं.

चार्लस उभा राहिला आणि तिच्याकडे टक लावून पाहू लागला. 'फारच बारीक झाली आहे; पण मुळात तशी ही बारीकच.' हळूहळू त्यानं तिचे पाय दाबायला सुरुवात केली. 'हे काळेनिळे डाग कसले आहेत तुझ्या पायावर ?'

मिचेलीनं खांदे उडवले.

'पाय दुखतात का तुझे ?'

'थोडेसे. विशेषत: पीटी झाली की गुडघे आणि घोटे दुखतात; पण तुम्ही चिठ्ठी दिलीत तर पीटी करावी लागणार नाही मला.'

पुनः चार्लस टक लावून पाहू लागला. ' फिक्कट दिसते आहे. घशातल्या गाठीही सुजलेल्या वाटताहेत. नि तापही आहे; पण चार आठवडे म्हणजे फारच झाले. कॅथरीनचं बरोबर असावं. ' खऱ्या ' डॉक्टरकडे न्यायली हवी !

' डॅडी, ' मिचेली म्हणाली, ' मला शाळा चुकवता येणार नाही. मला तुमच्यासारखं संशोधक डॉक्टर व्हायचंय ना ?'

चार्लस तिची लबाडी उमजून हसला. ' सहावीमध्ये थोडे दिवस शाळा चुकली म्हणून काही फारसं बिघडणार नाही. कॅथरीन तुला आज मुलांच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन जाईल. डॉ. विलींना दाखवायला

' ते मुलांचे डॉक्टर आहेत ना ?'

' होय ना. आणि अठरा वर्षांपर्यंतच्या मुलांना ते तपासतात. '

' पण तुम्हीच न्या ना मला. '

' नाही ग बाई. मला लॅबमध्ये जायलाच हवं; पण तू आधी कपडे करून नाश्त्याला चल बघू !'

' मला भूक नाहीये. '

' मिचेली. हट्ट नको बरं !'

' हट्ट नाही. खरंच भूक नाही मला. '

' बरं. नुसता रस घे हं!' तिचा गालगुच्चा घेत चार्लस म्हणाला.

डॅडी बाहेर जाताच तिला पुन्हा भीतीनं वेढलं. हॉस्पिटलमध्ये जायचं तिच्या जिवावर आलं. वाईट म्हणजे तिला अगदी एकटं वाटू लागलं. उठायची धडपड करतानाच तिला गरगरल्यासारखं झालं.

¤

' काय रे चक, ' चार्लसनं फटकारलं, ' तू अगदी डुकरासारखा दिसतो आहेस. '

चकनं दुर्लक्ष केलं. आणि खाण्याकडे लक्ष पुरवलं.

एकूण चकचा अवतार पाहण्यासारखा होता.

' इतकं घाणेरडं राहिलंच पाहिजे का ?' चार्लसनं बोलणं चालू ठेवलं, ' मला वाटतं आता ते हिप्पीचं फॅड जुनं झालंय. आणि कॉलेजची पोरं जरा बरं कपडे घालू लागलीत !'

' बरोबर. आता हिप्पी गेले, ' जीन पॉल आत येताच उद्गारला. आता पंकचे दिवस आहेत !

' पंक ?' चार्लस चमकून म्हणाला, ' चक हा पंक आहे ?'

' मुळीच नाही, ' जीन पॉल हसत म्हणाला, ' चक हा चक आहे. '

चकनं त्वेषानं जीन पॉलकडं पाहिलं. ' जीन पॉल काय घालतो इकडं डॅडींचं कधीच लक्ष नसतं. नेहमी मलाच टोकरतात. '

' चक, खरं सांग, इतकं घाणेडडं राह्यलाच हवं का ?' चार्लसनं पुन्हा विचारलं; पण चकनं तिकडे पूर्ण दुर्लक्ष केलं. ' चक, मी तुला विचारतोय !'

' आता नाश्त्याच्या वेळी ही चर्चा नको,' तेवढ्यात कॅथरीननं पुढं येऊन चार्लसच्या खांद्याला हात लावून म्हटलं.

' पण, मला निदान उत्तर तर मिळायला हवं !'

खोल श्वास घेऊन चकनं म्हटलं, ' मी काही डॉक्टर नाहीये, कपड्यांकडं अगदी नीट लक्ष पुरवायला. '

चार्लसनं त्याच्या उर्मट चेहऱ्याकडं पाहिलं. चक तसा बुद्धिमान होता; पण अत्यंत आळशी. अशा अभ्यासानं हार्वर्ड दूरच. नॉर्थईस्टर्न इन्स्टिट्यूटमधली प्रगतीच मुळी चांगली नव्हती. तेवढ्यात त्याचं धाकट्याकडं लक्ष गेलं. ' दोन्ही मुलं एकाच बीजाची ना? नि एकाच वातावरणात वाढली ना ?' पण चार्लसनं विषय सोडून दिला.

' वाण्याकडचा निरोप आला होता. ' कॅथरीननंही विषय बदलीत म्हटलं, ' आणि जुनं देणं दिल्याशिवाय नवीन माल द्यायचं नाकारलंय त्यानं. '

' आणि माझी ह्या सत्राची फी पण द्यायचीय. ' चक म्हणाला. ' आधीच उशीर झालाय. फी भरली नाही तर माझे क्रेडिट पॉइंट जातील असं पत्रही मला मिळालंय. ' सत्राचं शुल्क म्हणजे प्रचंडच रक्कम होती.

' पण काल तर पैसे काढले होते, ' कॅथरीन म्हणाली.

' ते पैसे मला लॅबसाठी हवे होते. '

' काय ?' कॅथरीननं चकित होऊन म्हटलं.

' ते परत मिळतील ग. पण उंदरांची नवीन जात आली होती ती घ्यायलाच हवी होती !


' छान. आणि आता चकची फी भरल्यावर आपण खायचं काय ?'

' ते मी पाहीन !'

' मी एखादं काम पाहू का ? टायपिंगचं ?'

' हे पहा. अजून काही आकाश कोसळलेलं नाहीये, ' चिडून चार्लस म्हणाला, ' सर्व काही ठीक आहे. त्यापेक्षा तुझं पीएचडीचं



मला वाटतं आता हिप्पीचं फॅड जुनं झालंय — चार्लस.

काम पूर्ण कर म्हणजे मग चांगली नोकरी तरी मिळेल !'

तेवढ्यात मिचेली आली. अतिशय फिक्कट दिसत होती. कोपऱ्यात जाऊन तिनं स्वतःकरता रस ओतून घेतला. 'शीः ! मला हे बुडबुडे आलेले आवडत नाहीत !'

'वाः वाः ! छोटी राजकन्या आली का ? शाळा चुकवण्याकरता आजारी बिजारी नाही ना पडली ?' जीन पॉल म्हणाला.

'तिला चिडवू नको रे !' चार्लसनं दटावलं.

तेवढ्यात मिचेलीचा पुढं झोक गेला आणि तिला जोरदार शिंक आली. पोटात काही ढवळतंय असं तिला वाटतंय तोच नाकातून जोरदारपणे रक्त आलं. 'डॅडी !' ती किंचाळली. तिची ओंजळ रक्तानं भरली आणि जमिनीवरही सांडलं.

कॅथरिन टॉवेल घेऊन धावली नि चार्लसनं उडी मारून तिला उचललं. तिला घेऊन तो धावत तिच्या खोलीत गेला.

मुलगे एकमेकांकडं पाहात होते. तेवढ्यात कॅथरिन परत आली. तिनं फ्रीजमधनं बर्फाचे तुकडे काढले आणि ती पळाली.

'छेः ! मला तर रक्त बघवतच नाही !' चक म्हणाला.

'सगळ्यांचं लक्ष आपल्याचकडं कसं राहील असं मिचेली नेहमीच करते !' जीन पॉल म्हणला.

'पुन्हा असं बोल तर खरा !'

'सगळ्यांचं लक्ष...'

'चूप, एकदम मूर्खा !' असं म्हणून त्यानं जीन पॉलच्या अंगावर सालं फेकायला सुरुवात केली. रक्त टाळून तो आपल्या खोलीकडे पळाला. टॉवेल घेऊन जीन पॉलनं जमीन मात्र पुसून काढली.

भोजनगृहातून बाहेर आल्यावर चार्लस उद्गारला 'शीः ! काय हा घाण वास !' रिसायकल कंपनीकडून आलेल्या वाऱ्याबरोबर रबर जळल्याची घाण येत होती.

'काय जागा आहे पण !' चक उद्गारला, 'अगदी रहाण्यालायक नाही.' चार्लस गाडी काढत होता.

चार्लसला मुलाचा हा उर्मटपणा आवडला नाही; पण त्यानं वाद वाढवला नाही. तो तसाच कोठाराकडे वळला.

'शक्य तेवढ्या लवकर मी कॅलिफोर्नियाला जाणार !' चार्लसच्या मागं जात चक म्हणाला.

'ह्या कपड्यांत तू नक्कीच शोभून दिसशील !' मागोमाग जीन पॉलही आलाच.

सगळीकडे बर्फ पसरलं होतं. 'डॅड, नेमकं मिचेलीच्या खेळघराशी पसरलेल्या भागात बर्फ कसं नाही ?'

कोठाराचं दार उघडून चार्लसनं डोहाकडे पाहात म्हटलं, 'मला नाही माहिती. कदाचित नदीच्या वाहत्या पाण्यामुळं असेल.

'हूंः ! आणखी एक बदक मेलं. त्यांनाही हा वास सहन होत नसावा !' चक म्हणाला.

'विलक्षण ! बऱ्याच दिवसांत आपल्याला बदकंही दिसली नव्हती. पूर्वी मी मिचेलीच्या खेळघराशी आल्यावर बदकं पकडत असे. आताशी कुठं गेली कुणास ठाऊक !' चार्लस म्हणाला.

'हे पहा आणखी एक बदक; पण ते मेलेलं दिसत नाही !' जीन पॉल ओरडला.

'प्यायलं असेल !' चक.

'चला आपण त्याला मदत करू या !' जीन पॉल म्हणाला.

'त्याला अर्धांगाचा झटका आलेला दिसतोय.' चक म्हणाला.

'काय झालं हो, डॅडी, त्याला ?' जीन पॉल म्हणाला.

'काही समजत नाही बुवा !'

'आपण त्याला कोठारात ठेवू या का ?' जीन पॉल.

'मी बंदूक घेऊन येतो. त्याला ह्यातून मुक्तच करू या !' चक म्हणाला.

'नाही !' जीन पॉल ओरडला, 'कोठारात ठेवू या !'

'ठीक; पण हात लावू नकोस. एक खोकं आण !' जीन पॉल पळाला. 'काय रे चक, तुला काही दयाबुद्धी नाही का ?'

'दया ? तुमच्या लॅबमध्ये तुम्ही प्राण्यांना जे काही करता ती दयाच का ? हूंः !'

चार्लसला मुलाच्या दृष्टीतला तिरस्कार जाणवला. तो गप्प राहिला. चक म्हणजे दिवसेंदिवस त्याला कोड्याप्रमाणं गूढ वाटू

लागला. त्याच्या मुस्कटात ठेवून देण्याचा मोह त्यानं कष्टान आवरला.

जीन पॉल एक खोकं आणि एक फाटकी उशी घेऊन आला. त्यातला कापूस खोक्यात घालून त्यानं बदक उचलून खोक्यात ठेवलं आणि ते निघाले.

गाडीत बसल्यावर कुठचं स्टेशन लावायचं यावरनं दोघा भावांचा वाद सुरू झाला.

'रेडिओ बंद करा. कुठलंच स्टेशन लावायचं नाही ! जरा शांतता मिळू द्यात !'

शाफ्टसबरीकडे येता येता त्यांना जास्तच घाण येऊ लागली. रस्ता पॉटोमॅक नदीच्या काठानंच होता. रिसायकल कंपनीच्या जवळ आल्यावर तर असह्य घाण येऊ लागली. एकूण त्या कंपनीच्या आसपासचं दृश्यच गलिच्छ होतं.

रिसायकल कंपनी मागं पडली आणि जादू व्हावी तशी घाण एकदम नाहीशी झाली. गावातल्या शाळेपाशी जीन पॉल उतरला. त्याचे मित्रही तिथं थांबलेच होते. तो उतरल्यावर गाडीचं दार लावून चार्लसनं गाडी पुढं काढली.

गाडी चालवता चालवता त्याचं मन एकदम पालटून गेलं. एरवी गाडी चालवताना त्याच्या डोक्यात प्रयोगशाळेचे विषय असत; पण आज चकनंच त्याचं मन व्यापून टाकलं होतं.

'शाळा काय म्हणते ?'

'छान आहे.' चक सावध झाला. त्याला शाळेचा विषय वडिलांबरोबर तरी नको होता.

'मुख्य विषय कोणता ठरला तुझा ?'

'अजून नक्की नाही.'

'काही तरी विचार केलाच असशील ?'

'नाही बुवा.'

'कुठचा विषय तुला जास्त आवडतो ?'

'मानसशास्त्र,' चकनं बाहेर पाह्यला सुरुवात केली. हा विषयच आता त्याला नको होता. कारण संवादाचं वळण लवकरच रसायनशास्त्राकडं वळलं असतं !

'मानसशास्त्र ?'

'काय वाईट आहे मानसशास्त्रात ?'

'हॅं: ! वेळेचा दुरुपयोग आहे झालं. त्याचा सगळा पायाच ढिसाळ आहे. मेंदूचं कार्य विलक्षण आहे. ती एक प्रभावी आणि जिवंत शक्ती आहे. विविध कल्पना आणि भावना निर्माण करणारी ती एक गुंतागुंतीची संस्था आहे.'

'हॅं !' वडिलांना नेमकं काय म्हणायचं आहे हे त्याच्या लक्षात येईना; पण वाद घालण्यापेक्षा गप्प राहणं फायद्याचं. कारण तसं त्यांच्या बोलण्यात तथ्यही होतंच असं वाटू लागलं त्याला.

'मग, आज दुपारी लॅबमध्ये येतोस का ?' मध्ये बराच वेळ गेल्यावर चार्लसनं विचारलं, 'माझं काम फार छान चाललं आहे. लवकरच काही तरी गवसेल असं दिसतंय. तुझ्याशी चर्चा करायला आवडेल मला.'

'आज नको !' इन्स्टिटयूटमध्ये जायला त्याला नको असे. मोठे शास्त्रज्ञ म्हणून जो तो वडलांकडे आदरानं पाह्यचा नि त्याचं दडपण त्याला यायचं. त्यातही पुन्हा वडलांच्या संशोधनातलं अक्षरही त्याला कळत नसे.

'तुला जमेल तेव्हा, केव्हाही ये !' आपल्या संशोधनात चकला सहभागी करावं असं चार्लसला नेहमी वाटे; पण त्यानं त्यात कधीच रस घेतला नाही. संशोधन प्रत्यक्ष पाह्यल्यावर कदाचित त्याला रस वाटेल म्हणून चार्लसचा आग्रह. 'उद्या ?'

'बघू या !'

हंटिंग्टन रस्त्यावर चक उतरला. 'इलिझाबेथच्या आजारानं आणि मृत्यूनं तर चकची मनःस्थिती अशी झाली नसेल ? कॅथरिनशी लग्न झाल्यानंतर तरी 'सुधारायला हवं होतं;' पण दुसऱ्या लग्नानंतर चक अधिकच कुढा आणि आतल्या गाठीचा झाला होता.

## दोन

वाइनबुर्गर संशोधनसंस्थेकडे येता येता आपल्या दिवसभराच्या कामाचा विचार चार्लस करू लागला. 'मुलांच्या वर्तनापेक्षा पेशींच्या अंतर्गत असलेल्या जीवनाचा विचार करणं अधिक सोपं आहे,' त्याला वाटलं. नेहमीच्या ठरलेल्या जागी गाडी लावल्यावर तर त्याचा उत्साह दुणावला नि घराचा विसर पडला.

आवारात गाड्यांची गर्दी नेहमीपेक्षा जास्त बघून तो काहीसा अचंब्यात पडला. संचालकांची निळी मर्सिडीज गाडीही दिसत होती.

खिडक्या आणि दरवाजे ह्यांना लावलेल्या प्रचंड काचा नि चौमजली इमारत. वैभवशाली वाइनबुर्गर संस्था चार्ल्सनदीच्या काठी, हार्वर्ड आणि एम. आय. टी. ह्या दोन प्रसिद्ध संस्थांच्या दरम्यान होती.

चार्लसला पाहताच कु. अँड्रयूज नावाच्या स्वागतिकेनं बटन दाबून सरकदरवाजा उघडला. दारावरच्या शिपायानं सुद्धा खडी ताजीम दिली. एक मोठा शास्त्रज्ञ म्हणून त्याचं नाव होतं ! जेनेटिक्समध्ये चालू असलेल्या त्याच्या संशोधनाचं महत्त्व पुष्कळांना माहीत होतं. अभिवादन करीत आणि स्वीकारीत तो आत शिरला.

बाहेरच्या मोठ्या हॉलपाशी क्षणभर थबकून त्यानं पाहिलं. सिगारेटचा धूर आणि थोडीशी गर्दी !

'डॉ. मार्टेल...डॉ. मार्टेल...' त्यातल्या एकानं हाक मारली.

आपलं नाव ऐकताच चकित होऊन तो वळला. तोच त्याच्याभोवती सर्वांनी गर्दी केली आणि एकदम बोलायला सुरुवात केली. एकानं तेवढ्यात त्याच्या नाकाशी माईक धरला.

'मी 'ग्लोब'चा प्रतिनिधी आहे !' तो ओरडला, 'मी काही प्रश्न विचारू का ?'

माईक बाजूला ढकलीत चार्लसनं सटकायचा विचार केला.

'डॉ. मार्टल, हा अभ्यास आता तुम्ही हातात घेणार हे खरं का ?' चार्लसचा कोट ओढत एक तरुणी ओरडली.

'मी मुलाखती देत नसतो.' असं म्हणून तो गर्दीतून निघाला आणि वार्ताहरांनी त्याचा नाद सोडला.

'काय शिंची कटकट आहे !' वेगानं दूर जाता जाता चार्लस

पुटपुटला. त्याला वृत्तपत्रांचा अगदी तिटकारा. इलिझाबेथच्या आजारपणात त्यांचा त्याला फारच त्रास झाला होता. 'का म्हणून आमच्या खाजगी आयुष्यात ह्यांनी लुडबुडावं ?' लॅबमध्ये शिरून त्यानं धाडकन दार लावलं.

त्या आवाजानं एलन शेल्डन दचकून उडालीच ! गेली सहा वर्षं त्याची मदतनीस म्हणून ती काम करीत होती. सिरम प्रोटीन वेगळं करणारी उपकरणं मांडण्याचं तिचं काम चालू होतं. तेवढ्यात चार्लस आला. तो अगदी वक्तशीरपणं ७–४५ ला येत असे आणि प्रयोगशाळेची तयारी करण्याकरता ती ७–१५ लाच येत असे. बरोबर ८ वाजता काम सुरू करण्याचा त्याचा कटाक्ष असे.

'मी असं धाडकन दार लावलं असतं तर ?' एलन त्रासून म्हणाली एलन ही एक तीस वर्षांची आकर्षक तरुणी होती. तिची नेमणूक ज्या वेळी चार्लसनं केली त्या वेळी त्याच्या सहकाऱ्यांनी त्याची चेष्टा केली होती. पण कामामध्ये गर्क झाल्यामुळं चार्लसचं तिच्या सौंदर्या-कडे लक्ष गेलं नाही. बऱ्याच वर्षांनंतर तिचं व्यक्तिमत्व त्याच्या ध्यानात आलं. त्याच्या दृष्टीनं तिची बुद्धी, कामातील लक्ष आणि एम. आय. टी. मधील उत्कृष्ट प्रशिक्षण हे गुण महत्त्वाचे होते.

'माफ कर हं. मी तुला उगीच दचकवलं.' कोट काढता काढता चार्लस म्हणाला, 'पण हे पत्रकार लेकाचे !'

'आम्हाला माहितीय तुला त्यांचा किती राग आहे ते.'

चार्लसनं कामाला सुरुवात केली. त्याची प्रयोगशाळा म्हणजे एक मोठी आयताकार खोली आणि शेजारीच एक कचेरी. प्रयोगाकरता वापरावयाचे प्राणीही प्रयोगशाळेतच आणलेले असत. प्राण्यांचा मुख्य संग्रह इमारतीत अन्यत्र होता; पण आपल्या प्रयोगाचे प्राणी आपल्याच जवळ असले की त्यांचं निरीक्षण चांगलं करता येतं आणि काळजीही नीट घेता येते. कारण ह्या बाबतीत तो फार दक्ष होता.

'कशाकरता जमले होते हे सगळे वार्ताहर ?' त्यानं विचारलं, 'आंघोळ करता करता आपल्या एखाद्या पुढाऱ्याला काही अफलातून शोध तर नाही ना लागला ?'

'थोडा तरी उदार दृष्टिकोन हवा !' एलननं फटकारलं, 'प्रशासनाचं कामही करायला हवंच कुणी तरी.'

'माफ कर.' कुचेष्टेने तो म्हणाला.

'खरं म्हणजे ही फार गंभीर बाब आहे, चेष्टा नव्हे; ब्रिग्टनची भानगड 'न्यूयॉर्क टाइम्स'ला कळलीय.'

'ह्या नवीन पिढीतल्या डॉक्टरांना प्रसिद्धीच हवी असते.' चार्लस वैतागानं म्हणाला, 'महिन्यापूर्वी 'टाइम' मध्ये जेव्हा विरोधी अभिप्राय आला होता तेव्हाच त्याला कळायला हवं होतं. बरं पण त्यानं आता काय केलंन ?'

'जसं काही तुला माहितीच नाही.' एलन अविश्वासाच्या सुरात म्हणाली.

'एलन, मी इथं कामाकरता येतो. बाकीच्यांना नसेल; पण तुला तरी माहितीय.'

'ते खरं रे; पण हे ब्रिग्टनप्रकरण... सगळ्यांना माहितीय. गेला आठवडाभर इथं कुजबुज चाललीय.'

'मी तुला ओळखतो म्हणून, नाही तर तू मुद्दाम मला खिजवण्याकरता म्हणते आहेस असं वाटलं असतं. सांगायचं नसेल तर नको सांगू. आणि मला न कळलेलंच बरं !'

'जे काय आहे ते फारच वाईट आहे. आपल्या कॅन्सरग्रस्त उंदरांच्या जागी डॉ. टॉमस ब्रिग्टन गुपचूप चांगले उंदीर आणून ठेवतात असा अहवाल, प्राणिविभागप्रमुखांनी संचालकांना दिलाय !'

'भले !' उपरोधानं चार्लस म्हणाला, 'म्हणजे आपलं कॅन्सरान हे औषध किती प्रभावी आहे असं दाखवायचं होतं त्याला म्हण की !'

'बरोब्बर ! कारण कॅन्सरान हे त्याचं स्वतःचं औषध आहे. कॅन्सरानमुळंच तर त्याला आता इतकी प्रसिद्धी मिळाली होती ना !'

'आणि इथलं पदसुद्धा !' चार्लसचा चेहरा तिरस्कारानं लाल झाला. त्याला मुळातच डॉ. ब्रिग्टननं केलेला प्रसिद्धीचा उपद्व्याप आवडला नव्हता. पण त्यानं तसं म्हणताच तो मत्सरानं तसं म्हणत असावा असं लोकांनी म्हटलं.

'मला त्याची कीव येते. त्याच्या करियरवर पण आता परिणाम होईल !'

'खरं म्हणतेस ? तुला त्या लुच्च्याची दया येते हं ! फसवणुकीबद्दल त्याला इथून हाकून लावलं पाहिजे. असल्या खोटया शोधानं किती जणांचं आयुष्य धोक्यात येईल !'

'इतक्यात मी तरी निष्कर्ष काढणार नाही कुठलाही. त्याच्यावर अकाली प्रसिद्धी करण्याबद्दल दडपणही आलं असेल !'

'सचोटीचा प्रश्न जिथं येतो तिथं दडपणाला कसं बळी पडून चालेल ?'


**कृषि–उद्योगाद्वारे शेतीची समृद्धी**

चोखंदळ शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेली व सर्व पिके व जमिनीस उपयुक्त असलेली

**कृषि उद्योग दाणेदार खते**

१५ : ५ : ५; १८ : १८ : १०; १५ : १५ : १५; २० : १० : ५

तसेच सेंद्रिय खते वगैरे

**कृषि उद्योग** : जंतुनाशके व अवजारे

**सुग्रास** : पशुपक्षी खाद्य

**नोगा** : स्क्वाशेस्, जॅम्पस् केचप व सॉसेस्

**महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित**

राजन हाऊस, तिसरा मजला, प्रभादेवी, मुंबई–४०० ०२५

'मला नाही वाटत. लोकांच्या काही अडचणीही असतात: सगळेच तुझ्यासारखे अतिमानव नव्हेत !'

'तसल्या गटारबुद्धीची तरफदारी कशाला करतेस?' तिच्या स्वरातली कुचेष्टेची छटा पाहून तो चमकला.

'ठीक आहे; पण थोडी माणुसकी दाखवलीस तर तुझाच फायदा आहे चार्लस मार्टल. दुसऱ्यांच्या भावनांची तू कधीच कदर करीत नाहीस!' एलनच्या आवाजात कंप आला.

वातावरणात एक प्रकारची तणावपूर्ण शांतता पसरली. एलन आपल्या कामाला निघून गेली आणि चार्लसनंही लॅब-बुक उघडलं; पण त्याचं लक्ष लागेना. आपण खरंच इतरांना इतकं दुखवतो का ? आपल्या विरुद्ध एलन आज प्रथमच बोलली. कॅथरिन भेटण्यापूर्वी तिचा आपला जो संबंध येऊन गेला त्याचा परिणाम असेल का ? आता त्याचा कशाला विचार ? जाऊ द्या झालं !'

'मी रागावलो याचं वाईट वाटतं.' चार्लस म्हणाला, 'मला तसं म्हणायचं नव्हतं; पण मीसुद्धा वाहवत गेलो.'

'मलाही वाईट वाटतं मी काय म्हटलं त्याबद्दल.' तिच्या स्वरात कापरेपणा होताच.

चार्लसला पटलं नाही. आपण खरंच दुसऱ्याच्या भावनांचा विचार करीत नाही का असं विचारावंसं वाटलं; पण त्याला धीर झाला नाही.

'हो, बरं आठवलं डॉ. मॉरिसनला तुला भेटायचं आहे. तू येण्यापूर्वी आला होता तो इथं'

'तो थांबेल. आधी कामाचं पाहू या.'

¤

चार्लसच्या वागण्यानं कॅथरिन चिडली. मिचेलीच्या नाकातनं इतकं रक्त आलं तर आपले कार्यक्रम बाजूला ठेवून खरं म्हणजे त्यानंच मिचेलीला बालरुग्णालयात न्यायला हवं होतं. काही झालं तरी तो स्वतःही एक डॉक्टरच होता. रक्त, आजार, हॉस्पिटल म्हटलं की तिला भीतीच वाटे. कदाचित लहानपणच्या प्रसंगाचा परिणाम असेल. अपेंडिक्सचं निदान लवकर न झाल्यामुळं झालेली फरपट. दहा वर्षांची असतानाचं चित्र अजून अस्पष्ट नव्हतं. 'चकचकीत शुभ्र टाइल्स, जंतुनाशक औषधांचा दर्प, अजून काहीही विसरता येत नव्हतं. सर्वांत वाईट म्हणजे गुप्तेंद्रियांची तपासणी. आपल्याला कुणी काही समजूनही सांगत नव्हतं. नि मिचेलीला आपल्यावर टाकून चार्लस आपला निघून गेला!' त्या विचारांनी ती शहारली.

शेवटी सगळे विचार झटकून मार्गी शोनहौजरला फोन करण्याकरता ती स्वयंपाकघरात आली. टॅड जर अजूनही हॉस्पिटलातच असेल तर तिलाही बोस्टनला घेऊन जाता येईल आपल्याबरोबर. फोनवर मार्गीची सोळा वर्षांची मुलगी नॅन्सी आली.

'आई आधीच गेली आहे; पण...'

'मी नुसता एक प्रयत्न करून पाहिला. हरकत नाही. मी तिला हॉस्पिटलातच भेटेन; पण भेट झाली नाही तर तिला सांग मी फोन केल्याचं.'

'नक्की. तिला बरंच वाटेल तुम्ही फोन केल्याचं कळल्यावर.'

'टॅडचं कसंय आता ? त्याला घरी कधी सोडणार ?'



हे ब्रिग्टन प्रकरण ..
गेला आठवडाभर इथे कुजबूज चाललीय् !

¤

'तो फारच आजारी आहे, मार्टलबाई. त्याला अस्थि-मज्जा-रोपण करावं लागणार बहुधा. आम्हा सर्वांची परीक्षा घेतली. फक्त छोटीच्या लिसाचीच मज्जा त्याला चालणार आहे. त्याला ICU मध्ये ठेवलंय.'

'मला तर धक्काच बसला ऐकून,' कॅथरिन म्हणाली. आपल्या पायातली शक्तीच कुणी काढून घेतंय असं वाटलं तिला. अस्थि-मज्जा-रोपण म्हणजे काय ते तिला माहिती नव्हतं; पण काही तरी गंभीर आणि भीतिदायक असावं. तिनं 'अच्छा' म्हणून फोन ठेवला. मार्गीला आधीच न भेटल्याबद्दल तिला अपराधी वाटू लागलं. टॅडचं दुखणं ऐकल्यापासून मिचेलीबद्दल तिला अधिकच चिंता लागली. खोल श्वास घेऊन ती मिचेलीच्या खोलीत आली.

'मी डॉ विलींना फोन केला होता. फोनवर नर्सच होती. तिनं म्हटलं अगदी लगेच या ! कारण नंतर फार गर्दी होईल आणि थांबावं लागेल. तेव्हा आपण गाडीतच टीव्ही पाहू,' स्वरात सगळा धीर एकवटून कॅथरिन म्हणाली.

'पण मला आता बरं वाटतंय' मिचेलीनं हसण्याचा प्रयत्न केला.

'छान ! पण तू इथंच बस. मी तुझा कोट वगैरे घेऊन येते.' कॅथरिन जिना चढू लागली.

'कॅथरिन, पण मी आता चांगली आहे. शाळेत जाऊ शकेन मी' तिनं जोरजोरात पाय हलवून दाखवले. डॅडी आपल्यावर रागावलेत

असं उगीचच वाटत होतं तिला.

कॅथरिननं आपल्या सावत्र मुलीकडं टक लावून पाहिलं. चार्लसच्या लाडक्या मुलीकडं पाहताना तिला भरून आलं. कॅथरिनसारखी मिचेलीलापण हॉस्पिटलची भीती असणार. नाही तर तिनं यायला नकार दिला नसता. कॅथरिन तिच्याजवळ गेली. तिला जवळ घेऊन म्हणाली, 'अग, घाबरण्यासारखं काही नाही !'

'मी मुळीच भीत नाहीये,' कॅथरिनचा हात दूर करीत मिचेली म्हणाली.

'नक्की ?' आपली माया हिनं का नाकारावी याचं नवल वाटलं तिला.

'मला वाटतं मी शाळेत जाऊ शकेन. तू चिठ्ठी दिलीस तर पीटी तेवढी करावी लागणार नाही.'

'मिचेली, गेला महिनाभर तू आजारी आहेस आणि आज तापही होता तुला. लवकर काही तरी उपाय केलाच पाहिजे !'

'पण आता मी बरी आहे. मला शाळेत जायचंय !'

कॅथरिन गप्प राहून मिचेलीकडे पाहू लागली. मिचेली म्हणजे तिला अजून गूढच वाटे. इतकी छोटी होती; पण तिनं अजून कॅथरिनला दूर ठेवलं होतं. लहानपणी आई दुरावल्यामुळं ती किती दुःखी असेल, तिला वाटलं.

'आपण असं करू,' विचार करून कॅथरिन म्हणाली, 'तुझा ताप बघू. ताप असला तर हॉस्पिटलमध्ये जाऊ. नसला तर नको. काय ?'

आणि मिचेलीला १००.८ ताप होता !

कॅथरिननं मोठी स्टेशनवॅगन बाहेर काढली. बालरुग्णालयात गाडी घेता घेता तिला वाटलं, गाडीत फारसं वाईट घडलं नाही हे नशीबच ! मिचेली फारशी बोलतही नव्हती. बाहुलीसारखी स्वस्थ बसून होती.

'कसला विचार करत्येस ?' गाडी लावण्यापूर्वी कॅथरिन म्हणाली.

'काही नाही,' हालचाल न करता मिचेली म्हणाली.

डोळ्यांच्या कोपऱ्यातून कॅथरिन बघत होती. मिचेलीनं आपल्याला तिची काळजी घेऊ द्यावी, माया करू द्यावी, असं सारखं वाटत होतं तिला.

'मला नाही सांगणार तुझं दुःख ?'

'मला अगदी बरं वाटत नाही ग कॅथरिन. मला गाडीतून बाहेरसुद्धा तुलाच काढावं लागणार !'

कॅथरिननं एकदम गाडी थांबवली आणि आपला हात तिच्याभोवती घातला. मिचेलीनं विरोध केला नाही. उलट ती आणखी पुढं झाली आणि तिनं कॅथरिनच्या कुशीत डोकं घातलं. तिच्या डोळ्यातल्या उष्ण अश्रूंची जाणीव झाली कॅथरिनला.

'तुला सगळी मदत करायला आवडेल मला. मिचेली, तू मला सांग, अगदी शप्पत.'

मिचेलीच्या अंतःकरणातलं एक दालन उघडलं आहे असं वाटलं तिला. दोन अडीच वर्षांच्या चिकाटीला जणु आता फळ धरलं !

पाठीमागून हॉर्न वाजू लागताच ती भानावर आली आणि तिनं गाडी पुढं घेतली. मिचेली कुशीतच होती याचं समाधान मानत ! तिला आता अगदी खऱ्या आईसारखं वाटू लागलं.

कॅथरिननं मिचेलीकरता चाकाची खुर्ची मागवली. आधी मिचेली नको म्हणाली; पण नंतर बसली.

मिचेलीशी नव्यानं झालेल्या जवळीकीमुळं हॉस्पिटलचं वातावरण कॅथरिनला काहीसं सुसह्य झालं. हॉस्पिटलमध्येही वातावरण प्रसन्न



ठेवण्याचा प्रयत्न केला होता. अगदी उंची हॉटेलप्रमाणं वाटत होतं. निरनिराळ्या देखाव्यांची नी प्राण्यांची चित्रं होती सर्वत्र.

डॉ. विलीच्या खोलीबाहेर पाच पेशंट आधीच थांबले होते. सगळेच्या सगळे दोन वर्षांच्या आतले होते. हे पाहून मिचेलीला भीति वाटली. इकडे तिकडे बघत तिनं कॅथरिनला हळूच विचारलं, 'मला टोचणार नाहीत ना ?'

'काही माहीत नाही; पण टोचावं लागलंच तर आपण नंतर काही तरी गंमत करू. तू म्हणशील ती हं !'

'डॅडींना भेटता येईल ?'

'तर !' मिचेलीला एका खुर्चीत बसवून तीही बसली. 'फोन करून टॅड कुठं असेल ते विचारते. तू ठीक आहेस ना ?'

'हो मी ठीक आहे. तू कर फोन !'

कॅथरिन फोन करायला गेली. मिचेलीला वाटलं आपण आता वीस वर्षांच्या झालोत आणि डॉक्टर होऊन नर्सशी बोलतो आहेत. 'डॅडी म्हणाले होते, डॉक्टर इंजक्शन देत नाही ते काम नर्स करतात.

¤

'डॉ. मार्टेल,' प्रयोगशाळेच्या दारात उभं राहून डॉ. पीटर मॉरिसननी हाक मारली. 'तुला माझा निरोप मिळाला नाही ?'

सिरमचे नमुने किरणोत्सर्गाचं मापन करणाऱ्या यंत्रात घालून चार्लस वळला. डॉ. मॉरिसन हा शरीरविज्ञानविभागाचा प्रशासक होता. तो काहीसा चवताळलेला दिसला.

'दहा-पंधरा मिनिटांत तिकडे येतो,' चार्लस म्हणाला, 'दोन तीन महत्त्वाच्या गोष्टी उरकायच्या आहेत.'

मॉरिसननं क्षणभर विचार केला आणि तो म्हणाला, 'मी कचेरीत थांबतो.'

'तू त्यांना उगीचच डिवचलंस,' मॉरिसन गेल्यावर एलन म्हणाली 'ते उपद्रव दिल्याशिवाय राहाणार नाहीत.'

'त्याला तसंच पाहिजे. काय तो करीत असतो कचेरीत बसून देव जाणे.'

'प्रशासनाचं काम कुणी तरी पाह्यलाच हवं !'

'खरं तर तो एक चांगल्या दर्जाचा संशोधक होता. पण संचालक व्हायच्या महत्त्वाकांक्षेनं पछाडलंय बिचाऱ्याला सारखं आपलं कागद बैठका, जेवणं आणि बड्यांच्या भेटी यात बुडलाय !'

'पण बड्यांच्या भेटींतूनच पैसा उभा राहतोय ना ?'

'असेलही,' चार्लस म्हणाला, 'पण त्याकरता शरीर-विज्ञानाच डॉक्टर कशाला खर्ची घालायचा. ज्याला देणगीच द्यायचीय ते काम पाहूनच देतात !'

'मान्य तुझं; पण ते नमुने आता माझ्याकडं दे नि डॉ. मॉरिसनना भेटायला जा बघू आणि लवकर ये. कारण ह्या उंदरांचं रक्त काढणं मला नाही जमायचं.'

दहाच मिनिटांनी चार्लस दुसऱ्या मजल्यावर आला. मॉरिसननं कशाला बोलवलं असेल याची काहीच कल्पना त्याला येईना. कदाचित पुढच्या सभेच्या वेळी आपण एखादा पेपर वाचावा असं सुचवायचं असेल. चार्लसला हे सगळं पसंत नसे. कसं तरी करून प्रसिद्धी मिळवायला त्याला आवडत नसे; पण एखाद्यानं किती पेपर्स प्रसिद्ध केलेत यावरच त्याचं मोजमाप होत असे ना ! अर्थात चार्लसच्या कामाबद्दल त्याच्या सगळ्याच सहकाऱ्यांना अतिशय आदर होता. खळखळ फक्त प्रशासनाचीच असे.

डॉ. मॉरिसनची कचेरी खालच्या मजल्यावरच्या प्रयोगशाळेपेक्षा एकदम निराळी दिसे. प्रयोगशाळेची कचेरी वाटण्यापेक्षा एखाद्या कायदेपंडिताची कचेरी असावी असा थाट होता. तो पाहिला की चार्लसचं डोकं फिरत असे. 'पैसा देणाऱ्यांना वाटायच खरंच आपण संशोधनावर पैसा खर्च करतो आहोत.'

आणि याच मनःस्थितीत तो मॉरिसनच्या कचेरीपाशी आला. एकाएकी त्याच्या लक्षात आलं की प्रत्येक जण त्याच्याकडेच टक लावून पाहतोय. काही तरी गंभीर प्रसंग घडणार असावा असं दिसत होतं !

चार्लस आत शिरताच मॉरिसन आपल्या शिसवी लाकडाच्या प्रशस्त टेबलामागून पुढं आला आणि त्यानं चार्लसच अगदी तोंड भरून स्वागत केला. त्याचा मगाचा राग कुठल्याकुठं पळाला होता. सवयीनं चार्लसनं हात पुढं केला; पण असल्या स्वागताची त्याला अपेक्षा नव्हती !

मॉरिसनच्या उंची सुटापुढं चार्लसचे ढिले गबाळे कपडे अगदीच विशोभित वाटत होते. शर्टाच्या बाह्याही दुमडलेल्या अवस्थेत होत्या.

'सुस्वागतम्,' जणू काही सकाळी त्यांची भेट झालीच नव्हती नी आज प्रथमच त्यांची भेट होत होती अशा थाटात मॉरिसन उद्गा-






मिचेल म्हणजे कॅथरिनला अजूनही गूढच वाटे !

¤

रला, हातानंच त्यानं चार्लस बसण्याची खूण केली. ‘कॉफी ?’

चार्लसनं नकार दिला ‘काही तरी गडबड दिसतेय !’

‘न्यूयॉर्क टाइम्स वाचलास आजचा ?’

चार्लसनं मान हलवली.

मारिसनन वृत्तपत्रातील एका बातमीकडे त्याचं लक्ष वेधलं. ‘वाइन, बुर्गर कॅन्सर रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये ब्रह्मघोटाळा !’

चार्लसनं पहिल्या परिच्छेदाकडे दृष्टिक्षेप केला. सकाळी एलननं सांगितलेलीच माहिती जास्त तपशिलानं दिली होती.

‘भयंकर नाही का ?’ मॉरिसनं विचारलं.

चार्लसनं अर्धवट मान डोलवली. येणाऱ्या देणग्यांवर ह्या प्रकरणामुळं विपरीत परिणाम होणार हे सरळं होतं. आणि औषधाची कीर्ती नि विक्री धोक्यात आली होती हेही खरं होतं. चार्लसच्या मते कॅन्सरान हे केवळ नुसतं पेशी नष्ट करणारं औषध होतं. त्याच्या मते कॅन्सरवर रासायनिक चिकित्सेपेक्षा प्रतिकारजनक चिकित्सेचा जास्त उपयोग झाला असता.

‘डॉ. ब्रिग्टनला कळायला हवं होतं, मॉरिसन म्हणाला, ‘अजून जवान आहे. नी फारच अधीर आहे.

चार्लसनं मान डोलावली. ‘एक मिनिट,’ चार्लस मध्येच म्हणाला ‘हे सर्व गमतीदार आहे; पण याच्यापेक्षा मला खाली चाललेल्या माझ्या कामाकडे वळू द्या ना. नेमकं काही सुचवायचंय का ?’

‘अर्थात. कालच संचालक मंडळाची तातडीची सभा झाली. जर आपण डॉ बिग्टन प्रकरणात काही कारवाई केली नाही तर बळी जाईल आपलं कॅन्सरान. याचं गांभीर्य लक्षात आलंच असेल तुझ्या.’

‘तर,’ पण त्याचं मन निराळयाच काळजीनं घेरलं होतं.

‘त्यामुळं, हे औषध जर वाचवायचं असेल तर त्याच्या बाजूनं एखाद्या नाणावलेल्या शास्त्रज्ञानं जाहीरपणं उभं राहिलं पाहिजे असं ठरलं. आणि मला सांगायला आनंद वाटतो, चार्लस मार्टेल, की त्यासाठी तुझी निवड झाली आहे.’

चार्लसनं डोळे मिटून घेतले आणि कपाळावर हात मारला. तिथून पळून जावंसं त्यांच्या मनात आलं; पण त्यानं मन आवरलं. मॉरिसनला आपलं मन कळलंय की काय असा संशय आला. कदाचित आपण आनंदाची बातमी सांगतो आहोत असा त्याचा प्रामाणिक समज असावा.

‘मला अभिमान वाटतो की, माझ्या विभागातील एका शास्त्रज्ञाची निवड झालीय; पण खरं सांगू, मला मुळीच नवल वाटलं नाही. तुझ्या कामाचं योग्य मोल होतंय याचा मला आनंद वाटतोय.’

‘हे पहा,’ स्वरांत शक्य तेवढी स्थिरता आणून चार्लस म्हणाला, ‘संचालक मंडळाला माझा निरोप कळवा की, माझ्यावर असलेल्या त्यांच्या विश्वासाबद्दल मी आभारी आहे; पण माझं काम सध्या फारच छान प्रगती करत आहे आणि कॅन्सरान प्रकल्प मी दुर्दैवानं अंगावर घेऊ शकत नाही. त्यांनी दुसऱ्या कुणाचीही निवड करावी !’

‘थट्टा करतोयस !’ मॉरिसनचं हास्य मावळलं.

‘मुळीच नाही. माझ्या आताच्या कामाची प्रगती व वेग पाहता मला ते सोडता यायचं नाही !’

‘पण तू तर गेल्या कित्येक वर्षांत एकही पेपर प्रसिद्ध केला नाही. शिवाय तू स्वत: बाहेरून कोठूनही देणग्या न आणता संस्थेच्या फंडातून संशोधन चालवलंयस. अर्थात, तू स्वत:ला कर्करोगावरील प्रतिकारजनक चिकित्सेलाच वाहून घेतलं आहेस ते माझ्याच पाठिंब्यावर आणि कॅन्सरान प्रकल्प संपला की, तुला पुन्हा तुझ्या स्वत:च्या संशोधनाकडं वळता येईल ना !’ मॉरिसन उठला आणि टेबलामागच्या खुर्चीवर जाऊन बसला. भेट संपल्याची ती सूचनाच होती.

‘पण मला माझं काम मधेच कसं सोडता येईल ?’ त्याच्या स्वरांत वैफल्य डोकावू लागलं, ‘आता शक्य नाही. माझं काम फारच छान चाललंय आणि मी हैब्रिडोमावर पेपर दिला तो ? तो विचारात घ्या की!’

‘ओ: ! हैब्रिडोमा. ॲन्टिबॉडींचा कारखाना ! ठीक, दोन प्रश्न शिल्लक आहेतच. एक म्हणजे त्याला पुष्कळ वर्षं झाली आणि दुसरं म्हणजे तू ते प्रसिद्ध केलं नाहीस ! त्यामुळं त्याचा आम्हाला देणग्या मिळवायला उपयोग झाला नाही. संचालक मंडळात तुझी बाजू मांडायला मला हैब्रिडोमाचा उपयोग होईलसं नाही वाटतं.’

‘माझ्या संपूर्ण संशोधनातली ती एक पायरी होती आणि मला प्रसिद्ध करायची घाई केलेली आवडत नाही !’

'ते आम्हाला माहितीय. म्हणूनच तू अजून आहेस तिथंच आहेस, विभागप्रमुख झाला नाहीस.'

'मला व्हायचंही नाही विभागप्रमुख.' चार्लस फूत्कारला. त्याचा संयम आता सुटू लागला. 'मला फक्त संशोधन करायचंय. पेपर प्रसिद्ध करून देणग्या मिळवायच्या नाहीत.'

'मला वाटतं हा वैयक्तिक अपमान आहे.'

'तुला काय पाहिजे ते समज.' आपला राग आवरण्याचा मुळीही प्रयत्न न करता चार्लस ओरडला उभा राहून तो जाता जाता म्हणाला, 'आणखी एक सर्वांत मोठं कारण म्हणजे माझा कॅन्सरान-वर मुळीच विश्वास नाही.'

'काय भकतोयस ?' मॉरिसनचाही संयम आता संपला.

'म्हणजे असं की, पेशीविष असलेलं कॅन्सरान हे कॅन्सरवरचे औषध. तुम्ही असं समजता की, त्याच्यामुळे आवश्यक पेशींपेक्षा कॅन्सरपेशी अधिक वेगानं नष्ट होतील आणि एकदा रोगी कर्करोगा-तून मुक्त झाला की, त्याच्याकडे नेहमीच्या पेशी पुरेशा राहतील; पण हा तात्पुरता उपाय झाला. कर्करोगावरचा खरा उपाय तेव्हाच सापडेल की, ज्यावेळी आपल्याला पेशींच्या जीवनाची प्रक्रिया आणि त्यांच्यातील परस्पर रासायनिक संबंधाची अचूक माहिती होईल.'

चार्लस अस्वस्थपणे फेऱ्या घालत होता आणि याउलट मॉरिसन स्वस्थपणे त्याची हालचाल पाहात होता.

'मी म्हणतो,' चार्लस ओरडला, 'तुमच्या ह्या रोगाकडे बघ-ण्याचा दृष्टिकोनच चुकीचा आहे. कर्करोग हा इतर रोगांप्रमाणे जंतूंपासून किंवा संसर्गाने होत नाही. त्यामुळे अॅन्टिबायॉटिक औष-धांचा जादूप्रमाणे प्रभाव पडेल ही कल्पना चुकीची आहे.' चार्लस थांबला आणि मॉरिसनच्या टेबलावर हात ठेवून शांतपणे पण ठाम-पणे म्हणाला, 'मी यावर भरपूर विचार केलाय. डॉ. मॉरिसन, कॅन्सर हा नेहमीमारखा रोग नव्हे बहुपेशीय जीव अस्तित्वात येण्यापूर्वीचा काळ आठव ! जीवसृष्टीच्या प्रारंभी परस्परांशी कोणताही संबंध नसलेले एकपेशीय जीव होते. नंतर, अर्थात लक्षावधी वर्षांपूर्वीच, त्यांना असं जाणवलं की, आपण एकत्र येऊन जगणं सोयीचं. त्यांच्या-तला संपर्क हा रासायनिक स्वरूपाचा असे. मेंदूच्या पेशी नेमकं मेंदूचंच किंवा हृदयाच्या पेशी नेमकं हृदयाचंच काम कसं करतात ?' आपल्यातील रासायनिक संपर्कामधून. या उलट कर्कपेशी ह्या प्रका-रच्या संपर्काला प्रतिसाद देत नाहीत. त्या अतिप्राचीन काळाप्रमाणं स्वतंत्र एकपेशी जीव म्हणूनच जगू इच्छितात. म्हणून तर प्रतिकार-जनक उपायांचा विचार केला पाहिजे.

क्षणभर शांतता पसरली.

'वा ! वा ! छान ! मॉरिसन म्हणाला.' पण दुर्दैवानं आपण इथं फजूल भाषणं करायला जमलो नाही. तू म्हणतोस त्या 'प्रति-कारवादावर' गेल्या काही दशकांत खूप संशोधन झालंय; पण कर्करुग्णांचं आयुष्य सुधारलं नाही !...'

'तोच तर मुद्दा आहे.' मधेच चार्लस म्हणाला. प्रतिकारशक्ती निर्माण करण्यानंच रोग बरा होईल. नुसत्या वेदनाशामकांनी नव्हे.'

'मी तुझं सगळं ऐकलं,' डॉ. मॉरिसन म्हणाला, 'आता मधे न बोलता तू माझं सगळं ऐक. प्रतिकारजनक औषधांच्या संशोधना-करता तूर्त तरी फारच थोडा पैसा उपलब्ध आहे; पण कॅन्सरान-प्रकल्पाकरता नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट आणि अमेरिकेत कॅन्सर सोसायटी ह्या दोघांनी प्रचंड अनुदान दिलं आहे आणि वाइनबर्गरला पैसा हवाय.'

चार्लस काही बोलणार इतक्यात डॉ. मॉरिसननं त्याला गप्प राहण्याची खूण केली, चार्लस मटकन खुर्चीत बसला. सगळ्या बाजूनं आपल्याला ह्या नोकरशाहीनं घेरलय असं त्याला वाटू लागलं.

ऐटीत चष्मा काढून ठेवीत डॉ. मॉरिसन म्हणाला, 'तू एक उत्तम शास्त्रज्ञ आहेस, हे सर्वजण जाणतात आणि आत्ता आम्हाला तुझी गरजही आहे. तू विक्षिप्त असलास तरी आम्ही चालवून घेतो. चालतं असं नव्हे तुझ्याबद्दलच्या हेव्यामुळं किंवा तुझ्या अहंमन्यतेमुळं आधीच तुला इथं शत्रू पुष्कळ आहेत. मीच आजवर तुला संरक्षण दिलंय. तुला कटवायला इथं लोक टपले आहेत. पहा बुवा. तू हे नाकारलंस तर तुला इथून बडतर्फ करावं असंही कालच्या रात्रीच्या सभेत ठरलं आहे.'

'बडतर्फ ? म्हणजे भलतंच की !' स्वतःला सावरीत चार्लस म्हणाला, 'मी काही बोलू का ?'

'अर्थात, तू हा कॅन्सरान-प्रकल्प अंगावर घेणार हेच ना ?'

डॉ. मॉरिसनच्या उद्गाराकडं दुर्लक्ष करीत चार्लस म्हणाला, 'खाली माझं काम फार चांगलं आणि वेगात चाललं आहे. मला वाटतं कर्करोगाच्या खऱ्या स्वरूपाचा आणि त्यावरील नेमक्या उपाय-योजनेच्या मी अगदी नजीक आलोय असं वाटतंय. इतके दिवस मी कुणाला सांगितलं नाही.'

जन्मशताब्दि निमित्त प्रसिद्ध होत आहे!

स्वातंत्र्यवीर सावरकर

पद्मभूषण धनंजय कीर लिखित
चरित्राची दुसरी आवृत्ती

किंमत-१००.०० पृष्ठसंख्या-६३६
चित्रसंख्या-१७

प्रकाशनपूर्व सवलतीची किंमत ७०.००

जिज्ञासू व अभ्यासू वाचकांनी हे पुस्तक मुळात वाचले तर पाहिजेच, परंतु एखाद्या पवित्र ज्ञानग्रंथाप्रमाणे संग्रही बाळगले पाहिजे.

ही सवलत ३१ मे १९८३ पर्यंतच आहे.

पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई-४०० ०३४

बॉम्बे बुक डेपो, २१७ राजा राममोहन रॉय मार्ग, मुंबई-४०० ००४

पॉप्युलर बुक डेपो, डॉ. भडकमकर मार्ग, मुंबई-४०० ००७

दोघेही क्षण एकमेकांकडे पाहात राहिले.डॉ. मॉरिसनला चार्लसची माहिती होती. त्याच्या पत्नीचा आजार, मृत्यू, एकूण त्याचा एकलकोंडेपणा; पण 'नजीक' म्हणजे चार्लसला दहा वर्षं सुद्धा लागतील असं त्याला वाटलं.'

'कर्करोगावर उपाय? फार छान; पण तरीही ... कॅन्सरान प्रकल्प संपल्यावरच. लेस्ली फार्मास्युटिकल कंपनीला आम्ही पेटंट दिलंय आणि उत्पादनात खंड पडू नये अशी त्यांची इच्छा आहे. ठीक. आता मला काम आहे. कॅन्सरानची लॅबबुकं तुला मिळतील. त्यातूनही काही आणखी अडचणी आल्या तर कळव. अच्छा!'

अशा मोक्याच्या क्षणी आता बडतर्फीचा बडगा दाखवून आपल्या मनाविरुद्ध काम करावं लागणार यामुळं चार्लस मोडून गेला. बाहेर पडला तेव्हा सर्वजण आपल्याकडे विचित्र नजरेनं पाहाताहेत हे जाणवल्यामुळं तो जवळजवळ धावतच जिना उतरून प्रयोगशाळेकडे आला. आपल्याला काम कोठेही मिळेल अशी खात्री असली तरी हाता-तोंडाशी आलेला घास सोडायचा जिवावर आलं होतं. तशा आर्थिक अडचणीही कमी नव्हत्याच. चकची फी, बाप रे!

---

## तीन

---

आता त्यांचाच नंबर. कॅथरिनच्या मदतीनं मिचेलीनं डॉ. विलींच्या आतल्या खोलीत प्रवेश केला. कॅथरिननं डॉ. जॉर्डन विलींना पूर्वी पाहिलं नव्हतं; पण मुलं सर्व त्यांना ओळखत होती. चार वर्षांपूर्वी मिचेली पण आली होती, देवी झाल्या होत्या तेव्हा.

डॉ. विली पन्नाशीला आलेले, उंच शरीरयष्टीचे होते. चेहऱ्यावर नेहमी आश्वासनक असा वात्सल्यभाव असे. मुलांना नेहमी त्यांचा विश्वास वाटे.

'अले, अले,' डॉक्टर म्हणाले, 'कुमारी मार्टल, तुम्ही आता मोठ्या बाईच झालात की. वा:! तू आता सुंदरच दिसतेस बरं का? बरं आता आम्हाला तुमच्या नव्या आईची ओळख करून देणार ना?'

'ती नवी नाही. आता दोन वर्षं झाली की माझ्या आईला!'

डॉक्टर आणि कॅथरिन दोघंही हसली. 'बरं, बरं. बसा तर खऱ्या.' खरं म्हणजे डॉक्टरांच्या कसलेल्या नजरेनं मिचेली आत शिरता शिरताच तिच्या तपासणीला सुरुवात केली होती. क्षणातच त्यांना काही तरी जाणवलं. 'बरं तर, काय गडबड आहे?'

कॅथरिननं मिचेलीला झालेला फ्ल्यू आणि इतके दिवसांचा ताप सकाळची हकीकत, सर्व काही सांगितलं आणि फार उशीर करणं बरं नाही, लवकर डॉक्टरांकडे जाणं योग्य म्हणून आपण आल्याचं तिनं सांगितलं.

'छान!' डॉक्टर विली, 'बरं, पण मला मिचेलीशी एकट्यानं बोलायचंय, तुमची हरकत नसेल तर,' असं म्हणून त्यांनी बाहेरच्या खोलीचं दार उघडून धरलं सुद्धा.

खरं तर तिला मिचेलीजवळच राह्यचं होतं; पण तिचा नाइलाज झाला. तिच्या मनातलं ओळखून डॉक्टर म्हणाले, 'काळजी करू नका. आम्ही जुने दोस्त आहोत! काय मिचेली?' मिचेलीनं मान डोलवली.

जाता जाता कॅथरिननं विचारलं, 'किती वेळ लागेल? मला इथं एका पेशंटला बघायचंय. जाऊन येता येईल ना?'

'हो हो. अर्धा तास लागेल मला!'

'आलेच मी तेवढ्यात!'

नर्सला विचारून कॅथरिन लिफ्टकडे निघाली. समोरून तिला चाकाच्या खुर्चीत बसलेली एक छोटी मुलगी दिसली. तिच्या पोटात गलबललं. लिफ्टच्या बटणांकडे पाहाण्याचा प्रयत्न तिनं केला; पण वारंवार तिचं लक्ष त्या मुलीकडे जात राहिलं. 'आजारी मुलांकडे बघवत नाही अगदी!' तिचे पाय लटपटू लागले. 'मिचेलीचं असं नाही ना व्हायचं?'

मार्शल मेमोरियल इन्टेन्सिव्ह केअर युनिटकडे ती निघाली. जात असता हॉस्पिटलच्या वातावरणामुळं तिलाच कसं तरी होऊ लागलं. बाटल्यांचे आवाज, हृदयाचे ठोके दाखवणाऱ्या मॉनिटरचा बीप बीप आवाज, कृत्रिम श्वसनयंत्राचा फुसफुस आवाज, आजारी मुलांना लावलेल्या सगळ्या नळ्या. ही उपकरणं म्हणजे मुलांचे शत्रूच आहेत असं तिला वाटलं. खरं तर त्यांना उपाय करण्याची ही सर्व साधनं आहेत हेच ती विसरूनच गेली होती जणु.

वाटेत तिला एका इमारतीमधून दुसऱ्या इमारतीकडे जाण्याचा पूल लागला. खरं तर तो एक मोठा हॉलच होता. कुणी तरी एक तंत्रज्ञ तिथं काम करीत होता तो तिच्याकडे बघून सहज हसला तिनंही प्रतिसाद दिला; पण त्यामुळं थोडा धीरही आला तिला.

मार्शल युनिट तिला निराळं वाटलं. प्रत्येकाची खोली स्वतंत्र असल्यानं पेशंट दिसतच नव्हते. सगळं स्वरूप कसं एखाद्या विमानतळाप्रमाणं भासलं. तेवढ्यात एका कर्मचाऱ्यानं विचारलं, 'काय हवंय आपल्याला?'

'शोनहौजर नावाचा मुलगा आहे ना इथं?'

'५२१.' त्यानं बोट दाखवलं, 'सरळ आत जा!' कॅथरिननं दारावर टकटक केलेलं ऐकून तो म्हणाला, 'गाउन आणि तोंडावर मास्क घालायला विसरू नका!'

तिनं दरवाजा उघडून प्रवेश केला. पलीकडे आणखी एक खोली होती. तिचं दार उघडून तोंडाला मास्क गुंडाळलेली नर्स बाहेर आली. मास्क सोडून डब्यात टाकता टाकता तिनं म्हटलं, 'हाय! टॅडला पाहायला आलात वाटतं?'

'श्रीमती शोनहौजर आहेत ना आत?'

'तर! बिचारी! हो, पण मास्क आणि गाउन घाला हं! नियम फार कडक आहेत इथले!' ती पळाली.

कॅथरिननं समोरच्या फडताळातला गाउन आणि मास्क काढून घातला. तिला मोठं चमत्कारिक वाटलं. रबरी हातमोजे तर हातात शिरेचनात! तसंच तिनं आतल्या खोलीचं दार ढकललं.

प्रथम तिला टॅड दिसेना. सगळ्या बाजूनं प्लॅस्टिकचं आवरण होतं. जरा वेळानं तिला त्याची आकृती दिसू लागली. तो फिक्कट निळा दिसत होता. डोक्याला टक्कल. ऑक्सिजनचा फुसफुस आवाज येत होता. मार्गी पलीकडे बसली होती.

' मार्गी, ' हलक्या आवाजात कॅथरिन म्हणाली.

तोंडावर फडकं बांधलेली बाई म्हणाली, ' कोण ?'

' मी कॅथरिन. '

' कॅथरिन ?'

' कॅथरिन मार्टल. ' आता तिच्या डोक्यात प्रकाश पडला हाता–तलं पुस्तक ठेवून ती पटकन उठली. कॅथरिनचा हात धरून ती बाहेरच्या खोलीत आली. बाहेर येण्यापूर्वी कॅथरिननं मागं वळून पोराकडे पाहिलं. त्याचे डोळे उघडे होते; पण त्यानं काहीच हालचाल केली नाही.

' किती बरं वाटलं, तू आलीस म्हणून !'

' कसा आहे आता तो ?' मास्क, गाउन, मोजे ! एकूण वातावरण काही प्रसन्न नक्कीच नव्हतं.

' फार वाईट आहे ग त्याची अवस्था !' मास्क काढीत मार्गी म्हणाली. तिचा चेहरा ओढलेला दिसत होता आणि डोळेही सुजले होते. ' अस्थि-मज्जा–रोपण केलं. लिसाचं. दोन वेळा; पण अजून यश नाही !'

' सकाळी मी नॅन्सीला फोन केला. टॅडचं इतकं झालं असेल असं वाटलं नव्हतं. ' मार्गीचं अवसान केव्हाही गळून पडेल हे कॅथरिनला जाणवत होतं.

' मी अप्लास्टिक अनेमिया हे नावदेखील ऐकलं नव्हतं !' हसण्याचा प्रयत्न करीत मार्गी म्हणाली; पण उलट तिचे डोळेच भरून आले. कॅथरिनचेही डोळे पाणावले. दोघी काही वेळ हातात हात घालून उभ्या राहिल्या. ' तू आलीस ना, फार बरं वाटलं ग खरंच ! असल्या आजारात कुणी भेटायलाही येत नाही !'

' पण मला कल्पनाच नव्हती ग !' अपराधी स्वरात कॅथरिन म्हणाली.

' अग, तुला उद्देशून नाही म्हटलं. सर्वसाधारण रीत सांगितली. कदाचित काय बोलायचं तेही कळत नसेल लोकांना आणि आपल्याला तर ह्याच वेळी मदतीची जास्त गरज असते नाही का ?'

' तरी पण मी यायला हवं होतं !' काय बोलावं हे सुचेना तिला. मार्गी तिच्यापेक्षा मोठी होती आणि ती लग्न होऊन शाफ्ट्सबरीमध्ये प्रथम आली तेव्हापासून तिचा तिला चांगलाच आधार मिळाला होता. दोघींचं चांगलंच सख्य होतं.

' तुझ्याबद्दल मला खात्री आहे !' मार्गी म्हणाली, ' पण मला काही सुचत नाहीसं झालंय. सकाळपासून डॉक्टरांनीसुद्धा आशा सोडल्यासारखीच आहे. माझ्या मनाची तयारी करताहेत !' हुंदका दाबण्याचा प्रयास करीत ती म्हणाली. हुंदका केव्हाही फुटेल अशी स्थिती झाली होती; पण मला टॅड हवा आहे ग !'

' आशा सोडली ? म्हणजे टॅडची अखेर ? वृद्धांबद्दल असं म्हणतात; पण इतक्या कोवळ्या वयात ?' तिला खालच्या मजल्यावर पळत जावंसं वाटलं. तिनं मार्गीला जवळ घेतलं.

' का ? का म्हणून हे असं व्हावं !' मार्गीला हुंदके आवरेनात. ' देवाची इच्छा म्हणतात; पण देवाची इच्छा तरी अशीच का ? किती गुणी पोर ग ! का हा दुष्टावा ? मी कोणता गुन्हा केलाय ?'

धीर करून कॅथरिन काही तरी बोलत राहिली. काय बोलत होती ते तिचं तिलाही समजत नव्हतं. तशी ती सनातनी कुटुंबातली


" चारित्र्याच्या निर्माणाविण समाजजीवन व्यर्थ असे
कर्तव्याची जाणिव नसता प्रगतीलाही अर्थ नसे."

आर्थिक प्रगतीच्या अनेक ठेव-योजना दाखविणारी सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य बँक

**जनता सहकारी बँक लि. पुणे**

मुख्य कचेरी : १४४४ शुक्रवार पेठ. थोरले बाजीराव रोड ४११ ००२

दूरध्वनी : ४४३२५८

**७ जिल्ह्यांतील ३१ शाखा व २ एक्स्टेंशन कौंटरसह सदैव आपल्या सेवेसी**

**भा. रा. किराड**
कार्याध्यक्ष

**का. श्री. काकतकर**
कार्यकारी संचालक

असली तरी कॉलेज-आयुष्यात चर्चच्या कर्मकांडाच्या विरोधी आणि निरीश्वरवादी बनली होती; पण आता मार्गीशी बोलताना ईश्वर, त्याची इच्छा, त्याचे मार्ग असलं काही तरी बडबडत राहिली. काही असो. मार्गी शांत झाली.


'मी आता जाऊ? खाली मिचेलीला सोडून आलये. रात्री मी पुन्हा येईन. शप्पथ!' बाहेर पडल्यावर कॅथरिननं खोल श्वास घेतला आणि मिचेलीबद्दलच्या भीतीनं तिला पुन्हा ग्रासलं.

¤

'आपल्याला दुसरा पर्यायच नाही असं वाटतंय,' कपात कॉफी ओतत एलन चार्लसला म्हणाली, 'हे आपलं काम असं मध्येच सोडून द्यायचं म्हणजे कमीपणा आहेच; पण डॉ. मॉरिसनला आपण वेळोवेळी प्रगतीचा अहवाल द्यायला हवा होता असं वाटू लागलंय.'

'छे:!' तोंडावर हात आणि टेबलावर कोपरं ठेवून चार्लस म्हणाला, 'मग तर त्यानं घडोघडी आपल्याला पेपर प्रसिद्ध करायला लावले असते आणि आपलं काम रेंगाळलं असतं.'

'पण तेवढ्यानं आत्ताची परिस्थिती टाळता आली असती!' तिनं चार्लसच्या हातावर हात ठेवीत म्हटलं. त्याला हे सगळं किती अवघड होत असेल हे तिच्याइतकं कुणालाच कळणं शक्य नव्हतं. प्रशासकीय लुडबुड तर त्याला मुळीच खपत नसे. 'तेही खरं आहे. ते लोक मग रोजच येत राहिले असते. ठीक आहे. आपलं काम आता थोडं मागं पडेल इतकंच!'




चार्लसनं मान वर करून पाहिलं. पूर्वी एकदा त्यांचा संबंध आला होता तेव्हापासून तिनं पुन्हा त्याला स्पर्श केला नव्हता आणि सकाळची झटापट? तिचं वागणं त्याला परस्पर विरोधी वाटलं. 'कॅन्सरान म्हणजे शुद्ध मूर्खपणा! सहा महिने किंवा वर्षसुद्धा लागेल. तेही सगळं सुरळीत होत गेलं तर!'

'आपलं काम आणि कॅन्सरान दोन्ही करू. रात्रीसुद्धा काम करायची तयारी आहे माझी.'

चार्लस चमकून उभा राहिला जुने प्रसंग आठवले. 'कॅथरिनपेक्षा एलन सुंदर होती. खरंच; पण एकूण पत्नी म्हणून कॅथरिनच बरी होती. सहकारी म्हणून एलन ठीक.'

'त्यापेक्षा मला असं वाटतं की, थेट संचालकांनाच भेटावं आपली सर्व माहिती त्यांना सांगावी आणि आपलं काम चालू ठेवणं किती जरुरीचं आहे हे त्यांच्या नजरेस आणावं.'

'मला नाही वाटत त्याचा काही उपयोग होईलसं हा निर्णय संचालक मंडळाचा आहे हे तुला डॉ. मॉरिसननं सांगितलंय. तेव्हा अशानं तू फक्त आणखी संकट तेवढी ओढवून घेशील. डॉ. इबॅनेज आपला निर्णय बदलणं शक्य नाही.'

'आणि मला वाटतं आपण धोका पत्करावा. ती लॅब बुकं इकडे कर. आपण काय करतो आहोत हे दाखवतो त्यांना!'

एलननं स्टूल सरकावलं आणि ती धावत दारापाशी गेली.

'एलन?' आश्चर्यानं चार्लस म्हणाला.

पण ती थांबली नाही, 'आजवर तू कधी कुणाचं ऐकलं आहेस?' एवढं बोलून दार बंद करून ती निघून गेली.

आधी त्याला वाटलं की तिच्या मागं जावं; पण त्यानं मन आवरलं. खरं म्हणजे त्याला आताच तिची मदत हवी होती. 'ठीक आहे. त्यानं लॅबबुकांतलं मुख्य पुस्तक आणि चालू नोंदींची पुस्तकं काढली. कसं बोलायचं ह्याची मनोमन उजळणी करत तो निघाला.

सर्व कर्मचाऱ्यांच्या नजरा त्याच्यावर रोखल्या होत्या. कॅन्सरानचं काम त्याच्याकडे मनाविरुद्ध सोपवलं जातंय, हे सर्वांना कळलं होतं. चार्लसनं सर्वांकडे दुर्लक्ष केले आणि डॉ. कार्लोस इबॅनेजची सचिव कु. वेनोरिका इवान्सकडे तो वळला. तिची खोली इतरांपासून स्वतंत्र होती आपण कुणी तरी विशेष आहोत याची जाणीव तिच्या एकूण आविर्भावावरून सहज होत असे. शिवाय ती डॉ. इबॅनेजच्या पूर्वीपासूनच इथं काम करीत होती!

'मला संचालकांना भेटायचंय.' आवाज स्थिर ठेवीत चार्लस म्हणाला.

'भेट ठरली आहे का?'

'मी इथं आलो इतकं सांगितलंस तरी पुरे.'

'पण मला वाटतं ...'

'तू जर मी आल्याचं सांगितलं नाहीस तरी मी सरळ आत घुसेन!'

चमत्कारिक चेहरा करीत कु. इवान्स आत गेली. परत आल्यावर मुकाटयानं दार उघडून उभी राहिली.

इबॅनेजची खोली प्रशस्त होती. पुराणकालीन अवाढव्य अशा टेबलाच्या पलीकडे तो बसला होता. त्याच्या समोरच डॉ. टॉमस

ब्रिग्टन बसला होता.

आधीच्या संवादातील विनोदाला हसत आणि तोंडातून धूर सोडत त्यानं चार्लस हातातल्या चिरूटानंच बसण्याची खूण केली. डॉ. इबॅनेज हा शरीरानं किरकोळ गृहस्थ होता. वयाची साठी उलटल्याचं त्याच्या रुपेरी केसावरनं सहज जाणवत होतं. हनुवटीवर तशीच रूपेरी चोचदार दाढी. आवाज मात्र चांगलाच दमदार होता.

डॉ. ब्रिग्टनच्या उपस्थितीमुळं चार्लस काहीसा अस्वस्थ झाला, व्यावसायिक आणि वैयक्तिक दोन्ही कारणास्तव त्याला ब्रिग्टनचा राग होता; पण तूर्त त्याच्यावर ओढवलेल्या प्रसंगामुळं त्याची कीव नि काळजीही वाटत होती.

बसता बसता त्यानं ब्रिग्टनकडे चटकन पण उघडउघड तिरस्कारयुक्त नजर फिरवली. तसा ब्रिग्टन तीसच वर्षांचा होता !

'अरे, चार्लस,' अवघडल्या सुरात इबॅनेज म्हणाला, 'आताच मी टॉमसला निरोप देत होतो. उत्साहाच्या भरात वेडगळपणानं कॅन्सरानलाच धोका निर्माण केला बेट्यानं !'

'वेडगळपणा ?' संतापानं चार्लस म्हणाला, 'गुन्हेगारी म्हणणं अधिक बरोबर ठरेल.' टॉमसचा चेहरा लाल झाला !

'हे पहा चार्लस, त्याचे हेतू चांगले होते. संस्थेला अडचणीत आणायची इच्छा नव्हती त्याची. ज्यानं ही माहिती वृत्तपत्रांना दिली तो खरा गुन्हेगार ! त्याला शोधून काढून चांगली अद्दल घडेल असं शासन करणारच आहोत आम्ही.'

'आणि डॉ. ब्रिग्टन ?' जणू काही तो खोलीतच नाही अशा रीतीनं चार्लसनं विचारलं, 'त्याच्या कृत्यांवर पांघरूण घालणार काय ?'

'अर्थातच नाही; पण त्याची झालेली जाहीर अप्रतिष्ठा ही त्याला पुरेशी शिक्षा आहे. आणि शिवाय त्याच्या कामाकरता वाइनबर्गर आता त्याला पैसा पुरवू शकणार नाहीच. आताच मी त्याला फ्लॉरिडा मधल्या वैद्यकीय मंडळातल्या जागेबद्दल सुचवत होतो.'

एक विचित्रशी शांतता पसरली !

'ठीक तर मग,' इबॅनेज उभा राहिला आणि वळून पुढे येत म्हणाला. डॉ. ब्रिग्टनही उभा राहिला. चार्लसकडे दुर्लक्ष करून ब्रिग्टनच्या खांद्याला धरून इबॅनेज दाराकडे गेला !

'तुमच्या मदतीबद्दल आभारी आहे मी,' ब्रिग्टन म्हणाला,

'तुम्हाला तडकाफडकी संस्था सोडावी लागतेय याचं कारण तू समजू शकशील.'

'अर्थात, पण वृत्तपत्रांच्या तडाक्यात एकदा सापडलं की तुमचं पुरतं शोषण केल्याशिवाय सोडणार नाहीत. ठीक आहे. एक प्रकारे मलाही बरंच झालं !'

'इबॅनेज परत येऊन बसला. त्याच्या मुद्रेवर एकाएकी त्रासिक भाव उमटले. 'खरं म्हणजे दोन माणसांना जबाबदार धरायला हवं. ज्यानं ही माहिती बाहेर फोडली तो सेवक आणि बातमीदार ही वृत्तपत्रं तरी अतिच करतात. बातमी अगदी न्यूयॉर्क टाइम्सच्या पहिल्या पानावर ! भयंकर !!'

'मला वाटतं तुम्ही चुकीच्या लोकांना दोषी ठरवताहात. हा केवळ सोई-गैरसोयीचा प्रश्न नाही. हा नैतिक प्रश्न आहे !'

'डॉ. ब्रिग्टननं असं करायला नको होतं हे खरं; पण मला नैतिक प्रश्न तूर्त तितकासा महत्त्वाचा वाटत नाही. संस्थेला आणि कॅन्सरानला जो धोका आहे त्यामुळे अळीचा साप होईल, तो लक्षपूर्वक पाहायला पाहिजे !'

'व्यावसायिक सचोटी म्हणजे किरकोळ बाब नव्हे.'

'तू मला व्याख्यान देतोयस का ? मी काय सांगतो ते ऐक ! ब्रिग्टनचा कुठलाही गैरउद्देश नव्हता. कॅन्सरानवर त्याचा विश्वास होता आणि जनतेला हे औषध लवकर मिळावं ही त्याची धडपड होती. त्याची घाई झाली हे खरं; पण तसं पाहिलं तर आम्ही सगळेच जबाबदार आहोत. यामुळं देणग्या मिळवायचं कसब असणाऱ्या एका बुद्धिमान सहकाऱ्याला आम्ही मुकलो हे मात्र वाईट झालं.'

'इतके परस्पर भिन्न दृष्टिकोन एखाद्या विषयावर आणि तेही चूक की बरोबर इथपासूनच !' चार्लस विचार करू लागला. कु. इवान्सनं त्याच्या विचारमालिकेत व्यत्यय आणला. 'श्री. बेलमन आल्याबरोबर कळवायला सांगितलं होतं ना आपण ? तर ते आलेत,' ती म्हणाली.


'ताबडतोब आत पाठव !'

कुलंगी कुत्र्याप्रमाणे श्री. बेलमन आत आला. जनतासंपर्कअधिकारी (पी आर ओ) म्हणून तो काम पहात असे. 'मला सकाळपर्यंत हे टाईम्सचं माहिती नव्हतं हो.' त्यानं आल्या आल्या गयावया करायला सुरुवात केली. 'पण आमच्या कचेरीतून ही बातमी फुटलेली नाही हे मी नक्की सांगतो सर.'

'खरं म्हणजे संस्थेत सर्वत्र कुजबुज चालूच आहे असं माझी मदतनीस म्हणत होती.' बेलमनच्या मदतीला चार्लस आला. 'मला वाटतं बहुधा काहीही माहीत नसणारा असा मी एकटाच असणार !'


# Water Cooler for only RS. 3289

USHA



Cold Water now at reasonable price

* Office
* Nursing Home
* Departmental Store
* Laboratory

Call :–

FRIDGE CARE
8/4, Banali Apartments,
Nal Stop, Karve Road,
Pune - 411 004.
Phone : 54636

EXECUTIVE DT-25

'हे पहा, बातमी कशी फुटली तेवढंच मला हवं आहे.' इबॅनेजनं त्याला 'बस' सुद्धा म्हटलं नाही !

'अगदी बरोबर.' आता कुठं बेलमनच्या आवाजात जोर आला. 'मला माहितीय कोण ते.'

'असं ?' इबॅनेजच्या भुवया वर चढल्या.

'प्राणीसंग्रहालयाचा माणूस. त्यानंच ब्रिग्टनबद्दल तुम्हाला पहिल्यांदा सांगितलं. त्याला बोनस मिळाला नाही ना ?'

'अरे देवा ! स्वत:च नेमलेलं काम करण्यासाठी ज्याला त्याला बक्षीस हवंय ! बरं, पण नीट लक्ष ठेव आता आणि हे पहा, वार्ताहर-परिषदही बोलाव. आपल्या काही चुका झाल्या आहेत असं सांग. प्रयोगात काही अपरिहार्य अडचणी निर्माण झाल्या आहेत असंही सांग; पण काही भानगड आहे असं चुकूनही बोलू नकोस ! डॉ. ब्रिग्टन हे दीर्घ मुदतीच्या रजेवर गेलेत असं सांग; कॅन्सरानच्या पुरवठ्या-बद्दल सारख्या मागण्या येत असल्यामुळं त्याला फारच मनःस्ताप झालाय असं सांग आणि डॉ. ब्रिग्टनचं काही चुकलं असलं तरी वाइनबर्गरचा कॅन्सरानवर पूर्ण विश्वास आहे असं म्हण. आणि त्याकरता आम्ही ह्या प्रकल्पावर नामांकित अशा डॉ. चार्लस मार्टेल यांची योजना केली आहे असंही जाहीर कर !'

'डॉ. इबॅनेज,' चार्लस म्हणाला, 'मी...'

'एक मिनिट.' त्याचं वाक्य तोडत इबॅनेज म्हणाला, 'ह्या जूलसला कटवतो आधी. मग तुझ्या आता सर्व लक्षात आलं ना जूल्स? जा आता !'

'डॉ. इबॅनेज, खरंच मी तुम्हाला काही तरी सांगायचं म्हणतोय.'

'आणि हे पहा जूल्स. चार्लस म्हणजे लुई पाश्चरचाच अवतार आहे असं सर्वांना वाटलं पाहिजे. समजलं ?'

'अगदी. बरं, डॉ. मार्टेल, तुम्ही आतापर्यंत काय काय पेपर्स लिहिलेत ?' बेलमननं विचारलं.

'भंकस !' इबॅनेजच्या टेबलावर लॅबबुक आपटीत चार्लस ओरडला, 'हे सगळं बोलणं भंकस आहे. मी एवढ्यात काहीही लिहिलेलं नाही. मला वेळच नव्हता. जे काय मी केलंय ते ह्या पुस्तकात आहे. मी दाखवतोच तुम्हाला.'

चार्लस पुस्तक उघडणार तेवढ्यात त्याचा हात धरून इबॅनेज म्हणाला, 'हे पहा चार्लस, इथं तुझी कुणी उलटतपासणी घेत नाहीये. तू काहीही प्रसिद्ध केलं नाहीस तेच बरं आहे. प्रतिकार-वादावरच्या संशोधनाकरता पैसेही नाहीत आणि कोणाला इच्छाही नाही. तेव्हा तुझा दृष्टिकोन लोकांना समजून तू कॅन्सरान प्रकल्पाला अपात्र आहेस असा समज होणंही बरं नाही.'

दात-ओठ खात चार्लस म्हणाला, 'असं काय करता ? वैद्यकीय क्षेत्रातले सर्व लोक कॅन्सरचा विचार चुकीच्या दिशेनं करताहेत. कॅन्सरान किंवा तत्सम रासायनिक औषधांचा उपयोग केवळ वेदना-नाशक म्हणून होतो. पेशींमध्येच प्रतिकारशक्ती निर्माण होईल असा मार्ग शोधणं हे खरं उत्तर आहे.'

'ते सर्व ठीक आहे चार्लस; पण सगळ्यांनाच तुझं पटेल असं नाही आणि केमोथेरपीवरील संशोधनाकरता जितका पैसा उपलब्ध आहे. तितका प्रतिकारशक्ती निर्माण करणाऱ्या औषधांवरील संशोधनाकरता नाही, ही वस्तुस्थिती आहे...'

'त्याचं कारण कॅन्सरानसारख्या रासायनिक औषधांचं पेटंट घेता येतं तसं प्रतिकारशक्ती निर्माण करणाऱ्या औषधांच्या बाबतीत शक्य होत नाही.' डॉ. इबॅनेजचं वाक्य तोडत चार्लस म्हणाला.

'अन्नदात्यावर उलटू नये डॉ. चार्लस, ह्याच संस्था तुला पैसा पुरवताहेत माहितीय ना ?'

'त्याबद्दल मी आभारी आहे त्यांचा मी काही बंडखोर किंवा क्रांतिवादी नव्हे; पण माझं म्हणणं, मला काम करू द्या इतकंच. तेच सांगण्याकरता मी इथं आलो होतो खरं म्हणजे. कॅन्सरान प्रकल्प अंगावर घ्यायला मी पात्र आहे असं मला प्रांजलपणे वाटत नाही.'

'चक्रम कुठला ! संचालक मंडळाला तुझ्यासारखं वाटत नाही.'

'माझ्या कुवतीबद्दल मी म्हणत नसून मला त्यात अर्थ वाटत नाही. 'कॅन्सरान आणि एकूणच सगळ्यात.'

'डॉ. मार्टेल आपल्या संस्थेवर कोणतं संकट आलंय याची काही कल्पना आहे का तुला ? कॅन्सरानकरता मिळणारं अनुदान बंद झालं तर संस्था खड्ड्यात जाईल. तुझ्याप्रमाणंच अनेक लोक इथं जगताहेत. तू ते काम स्वीकारलंस तर संकटं ह्या ह्या म्हणता नाहीशी होतील.'

'पण मी आता अगदी मोक्याच्या ठिकाणी येऊन पोचलोय. मी आतापर्यंत काही प्रसिद्ध केलं नाही, ते चुकलंही असेल; पण मला अगदी जवळजवळ यश मिळालंय. हे इथं आहे सगळं.' पुस्तकावर ठोकत चार्लस म्हणाला, 'एक कर्कयुक्त पेशी आणि एक निरोगी पेशी यांच्यातला रासयनिक फरक मी दाखवू शकतो.'

'कोणत्या प्राण्यांत ?'

'उंदीर, माकडे.'

'मनुष्यप्राण्यांविषयी काय ?'

'मी अजून ते पाहलं नाही; पण तेही जमेल असं वाटतंय. आतापर्यंत सर्व प्रकारच्या प्राण्यांत ते यशस्वी झालंय.'

'आणि दोन प्रकारच्या ह्या पेशींतला हा फरक त्या जीवाच्या शरिराला कळू शकतो असं वाटतं का ? म्हणजे कर्कग्रस्त पेशी पर-कीय आहे हे ओळखता येतं का त्याच्या शरिराला ?'

'असं वाटतं मी पाहिलेल्या सर्व प्रकारांत हा फरक त्या जीवाच्या शरिराला कळेल इतक्या मोठ्या प्रमाणात होता; पण दुर्दैवानं कर्क-ग्रस्त प्राण्यात मी अजून हा फरक जीवाला ओळखता येत असल्याचं पाहिलेलं नाही. कुठे तरी अडचण निर्माण होते. हा जो अज्ञात घटक आहे तो वेगळा करण्याचा आणि त्याच्याच विरुद्ध अँटिबॉडी तयार करण्याची धडपड चालली आहे माझी. एकदा हे जमलं की, हैब्रिडोमा तंत्रानं मी ह्या अज्ञात घटकाविरुद्धच अँडिबॉडीज तयार करीन. आणि तो घटक एकदा नष्ट झाली की त्या प्राण्याचं शरीर स्वत:च्या ट्यूमर विरुद्ध अँटिबॉडीज तयार करील. प्रतिकारजनक औषधाचं हे तत्त्वज्ञान आहे.'

'हु: !' काय टिपून घ्यायचं हेच न समजल्यामुळं बेलमन म्हणाला.

'यातली सर्वात जाणावणारी बाब म्हणजे शास्त्रीयदृष्टचा ती तर्कशुद्ध आहे,' चार्लस उत्साहानं बोलतच होता, 'आजच्या कर्क-रोगामुळं पूर्वीच्या पेशीजीवनाचा इतिहास कळू शकतो. परिणामी जीव नवीन पेशीसंयुगे स्वीकारण्याच्या अवस्थेत येऊ शकतात.'

'वैताग,' आपली वही फाडकन बंद करत बेलमन म्हणाला.

'तू जे काही प्रतिपादन करतो आहेस ना डॉ. मार्टल,' डॉ. इबॅनेज म्हणाला, 'ते प्रत्यक्षात यायला खूप काळ लागेल.'

'बरोबर आहे; पण आता माझ्या कामाचा वेग वाढलाय.'

'पण आमचं काम बाजूला ठेवण्याइतकं तुझं काम महत्त्वाचं आहे असं दाखवणारा तुझ्या स्वत:च्या मतापलीकडे आणखी एखादासुद्धा पुरावा तू देत नाहीस?'

'पण अगदी स्पष्ट दिसतंय मला. आणि समजा ते यशस्वी झालं नाही तर दुर्दैव ठरेल; पण गुन्हा तर होणार नाही.'

'पण 'स्पष्ट दिसतंय' हेही तुझंच मत. अर्थात वाइनबुर्ग कडून तुला पूर्वीप्रमाणंच पैसा उपलब्ध होईल असं मी जरूर पाहीन. पण तूर्त तुझं काम बाजूला ठेवून कॅन्सरान प्रकल्प ताबडतोब अंगावर घेतला पाहिजेस. आणि तुला पटतच नसेल तर तू आपलं संशोधन आता इतरत्र कर. बस्स. आता चर्चा बंद!'

चार्लस हताश होऊन काही वेळ स्वस्थ बसला. काढून टाकण्याची भाषा मॉरिसननं बोलण्यापेक्षा इबॅनेजनं बोलणं अधिक गंभीर होतं. त्याचं काम आणि तो इतके एकजीव होते की, काम सोडणं अशक्य होतं. पुस्तक गोळा करून तो उठला.

'तू सर्व सेवकांत काही मोठा प्रिय नाहीस. तेव्हा डॉ. मार्टल एकदाच सांग, तू आमच्याबरोबर आहेस की नाहीस?'

चार्लसनं वर न बघताच मान डोलवली. 'बिनशर्त शरणागती!' एक शब्दही न बोलता तो निघून गेला.

'काय विचित्र माणूस आहे!' बेलमन.

'मलाही तसंच वाटतं, तो म्हणजे माथेफिरू शास्त्रज्ञ आहे. आणि त्यातही तो पहिल्या दर्जाचा संशोधक असल्यामुळं इतर माथेफिरूंपेक्षा जास्तच तापदायक आहे. त्याचं हे भाषण नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या माणसांनी ऐकलं तर काय भीषण अवस्था होईल!'

'पण तो या कामाला योग्य आहे का?'

'त्याच्याइतका कुणीच योग्य माणूस नाही!'

'पण त्यानं दगा दिला तर?'

'तर काय? आपणा सर्वांनाच दुसऱ्या नोकऱ्या पाहायला हव्यात.'

'तो वृत्तपत्राकडं गेला तर?'

'तेवढं एक बरं आहे,' इबॅनेज हसून म्हणाला, 'मुळात प्रसिद्धीचा त्यालाच कोण तिटकारा आहे.'

पाय ओढत ओढत चार्लस प्रयोगशाळेत आला. 'डॉक्टरकी करत होतो त्या वेळी आपल्याला किती स्वातंत्र्य होतं. डॉक्टरकीवर मिळणाऱ्या पैशापेक्षा आपल्याला संशोधन प्रिय म्हणून आपण इकडे वळलो; पण स्वायत्तता हवी ती नाही इथं. आपण अगतिक आहोत हे त्याला फार प्रकर्षानं जाणवलं.

पुन्हा त्यानं प्रयोगशाळेचं दार धाडकन लावलं. हा दुसरा प्रसंग! काचसामानाचाही आवाज झाला. दचकून एलन वळली नि तिच्या हातून पिपेट टेबलाला अडकून फुटली. चिडून ती काही बोलणार होती; पण चार्लसचा चेहरा पाहून ती गप्प राहिली.

हातातली लॅबबुकं त्यानं जोरात टेबलावर भिरकावली. काचसामानावर ती आदळून बरंच नुकसान झालं. घाबरून एलन कोपऱ्यात उभी राहिली. चार्लसनं तेवढ्यात आणखी एक भांडं मोरीत आपटलं. गेल्या सहा वर्षांत चार्लस इतकं संतापल्याचं तिनं कधी पाहिलं नव्हतं.

'मी तुला आधीच सांगितलं होतं, असलं काही तू बोलशील तर याद राख!' खुर्चीत दाणकन बसत चार्लस तिला म्हणाला.

'डॉ इबॅनेजनं ऐकलं नाही का?' सावधपणं एलन म्हणाली.

'ऐकलं; पण मानलं नाही. मीसुद्धा कागदी वाघच ठरलो. शी:!'

'आपल्याला काही पर्याय नाही. बरं ठीक. आता कसं कसं काम करायचं?'

'कॅन्सरानच्या परिणामांचा अभ्यास करायचा.'

'लगेच सुरुवात करायची का?'


'अगदी ताबडतोब!' थकलेल्या आवाजात चार्लस म्हणाला. 'तू कॅन्सरानची लॅबबुकं का घेऊन येत नाहीस? मला आता कुणाशीही बोलण्याची इच्छा नाही!'

'ठीक आहे,' ती मृदुपणं म्हणाली. तिलाही त्याच्यापासून सुटका झाली तर हवीच होती.

एलन गेल्यावर चार्लसनं जराही हालचाल केली नाही. त्याला काहीही सुचत नव्हतं. तेवढ्यात धाडकन दार उघडून मॉरिसन आत घुसला.

चार्लसनं वळून पाहिलं. रागानं मॉरिसनच्या शिरा तटतटल्या होत्या. भयानक संतापलेला दिसत होता.

'बस्स. सहनशीलतेची परिसीमा झाली. तू स्वत:ला कोण समज-

It demands nothing ...
yet pumps all the
water you need ...

LPC Submersible
MONOBLOC Pump

Easy to install. It demands little from you.
* No foundation
* No maintenance
* A unique combination of Submersible pump and Centrifugal pump.
Wet type, 415V motor, bronze impellers.
Ideal pump for domestic, industrial, municipal, agricultural (inclu. sprinkler) water supply

Distributors for Maharashtra
RUSO
RUSO AGRO ENG CORPN
11, Adinath Shopping Centre,
Satara Road,
Pune 411 009 Phone : 448849

तोस ? मला न सांगता–सवरता वर जायचं कारण काय ? साधे शिष्टाचारसुद्धा पाळता येत नाहीत ?'

'मॉरिसन' एक कृपा कर. माझ्या प्रयोगशाळेतून ताबडतोब तोंड काळं कर !'

मॉरिसनच्या रागाला आता धार चढली. 'आताचं हे संकट आलं नसतं ना, तर मी तुला क्षणार्धात वाइनबुर्गरमधून हाकललं असतं. इथं राह्यचं असेल तर कॅन्सरानचं काम नीट कर म्हणजे झालं !' इतकं बोलून क्षणभरही न थांबता तो दार बंद करून निघून गेला.

फ्रीजच्या परिचित घरघरीनं नि रसायनांच्या परिचित वासानं हळूहळू चार्लस शांत झाला. 'बघू या तरी. कदाचित हे कॅन्सरानचं काम लवकर संपेलही. एलनचं म्हणणंही बरोबर असेल. आपल्याला दोन्ही कामं करता येतील. फार तर रात्रीसुद्धा काम करावं लागेल, इतकंच.'

तेवढ्यात फोन वाजला. पलीकडून आवाज आला, 'मी श्रीमती क्रेन बोलत्ये. नॉर्थईस्टर्न युनिव्हर्सिटीच्या कॅशऑफिसमधून.'

'बोला,' त्याला चकच्या फी भरण्याबद्दलची आठवण आली.

'माफ करा त्रास दिल्याबद्दल; पण तुमच्या मुलानंच हा नंबर दिला. त्याची या सत्राची १६५० डॉलर फी राहिलीय. खूपच उशीर झालाय !'

काय करावं हे कळेना. बिलाबद्दल आजवर कधी कुणी तगादा लावल्याचं त्याला आठवत नव्हतं; पण आज मात्र हा प्रसंग आला होता !

'श्री. मार्टेल, तुम्ही ऐकताय ना ?'

'डॉ. मार्टेल,' चार्लसनं दुरुस्ती केली आणि त्याचं त्यालाच चुकल्यासारखं झालं.

'माफ करा, डॉ. मार्टेल. मग फी लवकर भरणार असं समजू ना ?'

'लगेच चेक पाठवतो. नजरचुकीनं राहून गेला त्याबद्दल दिलगीर आहे.'

आता कर्ज काढण्याशिवाय मार्ग नव्हता. त्यानं फोन उचलला. पुन्हा खाली ठेवला. 'बँकेत प्रत्यक्षच जाणं बरं. जरा ताजी हवासुद्धा मिळेल. मॉरिसन आणि इबॅनेज ह्यांच्यापासून थोडा वेळ दूर !'

## चार

टेबलावर पडलेलं एक जुनं मासिक कॅथरिन चाळत होती खरी; पण चिंतेमुळं तिचं त्यात लक्ष नव्हतं. बाकीच्या ठिकाणांपेक्षा डॉ. विलींची जागा कमी भीतीदायक होती इतकंच; पण जसाजसा वेळ जाऊ लागला तसं तसं तिला भयानं जास्त जास्तच घेरायला सुरुवात केली. 'मिचेलीला डॉक्टरांच्या खोलीत जाऊन तासभर झाला. नक्कीच काही तरी बिघडलंय !'

एकदा ह्या पायावर तो पाय. एकदा त्या पायावर हा पाय. अनुत्सारखं घड्याळ पाहणं चाललं होतं तिचं. बोलायलासुद्धा कुणी नव्हतं एकच एक नर्स. तीही आपल्या कामात गर्क होती.

'माफ करा हं,' तिनं धीर करून विचारलं, 'माझी मुलगी मिचेली आत गेलीय. तिला किती वेळ लागेल ते कळेल का ?'

'डॉक्टरांनी आम्हाला काही सांगितलं नाही !'

'तिला आत जाऊन फार वेळ झालाय म्हणून विचारतेय.'

'डॉ. विली संपूर्ण तपासणी करतात. येईल आता इतक्यात. बसा तुम्ही !'

'नेहमी त्यांना एवढा वेळ लागतो का ?'

'तर ! त्यांना जेवढा वेळ हवा असेल तेवढा ते घेतातच. घाई कधीच आवडत नाही त्यांना. त्यातले डॉक्टर नाहीत ते !'

ती मागं येऊन खुर्चीवर बसली. आणि मग प्लॅस्टिकघरात ठेवलेलं टॅडचं दृश्य मनःचक्षूंपुढं येऊ लागलं. लहान मुलांना असले भयंकर आजार होऊ शकतात याचा केवढा तरी धक्का बसला होता. तिला. तसं तिनं दुरून ऐकलं होतं थोडं फार पण टॅड म्हणजे शेजारचाच मुलगा ना !

तिनं पुन्हा मासिक उचललं. जेवणाला काय करायचं याचाही विचार करू लागली. 'पण मिचेलीला इतका कसा काय वेळ लागला?' तेवढ्यात आणखी दोन-तीन बायका आपापल्या पोरांना घेऊन आल्या. मग आणखी एक, एक करत सगळी खोली भरून गेली तान्ह्या मुलाला घेऊन आलेल्या एका बाईला बसायला तिनं जागा करून दिली नि पुन्हा घड्याळ पाह्यलं. 'एक तास वीस मिनिटं झाली की, आता ती थरथर कापू लागली.

पुन्हा ती नर्सच्या टेबलापाशी जाऊन उभी राहिली. जरा वेळानं लक्ष गेलं तेव्हा तिनं नम्रपणं विचारलं, 'काही हवंय का तुम्हाला ?'

कॅथरिन चिडली. (बाई ग, हा तुझा ढोंगी नम्रपणा नकोय मला.) तिला थोडी सहानुभूती हवी होती. 'पण इतका वेळ का लागला ते पाहता येईल का ?' नर्स काही उत्तर देणार तेवढ्यात डॉ. विली डोकावले. 'मार्टेलबाई, तुमच्याशी थोडं बोलायचंय,' असं म्हणून ते आत गेले. मागोमाग धावत कॅथरिनही आत शिरली. मिचेली तिथं नव्हतीच !

भयग्रस्त मनानं ती डॉ. विलींकडे पहात राहिली. थोड्या वेळानं डॉक्टरांनी विचारलं, 'एक विशिष्ट प्रकारची परीक्षा करायची आहे त्याकरता तुमची संमती लागेल.'

'ती ठीक आहे ना ?' स्थिर आवाज ठेवून विचारायचा तिनं प्रयत्न केला.

'अजूनपर्यंत तरी आमच्या हातात आहे हे सर्व काही; पण तरीही ही एक विशिष्ट प्रकारची परीक्षा करायला हवी असं वाटतं. ह्या कागदावर त्यासाठी तुमची सही लागेल !'

कापऱ्या हातानं कागद धरीत तिनं विचारलं, 'पण मिचेली कुठंय ?'

'आहे आत. तुम्हाला भेटायलाही हरकत नाही. पण ही परीक्षा करून झाल्यावर भेटलात तर बरं. हिला अस्थिमज्जा परीक्षा म्हणतात.'

'अस्थिमज्जा ?' कॅथरिनच्या डोक्यात स्फोट झाला. टॅड आणि याचं प्लॅस्टिकचं घरटं आठवलं.

घाबरण्यासारखं काही नाही त्यात, ' तिच्या आवाजावरून त्यांच्या लक्षात आलं. ' रक्तपरीक्षेसारखीच अगदी साधी परीक्षा आहे. '

' मिचेलीला अॅप्लास्टिक अनेमिया झालाय का ?'

' छे: ! छे: !' डॉ. विली एकदम चकित झाले. ' पण, नेमकी चिकित्सा करण्याकरता आम्हाला ही परीक्षा करायचीय. रागवू नका; पण अॅप्लास्टिक अनेमियाचं तुमच्या डोक्यात कसं काय आलं?'

' आमच्या शेजारच्या एका पोराला झालाय. मी आताच त्याला पाहून आले. आपण ज्या वेळी अस्थिमज्जा म्हणालात, त्या वेळी..'

' असं, असं. तसा तो काही नेहमी होणारा रोग नाही. पण परीक्षा सगळ्या केलेल्या बऱ्या !'

' चार्लसला बोलवायचं का ?' डॉक्टरांच्या आश्वासनामुळं तिला धीर आला. हा रोग संसर्गजन्य नसल्याचं चार्लसनंही सांगितलं होतंच.

'चार्लसला बोलवायला काहीच हरकत नाही. रक्त काढण्यासारखंच आहे हे. तेवढी जागा आम्ही बधिर करतो. फारसं दुखतही नाही. काही मिनिटांचं काम !'

कॅथरिननं हसायचा निष्फळ प्रयत्न करीत सही केली. डॉ. विलींबद्दल तिला विश्वास आला. अर्थात चार्लसनं इतक्या बालरोगतज्ञांतून त्यांची निवड केली. तेव्हा ठीकच होतं. सही केल्यावर ती पुन्हा बाहेर आली.

□

टेबलावर मिचेली स्वस्थ पडून होती. तिच्या दृष्टीनं हॉस्पिटल म्हणजे छळगृहच ! आतापर्यंत तीन वेळा टोचून झालं. एकदा तर बोटालाच. प्रत्येक वेळी तिनं विचारलं की हे शेवटचंच ना ? तर कुणी उत्तरच दिलं नाही. त्यामुळं ती जास्तच घाबरली होती. अंगात कमी कपडे असल्यामुळं टेबल खुपत होतं. तसं अंगावर पांढरं कापड घातलं होतं. आपले कपडे घालून घरी पळून जावं असं सारखं तिच्या मनात येत होतं.

तेवढ्यात दार उघडून एक लठ्ठ नर्स आत आली. तिनं हत्यारांचं टेबल ढकलत जवळ आणलं. त्यावर निळ्या रंगाचा टॉवेल होता.

' काय आहे ते ?' मिचेलीनं घाबरून विचारलं.

' अग बेबी, डॉक्टरांना लागतं ते सर्व साहित्य आहे. ' कु. हॅमरस्मिथ म्हणाली.

' दुखेल का हो ? डॉक्टर दुखावतात का नेहमी ?'

' असं का म्हणतेस ? आम्ही तर हे सगळं तुझ्यासाठीच करतोय !'

' डॉक्टर करतात ते सगळंच दुखतं. '

' वा ग वा. असं कसं ?' नर्सनं दाटल्यासारखं केलं.

' ओहो ! ही आमची आवडती पेशंट आहे बरं का ?' दरवाजा खांद्यानं उघडत डॉ. विली आत आले. आपले निथळणारे हात त्यांनी अंगापासून दूर धरले होते. नर्सनं चकचकीत डब्याचं झाकण उघडलं आणि चिमटीनं एक टॉवेल काढला. मिचेलीनं डॉक्टराकडे पाहिलं तर त्यांनी तोंडावर फडकं बांधलं होतं.

' आता काय करणार तुम्ही ?' डोळे जितके ताणता येतील तितके ताणून तिनं पाहिलं.

' एक वाईट आणि एक चांगली बातमी. आता एकदाच टोचायचं आणि ते शेवटचंच बरं का ? काय ?' डॉ. विलींनी टॉवेल खालच्या डब्यात टाकून कु. हॅमरस्मिथनं उघडलेल्या डब्यातून दोन रबरी हातमोजे काढून व्यवस्थितपणे चढवले.

' आता मला टोचायचं नाही !' रडत रडत मिचेली म्हणाली. मला आता घरी जायचंय !'

' असं नाही करू,' तिच्या डोक्यावर थोपटत कु. हॅमरस्मिथ म्हणाली.

तिचा हात चुकवून मिचेलीनं उठायचा प्रयत्न केला; पण नर्सनं पटकन तिला खाली दाबून धरलं.

' मिचेली !' थोड्या करड्या आवाजात डॉ. विली म्हणाले; पण लगेच मृदु आवाजात म्हणाले, ' मला माहितीय दुखलेलं तुला आवडत नाही; पण तू थोडी कळ काढलीस, तर सगळं एक मिनिटात संपेल ! '

' नाही. मला डॅडी पाहिजेत !'

' श्रीमती लेव्हींनासुद्धा बोलवा. बहुधा आणखी मदत लागेल




सर्व स्टेनलेस स्टील भांड्यांची दुकाने, जनरल व डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये उपलब्ध !

आपल्याला, ' डॉक्टर म्हणाले. कु. हॅमरस्मिथ बाहेर गेली.

' मिचेली, आता स्वस्थ पडून रहा पाहू. तुझ्या डॅडींना मी सांगेन की मिचेली जरासुद्धा घाबरली नाही. तेव्हा त्यांना किती अभिमान वाटेल माहिताय ? '

क्षणभर तिला वाटलं की आपण रडलो हे कळलं तर डॅडींना आवडणार नाही. डॉक्टरही सांगताहेत की हे आता शेवटचंच !

दार उघडलं. मिचेलीनं पाहिलं तर कु. हॅमरस्मिथबरोबर आणखी दोन स्त्रिया होत्या. एकीच्या हातात चामडी पट्टे होते.

' पट्ट्यांची गरज नाही. मुळीच ! ' डॉ. विली म्हणाले, ' मिचेली, आता स्वस्थ पडायचं बरं का ! '

कु. हॅमरस्मिथ एका बाजूला आणि एक नर्स दुसऱ्या बाजूला उभ्या राहिल्या. पट्टे आणणारी नर्स पायाशी उभी राहिली.

डॉक्टर वळून हत्यारांच्या टेबलापाशी काही तरी करताहेत इतकं तिला कळलं; पण दिसलं नाही. ते वळले तेव्हा त्यांच्या हातात कापसाचा बोळा दिसला. ' काही नाही, तुझी त्वचा जरा स्वच्छ करणार आहे मी. ' असं म्हणून ते तिच्या कमरेच्या हाडावर बोळा घासू लागले.

डॉक्टर पुन्हा वळले. दरम्यान मिचेलीनं पुन्हा उठायचा प्रयत्न केला; पण तिघींनी मिळून तिला पक्कं जखडून ठेवलं होतं. ' नाही ! ' ती ओरडली.

डॉक्टर पुन्हा वळले. त्यांच्या हातात इंजक्शनची पिचकारी होती. ' नाही ! ' ती पुन्हा ओरडली आणि उठायचा प्रयत्न करू लागली; पण व्यर्थ ! तेवढ्यात कमरेमध्ये तीव्र वेदना झाल्याचं तिला कळलं.

□

बँकेतून परत आल्यापासून चार्लसनं कामात डोकं घातलं होतं. त्यानं काही खाल्लेलं नाही हे माहीत असल्यानं एलननं सँडविचेस आणली. खाता खाता तो लॅबबुक चाळू लागला. इतक्या व्यवस्थितपणं सर्व लिहिलेली बुकं पाहून त्याला नवल वाटलं. त्यामुळं हे काम बहुधा लवकर संपेल अशी आशा वाटू लागली. ' ठीक आहे. सहा महिन्यांनी पुन्हा आपल्या कामाकडे वळता येईल. '

' ह्या प्रकल्पाचं एक चांगलं आहे. ' भरल्या तोंडानं तो म्हणाला, ' भरपूर अनुदान आहे. अगदी जाळण्याइतकं. आता आपल्याला पाहिजेत ती नवीन उपकरणसुद्धा घेता येतील, ऑटोमॅटिक काउंटर, सेंट्रिफ्यूज. '

' आपण नवीन क्रोमॅटोग्राफी युनिटही घ्यावं, ' एलन म्हणाली.

' नक्कीच, आता हे काम करायचं म्हणजे सगळं आलंच. हे पहा आपण आता असं करू. LD50 चाही एकसोळांश भाग घेऊ. '

' थांब, बरेच दिवसात मी असलं काम केलं नाही. तेव्हा मला नीट सांग. LD50 म्हणजे त्याच्या एका डोसामुळं जवळजवळ ५० टक्के प्राणी दगावण्याचा संभव असतो. बरोबर ? '


' एकदम बरोबर ! कॅन्सरानच्या प्रभावाचा अभ्यास करण्यापूर्वी उंदीर, ससे आणि माकडे यांच्यावर LD50 चा काय दुष्परिणाम होतात हे पाहिलेलं आहे. आपण उंदरांपासून आरंभ करू. ब्रिटननं RX7 मागवलं आहे. स्तनांच्या गाठींकरता आपण ते वापरून पाहू ! '

त्यानं कागद–पेन्सिल घेऊन प्रकल्पाची संपूर्ण योजना विस्तृतपणे एलना समजून सांगितली.

' अबब ! ह्याची मला काहीच कल्पना नव्हती. '

' हे तर काहीच नाही. प्रत्येक प्राण्याची तो मेल्यावर साध्या मायक्रोस्कोपखालीच नव्हे तर इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपखाली तपासणी करावी लागेल ! '


Boost Your Milk Profits with Amrut Cattle feed



The best economical feed to multiply your milk production. Amrut Cattle feed is a nutritionally balanced feed which maintains and improves the health of your cattle and thus leads to more production. So start them on Amrut to-day.

Amrut cattle feed in the form of both Pellets and Mash are available.

TOM & BAY

A quality product of :
Nav Maharashtra Chakan Oil Mills,
42/43, Shankar Seth Road, Pune-411 037
Factory : MIDC, Ahmednagar, Tel. 449449, 32891

'आणि आपल्या कामाचं काय ?'

'काय सांगणार ? आपल्या दोघांवर अवलंबून आहे.' चार्लस म्हणाला.

'माझ्यापेक्षा तुझ्यावर जास्त अवलंबून आहे !'

'रात्रीचं काम करण्याबद्दल बोलली होतीस ना ?'

'दोन्ही कसं जमायचं ? पण एका प्राण्यातलं प्रोटीन जरी आपण वेगळं करू शकलो तरी खूप यश मिळेल. एका उंदरात जरी स्वतःच्या टयूमरविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण करता आली तरी केवढं नेत्रदीपक काम होऊन जाईल !'

'हे पहा एलन, हे किती कष्टाचं आहे मी तुला सांगायला नकोय. यश मिळेल की नाही हेही अनिश्चित. तुझी कामाची चिकाटी आणि ताकद मी अजून कुणात पाहिलेली नाही.' चार्लस टक लावून तिच्याकडे पाहू लागला.

'असं पाहू नकोस,' एलन हसून म्हणाली, 'रात्री काम करायची माझी तयारी आहे. मी काही काही तरी खायलाही घेऊन येत जाईन.'

'किती अवघड काम आहे याची तुला कल्पना आलेली दिसत नाही. आपण जवळजवळ मुक्कामच करणार आहोत इथं !'

'माझ्या खोलीपेक्षा प्रयोगशाळा मोठी आहे.'

'मॉरिसनकडून तुला जादा कामाचा भत्ता मी मिळवून देऊ शकणार नाही याची कल्पना आहे ना ?'

'त्याची मला...' तेवढ्यात फोन वाजला.

'तूच घे. आता मला कुणाशी बोलायचं नाही,'

एलननं फोन घेतला आणि लगेच ती म्हणाली, 'अरे, तुझ्या पत्नीचाच आहे.'

चार्लसनं फोन पकडला, 'काय झालं ?'

'तू तावडतोब इथं डॉ. विलींच्या खोलीत ये !'

'काय झालं पण ?'

'ते मला फोनवर सांगता येणार नाही.'

'कॅथरिन, सकाळपासून मला बाईट दिवस लागलाय. नीट काय ते सांग !'

'तू आधी इथं ये !'

'इथं छप्पर कोसळलंय !'

'मी वाट पाहत्ये,' असं म्हणून तिनं फोन ठेवला.

शिवी हासडून त्यानं फोन खाली ठेवला. 'काय झालंय ते सांगत नाही. तावडतोब निघून या म्हणे !'

'आपलं काम तिला माहिती नाही. तिला इथल्या अडचणींची कल्पना नाही.'

'डॉ. विलींनाच विचारतो,' तो म्हणाला. पण मिचेलीचं जास्त नसेल ना ? त्याच्या मनात धस्स झालं. 'नको; पण मी लगेच जाऊन येतो !'

'आणि आपल्या कार्यक्रमाच काय ?'

'आल्यावर मांगतो. दरम्यान तू कॅन्सरानचं उंदरायोग्य द्रावण करून ठेव ! मी आल्या आल्या आपण पहिल्या तुकडीला इंजेक्शन देऊ.' कोट घालत घालत तो दारापाशी गेला. 'आणि आपल्याला लागणारे प्राणीदेखील इथंच आणून ठेव सगळे !' तो बाहेर पडला.

तिला थोडं दुखावल्यासारखं झालं; पण लगेच तिनं कामाला सुरुवात केली. ती सिरिंज उचलणार इतक्यात डॉ. मॉरिसन आत आला.

'डॉ. मार्टेल नाहीत.'

'मला माहिती आहे. त्याला जाताना पाहिलं; पण माझं तुझ्याशीच काम आहे !'

चार्लसच्या पश्चात याचं काय काम असणार याचं नवल करीत तिनं हत्यारं खाली ठेवली आणि ती पुढं आली. सिगरेटकेस काढीत तोही पुढं आला. 'ओढली तर चालेल ना तुला ?' तिनं खांदे उडवले. खरं म्हणजे चार्लसला हे मुळीच आवडलं नसतं; पण तिला कसला तरी विचित्र आसुरी आनंद झाला.

'ब्रिग्टन प्रकरण तुला माहितीच असेल ?'

'थोडं फार.'

'आणि ते काम आता चार्लसकडे सोपवलंय हेही कळलं असेल.' तिनं मान डोलवली.

नेमकं कसं बोलावं ह्या विचारात तो म्हणाला, आणि हा प्रकल्प यशस्वीपणं पुराही झाला पाहिजे !'

'डॉ, मार्टेलनं कामाला लागलीच सुरुवात केलीय.'

'छान, छान !'

'कसं मांडावं ते मला लक्षात येत नाही; पण चार्लस कुठं काही घोटाळा करील की काय याची काळजी वाटते.'

'त्याबद्दल मुळीच चिंता नको. त्याच्या सचोटीबद्दल मुळीच शंका नाही !'

'त्याबद्दल मलाही शंका नाही; पण तो एक आत्मकेन्द्रित निअहंमन्य असा शास्त्रज्ञ आहे. दुसऱ्याच्या कामाबद्दल त्याला यत्किंचितही आदर नसतो आणि अगदी अस्थिर आहे.'

'अस्थिर ?' तिला जुने प्रसंग आठवले. आपल्याशी संबंध येऊनही नंतर त्यानं आपल्याला कसं दूर लोटलं याची तिला आठवण झाली.

'मी काय बोलावं असं तुमचं म्हणणं आहे ?' चार्लस कसाही असला तरी घेतलेलं कॅन्सरानचं काम तो मध्येच सोडणार नाही हे निश्चित.'

'त्याबद्दल मी आभारी आहे; पण संस्थेच्या हिताच्या दृष्टीनं तू एक करावंस. कॅन्सरान प्रकल्पाच्या कामात त्याच्या वागण्यात जरा काही वेडंवाकडं आढळलं तर ताबडतोड मला कळवायचं. असं सांगणं थोडं विचित्र आहे; पण संचालक मंडळ याबद्दल तुझं ऋणी राहील !'

'ठीक आहे.' काय बोलावं हे न कळून ती म्हणाली, नाही तरी चार्लसला एकदा धडा मिळायलाच हवा ! क्षणभरानं ती म्हणाली, 'पण माझं नाव कुठं येता कामा नये.'

'वचन ! ते माझ्याकडं लागलं आणि तुझा अहवाल थेट मला द्यायचा !'

'फार आभारी आहे. काही अडचण आली तर अनमान करायचा नाही. एकदा जेवायलाही जाऊ आपण. हं ?'

'पाहू या !'

'किती विचित्र माणूस आहे; पण खंबीर आणि समर्थ !' □

[ अपूर्ण : पुढील अंकी चालू ]

## ती. अक्का : पृष्ठ ३२ वरून

ती. अक्का : पृष्ठ ३२ वरून

केवळ हे त्यांना साध्य होत आहे.' विमल खरोखर सुदैवीच म्हणायची. तुमच्या अखेरच्या दिवसांत तिला पुष्कळच करता आलं.

आमचा कुणाचाच योग नव्हता !

□

१९३४ : बुधगावला एकदा तुम्हाला पातळं आणली; वजनानं हलकी, तलम अशी. 'अजून माझी फाटली नाहीत, इतक्यात कशाला ?' असं तुमचं चाललंच होतं. पण यांनी ('यांनी' शारदाबाईंचे पती, जिवाजी अनंत आपटे. पोस्टखात्यात नोकरी म्हणून निरनिराळ्या गावी बदल्या) आणली. दुसरे दिवशी धुवून पिळताना हाक मारून मला म्हणालात, 'अग, पाहिलंस का ? पिळा किती बारीक होतो आहे ? हलकं किती आहे बघ. धुतल्यासारखं सुद्धा वाटत नाही.' मी म्हटलं, 'असं होय.' पण दुसरे दिवशी धुताना तसंच म्हणालात, 'नेसल्यावर सुद्धा किती ग हलकं आहे,' म्हणालात. तेव्हा माझ्या डोक्यात आलं की तुमची पहिली जाड आहेत. वयाच्या मानानं ती धुवायला, पिळायला जड होताहेत आणि म्हणून ही हलकी असल्याचं तुम्हाला सारखं जाणवंत आहे. सुखाचं वाटतं आहे.

कशी आम्ही माणसं ? या दृष्टीनं आम्ही कधी तुमच्याविषयी विचारच केला नाही का ?

मग मी म्हटलं, 'रोज हीच नेसावीत आता; पहिली अंथरूणावर होतील.' स्वत:च पातळ दुसऱ्या कुणीही कधी धुवायचं नाही. मोलकरणीनंही. कसं दुसऱ्याच्या लक्षात येणार ?

चांगल्या पोताची पातळं आणायचा नाद म्हणून सहजच यांनी आणली. पण ते तुम्हाला सुखाचं होतं आहे याचं मला फार बरं वाटलं. होय, न कळत का होईना, तुम्हाला थेंबभर सुख देता आलं.

वेणूताईनं (आण्णांची मुलगी) सुद्धा तुम्हाला अशीच दोन पांढरी तलम पातळं घेतली होती.

आता तुम्ही कुठंही गेलात तरी तुमची सगळी माणसं आक्का, आक्कासाठी, आक्काला आवडेल असं म्हणत होती. तुम्ही आयुष्यभर जी माया पेरलीत ती आता पुढच्या पिढीत भरपूर उगवली होती. अगदी नव्या पिढीची मधुमालती (नानांची सून.) तिला तुमचा सहवास किती थोडा होता. पण दोन दिवस तुम्ही येणार असं कळल्यावर, तुमच्या सोवळ्यानं तिच्याकडे करायच्या सैपाकाची सर्व व्यवस्था तिनं ठेवली होती. आल्याआल्या पहिलं सगळं काढून धुवून स्वच्छ करून दिलं. तुमचं पातळ सोवळ्यात घालायची व्यवस्था गच्चीवर करून दिली.

तुम्हाला कुठं चार ठिकाणी जायचं होतं भेटायला, तर 'सर्व ठिकाणी माझ्याबरोबर येऊन घरं दाखमली.' असं खूप कौतुक सांगून म्हणालात, 'फार चांगली बघ मुलगी, मला उगीच भय घातलं होतं बघ घरी सगळ्यांनी. ती नोकरी करणारी मुलगी, सोवळं-ओवळं नाही. जमायचं नाही तुमचं तिथं. पण माझी काही गैरसोय झाली नाही. आणि माझं सोवळं माझ्या जेवणापुरतं असतं. दुसऱ्याला मी कधी कटकट करते का ?'

**Ms. C. L. Shirole**

Engineers and Builders.

**Sadguru Luxury Service**

Car Rented Service

1216 / 6, Deccan Gymkhana,
Near Fergusson College
Pune 411004.
Ph. 53131, 52434

तुम्ही कधीच कटकट केली नाहीत. त्यामुळे तुमच्या श्रद्धेला धक्का लागेल असं कुणी वागलं नाही, वागायचं मनातच कुणाच्या कधी आलं नाही.

मुली लहान असताना, एक–दोन वर्ष पहिल्यानं बुधगावला होतो, तेव्हा तुम्ही आमच्याकडं होतात. कोजागिरी जवळ आली होती.

मला म्हणालात, 'माझ्याबरोबर कार्तिक स्नान करशील ? नक्षत्रवाती लावू या. म्हणजे, आकाशात नक्षत्रं दिसत असतानाच स्नान करून अंगणात तुळशीपुढे सत्तावीस वाती लावायच्या.' माझं तेव्हाचं वय पहाटेच्या साखरझोपेच्या आकर्षणाचं. पण तुमच्या मनात आहे, त्यामुळे तुम्हाला आनंद होणार आहे, याच भावनेनं मी होय म्हटलं.

अगदी पहाटे चार वाजता पाणी तापलेलं असायचं. तुमचं स्नान मी उठायच्या आतच झालेलं असायचं. कोजागिरी ते त्रिपुरी पौर्णिमा असं हे कार्तिकस्नान; उठताना जड जायचं. साडेचार वाजलेले असायचे; पण नंतर फार प्रसन्न वाटायचं, वेणी, अंग-धुणं होईपर्यंत पाच वाजायचे. तुळशी वृंदावनापुढे तुळशीची पूजा करून आपण दोघी वाती लावत होतो. एका तबकात माझ्या सत्तावीस फुलवाती; दुसऱ्या तबकात तुमच्या. हे चौपन्न दिवे एकदम लागायचे. आकाशात नक्षत्रांचा पसारा, हिऱ्यासारखा लखलखत असायचा. बाहेर सगळीकडे शांत असायचं. मन कसं अगदी प्रसन्न होऊन जायचं आणि तुमच्या अतिशय श्रद्धावान सहवासामुळं सारं वातावरण कसं अगदी सोज्वळ वाटायचं. नतर तुम्ही विठ्ठल मदिरात काकड आरतीला जायच्या आणि मी घर-कामाला लागायची.

त्रिपुरी पौर्णिमेच्या वाती, शिवरात्रीच्या वाती, तुमच्या समाधानासाठी वर्षानुवर्षे लावत आले. पहिल्यानं तुम्हीच करून दिल्यात. मग मी एकदा म्हटलं, 'शंकराचं व्रत, एकदा आरंभ केला की थांबायचं नसतं. मला हातानं सूत काढता येत नाही. तुम्ही जवळ बसलात तर टकळीवर सूत काढलं तर चालेल ?

'चालेल, न चालायला काय झालं ? आणि समज, काही अडचण आली तर कापूर लावला तरी चालतो. परमेश्वर सर्व चालवून घेतो, तो कधी अडून बसत नाही; त्याला हवी असते श्रद्धा, भाव, भक्ति.'

आक्का, तुमची इच्छा होती ना. कसलीही अडचण ३६ वर्ष आली नाही. वाती स्वतः करूनच लावल्या. प्रत्येक वेळी वाती लावताना म्हणायची, आक्का तुम्हाला शब्द दिला आहे. तो शब्द शेवटपर्यंत पाळीन. गेली सात वर्षं मात्र कापूरच लावते आहे, उपास करून संध्याकाळी पुन्हा स्नान करते नेहमीप्रमाणे आणि कापूर लावते. त्यावेळी पूजा करताना आधी मला तुमची प्रतिमा दिसते, आणि तुमच्या आठवणीत बुडूनच परमेश्वराला म्हणते, देवा, यातून खरोखर पुण्य मिळणार असेल तर माझ्या आक्कांना दे.

दया, क्षमा आणि वात्सल्य यांनीच तुमची प्रतिमा घडली होती मन:संयम हे तुमचं संरक्षक कवच होतं. तुमच्या स्वभावात कटुता कधी नसायची. अप्रिय गोष्ट घडली तर दुसऱ्याच क्षणाला ती तुम्ही बाजूला टाकत होतात. क्षमा तर तुमच्या रोमारोमांत भरली होती.

पुराणं, कीर्तनं, प्रवचनं ऐकलीत, त्यावेळी हजारो माणसं ऐकत होतीच. त्याचं मनन, चिंतन कुणी, कितीसं केलं असेल ?

तुम्ही मात्र त्या साऱ्या श्रवणातून सार काढलंत, पचवलंत आणि निष्काम कर्मयोग्याचं आयुष्य आपलं आपण घडवलंत.


दुखण्यात कधी डॉक्टरी औषध घेतलं नाहीत, कधी साथीची इंजेक्शनं घेतली नाहीत. भोरला असताना प्लेग झाला. सर्वांनी किती आग्रह केला. पण तुम्ही टोचून घेतलं नाहीच. म्हणालात, 'अग, प्लेग कितींदा आला न् गेला. मी कधीच टोचून घेतलं नाही. मला भितो तो.' इच्छाशक्तीच्या जोरावर तुम्ही दुखण्याला पळवत होतात का ?

गगूताईच क्षयाचं दुखणं,. माणसं किती भितात. पण महिनोन-महिने या आपल्या लाडक्या बहिणीची सर्व तऱ्हेची शुश्रूषा केलीत. तुमच्या मनाला मृत्यूचं भय कधी वाटलंच नाही.

वेणूताईला लहानपणी देवी आल्या. सांसर्गिक दुखणं, सगळ्यांना जपणं आवश्यक. त्यावेळी वेणूताईची आई लहान, अननुभवी होती


## " बादल "

हेवी ड्युटी व लाईट ड्युटी चाफ कटर्स वापरा
५०% कडबा वाचवा




५ H P थ्री फेज व २ HP सिंगल फेजवर चालतात
आजच समक्ष भेटा --
**कृष्णाजी बल्लाळ आणि कंपनी**
१२७८ सदाशिव पेठ, बाजीराव रोड पुणे--३०
फोन -- ४४२०७६




Pratibha 83-15

वेणूताईची, त्या चिमुकलीची शुश्रूषा तुम्हीच केलीत. तुमची जात कर्मयोगी संताची होती. या तुमच्या स्वभावाला फार मोठे क्षेत्र हवं होतं. तुमची योग्यता फार मोठ्या सेविकेची होती. मदर टेरेसासारखी. परवा सॉक्रेटीसचं चरित्र वाचताना तुमची फार आठवण झाली.

'जे का रंजले गांजले, त्यासि जो म्हणे आपुले । तोचि साधु ओळखावा,' ही तुमची खरी योग्यता. पण तुमचं सारं आयुष्य आमच्या सुखवस्तु कुटुंबाचं स्वास्थ्य सांभाळण्यातच खर्ची पडलं.

'गुण गाईन आवडी' तसं माझं झालं आहे. बघा, आता पुरं करते. छे, पुरं कसं म्हणते आहे, अजून सांगायचं आहे ना.

माझ्या प्रमाणच आपल्या घरच्या प्रत्येकाजवळ कितीतरी अशा आठवणी असतील. पण माझ्या जवळच्या आठवणी तरी एकदा तुमच्याजवळ बोलून मन मोकळं करावं असं वाटलं, म्हणून हे लिहायला आरंभ केला.

☐

प्रयागला (अलाहाबाद) जायला निघालात, तेव्हा बुधगावलाच होता. एकदा नाना आले होते. दुसरे दिवशी सांगलीला भीमाताईंना भेटून जमखंडीला जाणार होते.

चहाबरोबर गप्पागोष्टी चालू होत्या. तेव्हा नाना सहज म्हणाले. 'आक्का, पुढच्या आठवड्यात अलाहाबादला विमलकडे जाणार आहोत. येणार काय?' आणि नवल म्हणजे अगदी लहान मुलासारख्या गडबडीनं उठत म्हणालात, 'हो येते. चल तुझ्याबरोबरच येते.' आणि लगेच आपले देव उचलून समळीत घातलेत. पातळं काढून घेतलीत, तयारच झालात.

'हे काय?' मी म्हटलं, 'ते सहज म्हणाले. तर लगेच निघणारच?' 'अग, ये म्हणतो आहे, तर निघते. गंगास्नान करायला मिळेल. एक वर्ष प्रयागला रहायचं आणि नऊ महिने काशीला राहायचं जन्म-मरणाचे फेरे चुकतात म्हणे. बघु या एवढी पूण्याई आहे का?' आणि मला म्हणालात, 'संभाळून रहा ग, येते मी.'

तुमचा गंगेचा ध्यास खरोखर एकमेव होता. नेहमी मला म्हणत होतात,' कुठल्या गावात राहता गं? पुष्कळ वेळा गावाला कृष्णाबाई सुद्धा नसते. गेले-विले तर ओढ्याकाठी नेऊ नका बरं का. कृष्णाबाईला तरी न्या.' पुष्कळदा असं म्हणालात की मला कसंतरी व्हायचं. पण मग म्हणायची, 'कृष्णाबाईलाच नेतील बरं. पण तुमचा हा ध्यास परमेश्वरानं पुरवला. आणखी एक इच्छा तुम्ही मनाशी ठेवली होती. शेवटीसुद्धा कुणाला आपल्यासाठी फार श्रम पडू नयेत. देवानं तुमची ही इच्छा सुद्धा पुरवली.

☐

तुम्ही प्रयागला गेल्यावर चार दिवसांनी भीमाताई आल्या होत्या. म्हणाल्या, 'दोन महिन्यांनी मंदाची (भीमाताईंची मुलगी) ओटी भरायची आहे. कमलची पण आहे ना? आक्का हवी होती आशीर्वाद द्यायला, नाही का?'

होय, हव्या होत्या. मलाही वाटलं तसं. पण विचार केला, किती दिवस त्यांनी आमच्याच समारंभात गुरफटायचं? काही दिवस तरी, त्यांच्या मनाचं समाधान होईल असं, काही दिवस तरी, त्यांना राहू दे. जाताना कमाला, मंदाला कापडासाठी पैसे देऊन गेलात. तुम्ही गेलात, त्या परत येणार नाही हे लक्षातच आलं नाही. असं वाटलंच नाही.

तुमच्या असण्याची इतकी सवय झाली होती आम्हाला की, जशा जमखडीहून, विजापूरहून येत होता, तशाच काशी–प्रयाग करून याल असंच वाटलं. तुम्ही मात्र मनोमन ठरवलं होतं, गंगाकाठी देह ठेवायचा. परत यायचं नाही. तुमच्या इच्छाशक्तीचं हेच ध्येय होतं. पण आम्ही फसलो. तुमचं जाणं नेहमीसारखंच वाटलं. आणि आमच्यासाठी जन्मभर श्रम करून, कणभर सुद्धा अपेक्षा कुणाहीकडून ठेवली नाहीत. एकादया तपस्व्यासारख्या, एकट्या, गंगेच्या तीरावर विसावलात आम्ही मात्र तुमच्या अंत्यदर्शनालाहि मुकलो. आमचं तेवढं भाग्यच नव्हतं.

तुमचं अंत्यदर्शन झालं नाही, त्यामुळं अजनसुद्धा खुळ्यासारखं वाटतं, एकादे दिवशी देवाची समळी घातलेलं पातळाचं गाठोडं, अंगावर केशरी शाल घेतलेली तुमची मूर्ती दारातून आत शिरेल. आणि आम्ही सगळी आनंदानं धावत येऊन म्हणू

आक्का आली । आक्का आल्या ।।

---

**तीस जून १९५० : आक्का काशीस गंगातीरी गेली, गंगार्पण झाली. शेवटची दोन–तीन वर्षे आक्का काशी व प्रयाग येथे असे. तिच्या दोन भाच्या अलाहाबाद व वाराणशी येथे असत. त्यांच्या देखरेखीखाली प्रयागच्या संगमावर नऊ महिन्यांचा गर्भवास व वाराणशीस काशी–विश्वनाथाच्या सान्निध्यात गंगातीरी एक वर्षाचा कल्पवास असा काळ गेला. आक्काचा काशीवास व गंगास्नान चालूच होते. वाराणशीस विश्वनाथाच्या मंदिराच्या पायरस्त्यावरील तिळवणकर राम मंदिराच्या ओवरित आक्का राही. तिच्या दोन्ही भाच्या दक्षिणेकडे उन्हाळ्याच्या सुट्टीत जमखंडीस माहेरी आल्या होत्या. एक दिवस तिळवणकरांची तार आली : 'काही तासांच्या बशुद्धीनंतर 'आक्का गेली. आक्काचे सोने झाले. नदीच्या तीरी वास व स्नान एवढेच तिला आयुष्यभर हवे होते. तिच्या आयुष्याची अखेर तिला अगदी हवी तशी घडून आली. 'याच साठी केला होता अट्टहास'**

With Best Compliments from–

MOHAN B. CHITALE'S

**RENUKA CONSTRUCTION COMPANY**

Promotors and Builders

214, Narayan Peth, N. C. Kelkar Road,
Near L. I. C. Building, PUNE 411 030.

PHONE: 30806

Contact FOR BOOKING
BETWEEN 10 A.M. TO 12 NOON
4 P.M. TO 8 P.M. EXCEPT SUNDAY

Adverto/A.J.A.

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of yostage–No. 11 ) Regd. No. PNCW–28


# माणुसकीचा झरा

मिंटी केवळ जीवनच देते असे नव्हे तर नवजीवनही देते. तरुणपणी अविचाराने घडलेल्या अपराधाबद्दल शिक्षा भोगून आलेल्या तरुणांचे संपूर्ण जीवन उध्वस्त होऊ नये म्हणून मिंटीने अशाच काही तरुणांना नवजीवन दिले आहे. त्याची थोडीशी झलक–

चोरीच्या आरोपावरून शिक्षा भोगून आलेला किरकटवाडीचा एक माजी कैदी स्वतःचे किराणादुकान बँकेच्या आर्थिक साहाय्याने उत्तम प्रकारे आज चालवीत आहे.

जन्मठेपेची शिक्षा भोगून आलेला एक तरुण बँकेच्या आर्थिक साहाय्याने व सहकार्याने अग्रहक्काने रिक्षा मिळवून आज पुन्हा सुखी जीवन जगत आहे.

चिंचवडचे माजी कैदी अफरातफरीबद्दल झालेली शिक्षा भोगून आल्यानंतर आता स्वतःचे सायकल दुरुस्तीचे दुकान थाटून सचोटीने सुंदर व्यवहार करीत आहे.

**मिंटी म्हणजेच महाबँक**

**महाबँक म्हणजेच माणुसकीचा झरा––**



**बँक ऑफ महाराष्ट्र**

**[ भारत सरकारचा उपक्रम ]**

**मुख्य कचेरी : " लोकमंगल " १५०१, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५**